मंगळवार, १४ फेब्रुवारी २०२३
किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी • दैनिक
वर्ष - ०२ • अंक -१७१
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●AURANGABAD (MAHARASHTRA) ●TUESDAY 14 FEBRUARY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-171 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-14 ●PRICE-5

# तुम्ही पक्ष, विचार, नेतृत्त्व बदला

## शरद पवार : अनिल देशमुखांना होती भाजपची ऑफर

आधुनिक केसरी न्यूज

**वर्धा : अनिल देशमुख यांच्या जवळच्या लोकांवर १३० वेळा धाडी घातल्या, देशात असा प्रकार कुठेही घडला नाही. अनिल देशमुख यांना एकच सांगितले जात होते की, तुम्ही पक्ष बदला, तुम्ही विचार बदला, तुम्ही नेतृत्त्व बदला. पण त्यावेळी अनिल देशमुख यांनी स्वच्छ मनाने सांगितले की, मी संपूर्ण आयुष्य तुरुंगात घालवेन, पण माझ्या पक्षाची साथ सोडणार नाही. अनिल देशमुख यांनी ती ऑफर धुडकावून लावल्यामुळे त्यांना तुरुंगवास झाला, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष यांनी केला. वर्ध्यातील एका कार्यक्रमात ते बोलत होते.**



यावेळी अनिल देशमुख यांनीही त्या काळातील आपले अनुभव कथन केले. माझ्याकडे समझोत्याचा प्रस्ताव होता. मी समझोता केला असता तर तुरुंगात गेलो नसतो. पण त्यावेळी मी बाहेर पडलो असतो तर महाविकास आघाडीचे सरकार अडीच वर्षांपूर्वीच पडले असते. माझा साहेबांच्या नेतृत्त्वावर विश्वास आहे. मी आयुष्यभर जेलमध्ये जाईन, पण समझोता करणार नाही, असे त्यावेळी सांगितले. आर्थर कारागृहात जेथे दहशतवादी कसाबला डांबले होते, तेथेच डांबून माझ्यावर तडजोडीकरता दबाव आणला, असा गौप्यस्फोटही अनिल देशमुख यांनी केला.

ईडी, सीबीआयच्या भीतीने अनेक आमदार पक्षबदल करुन गेले. माझ्यावरही सातत्याने दबाव आणला जात होता. माझ्यावर १०० कोटी रुपयांच्या गैरव्यवहाराचे आरोप करण्यात आले होते. पण आरोपपत्रात माझ्यावर केवळ १ कोटी ७१ लाख रुपयांच्या गैरव्यवहाराचा ठपका ठेवण्यात आला. माझा छळ करण्यात आला, पण मी माझ्या भूमिकेवर ठाम राहिलो. अखेर न्यायदेवतेने मला न्याय दिला. न्यायालयाने माझ्याविरोधात पुरावे नसल्याचे स्पष्ट केले, असे अनिल देशमुख यांनी सांगितले.

### त्यांनाच भाजपमध्ये यायचे होते : गिरीश महाजन



अनिल देशमुख यांच्या दाव्यानंतर भाजप नेते गिरीश महाजन यांनी त्यांच्यावर पलटवार केला. आम्ही अनिल देशमुख यांना कुठलाही प्रस्ताव दिला नव्हता. उलट अनिल देशमुख यांनीच भाजपमध्ये येण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यांनी दोनवेळा आम्हाला तसा प्रस्ताव पाठवला होता. पण ते राष्ट्रवादी काँग्रेसकडून निवडून आले. अनिल देशमुख यांची आताही जामिनावर सुटका झाली आहे. त्यामुळे निर्दोष असल्याचे पुरावे आणि कागद त्यांनी ईडीला दाखवावेत, असा उपरोधिक सल्लाही गिरीश महाजन यांनी यावेळी त्यांना दिला.

## महत्वाची बातमी

### प्रभाकरण अजूनही जिवंत?

आधुनिक केसरी न्यूज



**चेन्नई :** तामिळ फुटीरवादी संघटना लिबरेशन टायगर्स ऑफ तामिळ इलमचा प्रमुख वेलुपिल्लई प्रभाकरण जिवंत असल्याचा धक्कादायक दावा वर्ल्ड तामिळ फेडरेशनचे अध्यक्ष नेदुमारन यांनी केला आहे. प्रभाकरण जिवंत आहे, ते सुखरुप आहे आणि लवकरच सर्वांसमोर येतील, असे त्यांनी सांगितल्याने खळबळ उडाली आहे. नेदुमारन यांनी म्हटले की, मी लिबरेशन टायगर्स ऑफ तामिळ इलमचा प्रमुख वेलुपिल्लई प्रभाकरणबद्दल काही सांगू इच्छितो. ते जिवंत आहेत आणि सुखरूप आहेत. आम्हाला विश्वास आहे की यामुळे त्यांच्याबद्दल सुरु असलेल्या अफवांना पूर्णवराम लागेल. तामिळनाडू तंजावुरजवळ विलारमध्ये मुलिवैकल मेमोरियल यार्डमध्ये पत्रकारपरिषद घेत नेदुमारान यांनी प्रभाकरण लवकरच सर्वांसमोर येण्याची शक्यता वर्तवली आहे. २००९ साली एलटीटीईचा म्होरक्या प्रभाकरनसोबतच या संपूर्ण संघटनेच्या मुसक्या आवळण्यात सुरक्षा यंत्रणांना यश आले होते. त्यामुळे दक्षिण भारतात, विशेषतः तामिळनाडू आणि आसपासच्या भागातील नागरिकांनी सुटकेचा निःश्वास टाकला होता. मात्र, आता नेदुमारान यांनी केलेल्या या धक्कादायक दाव्यामुळे पुन्हा खळबळ उडाली आहे.

# मालवणमध्ये व्हेल माशाची १८ कोटींची उलटी जप्त




आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** व्हेल माशाची उलटीची तस्करी करणाऱ्या मुख्य आरोपीला सांगली पोलिसांनी अटक केली असून १८ कोटी ६० हजारांची व्हेल माशाची उलटी जप्त केली आहे. मुख्य संशयितास पुढील तपासासाठी सहा दिवस पोलीस कोठडी न्यायालयाने मंजूर केली आहे.

स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने चार दिवसांपूर्वी व्हेल माशाची उलटी तस्करी करणाऱ्या दोघांना अटक केली होती. त्यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार त्यांनी मुख्य सूत्रधार नीलेश रेवंडकर (वय 42 रा. तळाशील ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून १८ किलो सहाशे ग्रॅम वजनाची व्हेल माशाची उलटी हस्तगत करण्यात आली. आंतरराष्ट्रीय बाजारात याचे मूल्य १८ कोटी ६० लाख रुपये आहे. याबाबत स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक सतीश शिंदे यांनी सांगितले, चार दिवसापूर्वी सांगलीतील शामरावनगरमध्ये छापा टाकून अंबरग्रिस तस्करी प्रकरणी सलिम गुलाब पटेल आणि अकबर याकूब शेख यांना अटक करण्यात आली होती. या दोघांकडून तस्करीसाठी खोययामधून आणलेली ५ किलो ७१० ग्रॅम वजनाची अंबरग्रिस जप्त करण्यात आली होती. याचे मूल्य पाच कोटी ७५ लाख ५० हजार रुपये आहे. या दोघांविरुद्ध सांगली शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. न्यायालयाने तीन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले होते. या कालावधीत मुख्य सूत्रधाराचे नाव समजताच स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने मालवण येथे जाऊन मुख्य सूत्रधार रेवंडकर याला ताब्यात घेतले. त्याला अटक करीत असताना पोलीस पथक पर्यटक बनून गेले होते.

सांगलीत कारवाई झाल्याचे समजताच रेवंडकर यांने मालवण पोलिसांना व्हेल माशाची उलटी सदृष्य पदार्थ समुद्रकिनारी पडला असल्याची बतावणीही केली होती. सांगलीचे पथक त्याच्या मूळगावी तळाशील येथे गेल्यानंतर पोलिसांच्या चौकशीत त्याचा बनाव उघड झाला. पोलिसांनी आतापर्यंत या तस्करीमध्ये २४ कोटी ३९ लाख २५ हजार रुपयांची व्हेल माशाची उलटी जप्त केली आहे. मूख्य सूत्रधार रेवंडकर याला सोमवारी न्यायालयात हजर केले असता सहा दिवस म्हणजे, १७ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

पूर्वी दूरदर्शनवर राष्ट्रीय साक्षरता मिशन या कार्यक्रमाच्या प्रचारार्थ एक गाणं दाखवलं जायचं. मला ते फार आवडायचं. ते गाणं होतं ' पूरब से सूर्य उगा, फैला उजियारा , जागी हर दिशा दिशा , जागा जग सारा. ' त्या गाण्यात सकाळच्या सूर्याचा सोनेरी प्रकाश,छोट्या मुलांचं पाटीवर मुळाक्षरं गिरवणं , त्या वृद्ध आजोबांचा हसतमुख चेहरा, त्यांचं दाढी करताना साबणाचा फेस त्या छोट्या मुलाच्या चेहऱ्याला लावणं, नंतर त्या मुलाच्या चेहऱ्यावरून हात फिरवणं, त्या मुलाचा विलक्षण हास्याने उजळलेला चेहरा, त्याचं निरागस हास्य या गोष्टी मनाला खूपच स्पर्शून जात होत्या. काही काही गोष्टी अशा चिरकाल स्मरणात राहून जातात. तसेच ते ' मिले सूर मेरा तुम्हारा ' हे गाणं . भारतातील विविध भाषा, विविध भागातील प्रादेशिक प्रथितयश कलाकार आणि गायक आणि विविध नयनरम्य दृश्ये यामुळे ते गाणं अमर झालं आहे. भारतातील विविधतेतील एकतेच दर्शन घडवण्यात त्या गाण्याचा दिग्दर्शक यशस्वी झाला आहे. तसेच ज्योती कलश छलके हे गाणं . सूर्य उगवल्यानंतरच्या दृश्याचं मनोरम वर्णन त्या गाण्यात आहे. अशी खूप गाणी आहेत. जी सकाळची वेळ दाखवतात. सूर्य उगवला आहे, आणि त्याबरोबर सारी सृष्टी कशी चैतन्यात न्हाऊन निघाली आहे हे बहुतेक गाण्यातून दाखवले आहे. अशी मन प्रसन्न करणारी भक्तिगीते तर भरपूर आहेत. गणपतीला भूपाळी म्हणताना ' तुझ्या कांतीसम रक्त पताका पूर्वदिशी फडकती, अरुण उगवला, प्रभात झाली , उठ महागणपती. ' किती सुंदर वर्णन हे ..! शब्दातलं सौंदर्य बघा. गणपतीचा वर्ण लाल, आरक्त. तशीच पूर्व दिशा सकाळच्या वेळी लाल, आरक्त झाली आहे. जणू रक्त पताका म्हणजे लाल रंगाच्या पताका पूर्व दिशेला सूर्यदेवाच्या आगमनाने फडकत आहेत. **क्रमशः**






## आनंदी पहाट

## शारीरिक स्वास्थ्य हीच संपत्ती

आधुनिक केसरी

आपलं शरीर हे आरोग्यपूर्ण, निरोगी असावं ह्यासाठी हजारो वर्षांपासून प्रयत्न सुरु आहेत. आपण ज्या सृष्टीत राहतो, त्या सृष्टीशी साम्य राखून आरोग्यप्राप्ती करणे सहज शक्य आहे. आजकाल प्रत्येकाच्या घरात वाटर प्युरिफायर आलेले आहेत. किमान वॉटर फिल्टर तरी प्रत्येकाकडे असते. पूर्वीच्या काळी मात्र घरोघरी माठ असायचा आणि तो माठ ठेवण्यासाठी तिवई असायची. या तीन पाण्याच्या तिवईवर पूर्ण माठाचा भर तोललेला असायचा. याप्रमाणेच हा शरीररूपी माठ ज्या तीन पायांच्या तिवईवर तोललेला आहे. हे साहाय्यक पाय म्हणजे आहार, विहार आणि निद्रा होय. ह्यावरच सर्व शरीरक्रिया, आरोग्य अवलंबून आहे. अन्न हे प्राणधारण करणाऱ्यांचा प्राण आहे. म्हणून ह्या सृष्टीतील सर्व सजीव अन्नामागे धावत असतात. शरीराचं बळ, वर्ण, पुष्टी, बुद्धी आणि सुख अन्नावरच अवलंबून आहे. आपण अन्नाचं ग्रहण करताना खरंच ह्या बाबींचा विचार करतो का हो ? अन्नाची निवड करताना काय खावं आणि काय खाऊ नये हे अभ्यासपूर्वक समजून घेऊन आपण त्याचं प्रश्न करतो का ? ते काहीवेळा माहित असूनही आपण आपल्या शारीरिक स्वास्थ्याच्या दृष्टीकोनातून असंच अन्न का घेत नाही ? समजून न घेण्याइतकी आपल्यात उणिव का असते ? ह्या अन्नावरच सगळं जीवन अवलंबून असतं. त्यामुळे आहारात काय घ्यावं ? कसं घ्यावं ? किती घ्यावं ? ह्या बाबी खूप महत्वाच्या आहेत. सगळ्यांनी असा आहार सेवन करायला हवा की जो आपल्या शरीराचं स्वास्थ्य टिकवून ठेवेल आणि रोग उत्पन्न होऊ देणार नाही. आपलं शरीरस्वास्थ्य हीच आपली खरी संपत्ती असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

**श्वासाची या वारी | डोलु लागे ||**

देवळाच्या दारी | मौन झाली वारी ||
माझा हा श्रीहरि | सापडेना ||१||
भक्तीचिया संगे | भाव व्याकुळला ||
अंत तू विठ्ठला | पाहू नकोह||२||
जन्माचेच नाते | तुझ्याशी रे देवा ||
अबोला केशवा | सोड आता || ३ ||
झंकारता विणा | आत्मा राम वदे ||
अंतरात नांदे | विठु माझा ||४||
पाणावले नेत्र | देह हा पंढरी ||
श्वासाची या वारी | डोलु लागे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**तुमच्या अंगी एक तरी कला अशी असलीच पाहिजे की जी तुम्हाला अद्वितीय ओळख प्रदान करेल. जे फारच लवकर मिळत असेल; ते स्वीकारताना शंभर वेळा विचार करा.**

**-------------------------**


**तुमच्या जवळ असणाऱ्या असंख्य सुखांचा आदर करा. त्यांचे महत्व ओळखा. उगाच दैवाला दोष देऊ नका. शक्य आहे की, जे तुमच्याजवळ आहे ते देखील नसणारी माणसे या जगात असतील.**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**धोखा बधिक समान दे, पड़ै जीव सब आय । मन स्वरुप अन्तर रहैं, चूनि चूनि सब खाय ।।१८१।। बाही कर्म कराइया, कर्मकाल होइ सोय । अवधी भोगाभोग की, समय पूजिहैं सोय ।।१८२।। (स्वर्वेद षष्ठ मण्डल षष्ठ अध्याय) ०६/०६/१८२ ०६/०६/१८१, १८२**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**

हा काळ मनरूपाने सर्व जीवांबरोबर शरीराच्या अंतर्गत भागात स्थित असतो. तो शिकाऱ्याप्रमाणे जीवांना धोका देऊन फसवतो आणि वेचून-वेचून सर्वांना नष्ट करतो. हा मन स्वरूपी काळ जीवांकडून तेच कर्म करवून घेतो, जे त्यांना त्याच्या जाळ्यात आबद्ध ठेवतात. वेळ आल्यावर त्यांना या कर्मांची फळे भोगण्यासाठी तो बाध्य करतो.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.**

## बध्दमुक्तनिरूपण

आधुनिक केसरी

समर्थांनी आपल्या अमोघ वाणीने आपल्याला मुक्तिविषयावर सांगितले आहे. समर्थ म्हणतात की कोणी मुक्त असतात तर कोणी नित्यमुक्त असतात. कोणी जीवमुक्त असतात तर कोणी योगी समाधानी विदेहमुक्त असतात. सांख्य म्हणती निर्गुण निर्धारी,प्रगटे पद्मावती निजधर्माचारी।। धर्माला धरून तुम्ही आचरण करा माता भगवती तुमचे रक्षण करील . सांख्य शास्त्रामध्ये विदेहमुक्त व जीवनमुक्त असा भेद आढळतो. ज्ञानाने अविद्या नाश पावते,विवेकबुद्धी उत्पन्न होते पुरूष स्वस्वरूपाला जाणतो. आपणं केलेली प्रारब्ध कर्मे शिल्लक उरल्याने त्याचे शरिर पडत नाही. जोपर्यंत प्रारब्धकर्मे असतात तोपर्यंत जीवनमुक्तिच्या अवस्थेत पुरूष रहातो. त्याला कोणतेही बंधन उरत नाही प्रारब्धकर्मे संपली भोग पूर्ण झाला की देह पडतो. तो विदेहमुक्ति प्राप्त करतो.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## नाम हाच भगवंताचा अवतार

आधुनिक केसरी

आजच्या युगात नाम हाच भगवंताचा अवतार आहे. ''सुष्टांचे रक्षण आणि दुष्टांचा नाश करण्याकरिता मी अवतार घेतो'' असे भगवंतांनी गीतेत सांगितले आहे; त्यावरून असे ठरते की, सुष्ट आणि दुष्ट या दोघांचेही अस्तित्व असून, त्यांत दुष्टांकडून सुष्टांना त्रास होण्यातच भगवंताच्या अवताराची उत्पत्ती आहे. आजकाल पाहू गेले तर असे दिसते की, सुष्टांचे अस्तित्त्वच जवळजवळ दुर्मिळ झाले आहे. म्हणजे, ज्यांचा छळ झाला असता भगवंताने अवतार घ्यावा, ते सुष्टच नामशेष झाले आहेत. मग अवतार तरी कुणासाठी, कसा व्हावा ? याचा अर्थ, अवतार होणारच नाही असे नाही; पण वस्तुस्थिती काय आहे ते यावरून आपल्याला समजेल. आजची परिस्थिती आणि पूर्वीच्या काळजी परिस्थिती यांत फरक आहे. पूर्वी सद्भावना जिवंत होती, पण ती उघडपणे कृतीत आणणे कठीण होते. आता सद्वासनाच नाहीशी झाली आहे, म्हणजे पायाच ढासळला आहे, तिथे कृतीचा प्रश्नच उद्भवत नाही. पूर्वी सद्वासना सूक्ष्मपणे का होईना जिवंत होती, पण स्थूल प्रकट कृती दुर्घट झाली होती; त्या वेळी भगवंताला स्थूलात येऊन कार्य करणेच जरूर होते, आणि अशा वेळी अवतार घेऊन, म्हणजे सगुण रूप धारण करून, भगवंताने कार्य केलेही. आताचा प्रश्न, दुर्वासना जाऊन सद्वासना कशी



उत्पन्न होईल हा आहे; म्हणजेच कार्य सूक्ष्मांतले आहे. म्हणजे 'जसा रोग तसे औषध' किंवा 'काट्याने काटा काढावा' या न्यायाने, उपाययोजना सूक्ष्मातच केली पाहिजे. वासना बदलायला वासनेइतकाच जबरदस्त इलाज पाहिजे; आणि तो म्हणजे भगवंताचे नाम. चालू परिस्थितीशी झगडून मार्ग काढून देणारा असा जर कोणता अवतार असेल तर तो भगवंताच्या नामाचाच आहे, आणि त्याकरिता सर्वांनी भगवंताच्या नामाचा टाहो फोडणेच जरूर आहे. हे कार्य भगवंताने सगुणरूप धारण करून होणे कठीण आहे; ज्याअर्थी कारण सूक्ष्मांतले आहे त्या अर्थी त्याला इलाजही सूक्ष्मांतला पाहिजे. म्हणून नामावताराची आज गरज आहे. प्रत्येक नामागणिक त्याचा अवतार आहे, आणि त्याची कास धरणे, म्हणजेच नाम घेणे, हे आमचे आजचे मुख्य कर्तव्य आहे. तेवढे केले की नाम आपले अवतारकार्य करून दाखवील. आपण आपले प्रेम प्रपंचाकडे लावले आहे, ते नामाकडे लावावे, म्हणजे नामस्मरणात फार आनंद येईल. मनाला नामाची चटक लागली आणि नामाच्या प्रेमातच मन रंगून गेले म्हणजे जन्म सफल झाला.

**आजचे बोधवचन आहे – नामाने कलीची सत्ता नाहीशी होते. म्हणून नामधारकाला कलीची बाधा नाही. श्रीराम समर्थ**

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

**ब्रम्हादिक जया लाभासि ठेंगणे । बळिये आम्ही भले शरणागत ॥१॥**
**कामनेच्या त्यागें भजनाचा लाभ । जाला पद्मनाभ सेवाॠणी ॥ध्रु.॥**
**कामधेनूचिया क्षीरा पार नाहीं । इच्छेचिये वाही वरुषावे ॥२॥**
**बैसलिये ठायीं लागलें भरतें । त्रिपुटीवरतें भेदी ऐसें ॥३॥**
**हरि नाहीं आम्हां विष्णुदासां जगीं । नारायण अंगीं विसावला ॥४॥**
**तुका म्हणे बहु लाटे हें भोजन । नाहीं रिता कोण राहत राहों ॥५॥**
**दुजें खंडे तरी । उरला तो अवघा हरि ॥ आपणाबाहेरी । न लगे ठाव धुंडावा ॥१॥**
**इतुलें जाणावया जाणा । कोंडें तरी मनें मना ॥ पारधीच्या खुणा । जाणतें चि साधावे ॥ध्रु.॥**

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

मंगळवार, १४ फेब्रुवारी २०२३

adhunikkesari.com Adhunik Kesari







# जात आणि छत्रपती शिवाजी महाराज

आधुनिक केसरी

जात हा भारताला लागलेला आजीवन कर्करोग आहे. "जातीसाठी खावी माती" म्हणून जाणूनबुजून जात जिवंत ठेवली जातेय. यावर भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी "भारतातील जाती" हा संशोधन निबंध लिहून जात हा विषय किती भयंकर आहे हे सांगितले आहे. वर्ण, जाती-पोटजाती किती समाजविघातक, मानवतेला काळीमा फासणाऱ्या आहेत याचे विवेचन केले. "जोपर्यंत भारतातील जाती नष्ट होणार नाहीत तोपर्यंत राष्ट्र म्हणून एकोप्याची भावना देशात रुजणार नाही. त्यामुळे भारतातील जाती हा राष्ट्रीय नाही तर आंतरराष्ट्रीय प्रश्न झाला आहे. भारतावर आर्य, द्रविड, मंगोलियन, सिंथियन, मुघल, फ्रेंच, पोर्तुगीज, डच, इंग्रज यांनी भारतातील विविध प्रदेशांवर आक्रमणे झाली. क्रांती-उत्क्रांती घडून आल्या. वर्णसंकर झाला. कोणतीच जात किंवा वंश शुद्ध राहिला नाही." असा इतिहास असतांना आज जातीय अभिनिवेश ठासून सांगितले जातात. उच्च शिक्षितसुद्धा 'आमचीच जात-वंश-धर्म श्रेष्ठ' अविर्भावात मोठेपण मिरवतात. एवढ्यापुरते ठीक, परंतु दुर्दैवाने लोकांनी ही कीड महापुरुषांना सुद्धा लावली. आज वेगवेगळ्या जातींनी इथले महापुरुष वाटून घेतलेत.




तहहयात ज्यांनी जाती निर्मूलनाचे कार्य केले, त्यांना सुद्धा लोकांनी जातींच्या कंपूत बंदिस्त केले. हे मोठे भयंकर आणि हस्यास्पद आहे! आज छत्रपती शिवाजी महाराजांना सुद्धा जात, रंग किंवा धर्माच्या कट्टरतेतून पहिले जात आहे. त्यांना जाती-धर्माच्या चौकटीत अडकवले जात आहे. शिवाजी महाराजांनी कोणत्या धर्म-जातीसाठी स्वराज्य उभारले नाही. त्यांना रयत आणि प्राध्यान्याने रयतेचा असलेल्या हिंदू धर्माचे रक्षण करणे हे महत्वपूर्ण उद्दिष्ट होते, परंतु त्याचा अर्थ सांप्रतकाळी लावून हिंदू-मुसलमान धर्मद्वेष पसरवणे असा अजिबात होत नाही. शिवाजी महाराजांचे प्राणपणाने रक्षण केले त्या लोकांनी महाराजांची जात-धर्म पहिला नाही. रयतेच्या अब्रूचे, शेतीचे रक्षण करणारा आपला माणूस हे एकमेव गणित जनमानसाच्या मनीमानसी असल्यामुळेच अठरापगड जातीच्या लोकांना एकत्र करून छत्रपती आपले लोकराज्य उभे करू शकले. शिवाजी महाराजांचे युद्ध कुणाविरुद्ध होते? या संदर्भाने रियासतकार सरदेसाई 'मराठी रियासत'मध्ये लिहितात, "विजापूरकरांशी युद्ध म्हणजे हिंदू-मुसलमानातील युद्ध नव्हे. अशा प्रकारचे स्वरूप त्या युद्धास येणे शक्य नव्हते. शिवाजींची मोठी अडचण विजापूरकरांच्या ताब्यात गुंतलेली मोठमोठी मराठे सरदार घराणीही होती. त्यांच्या मनात शिवाजीबद्दल आदर किंवा पूज्यबुद्धी नव्हती. मोहिते, मोरे, सावंत, दळवी, सुर्वे, निंबाळकर आदि शेकडो सरदार आरंभापासून कमी-जास्त प्रमाणात शिवाजीच्या विरुद्ध होते." एवढेच काय "व्यंकोजी भोसले व मंबाजी भोसले हे अगदी जवळचे भाऊबंदही विरोधी होते. आईकडून नातेसंबंध असलेले जगदेवराव जाधव, राथोजी माने हे सुद्धा विरोधी होते" महाराजांचे नातलगच महाराजांच्या विरोधात होते. याशिवाय शाहिस्तेखान जेंव्हा महाराजांवर चालून आला तेंव्हा त्याच्याबरोबर "महाराष्ट्रातील सुखाजी गायकवाड, दिनकरराव काकडे, रंभाजीराव पवार, सर्जेराव घाटगे, कमलोजीराव काकडे, त्र्यंबकराव खंडागळे, कनकोजीराव गाडे" आदि एतद्देशीय मराठे सरदार महाराजांच्या विरोधात उभे ठाकले. यावरून आपण सहजतेने लक्षात घ्यावे ते म्हणजे, सर्वांची आपापल्या वतनावर, संपत्तीवर निष्ठा होता. रयतेचे निर्भय, सुजलाम-सुफलाम राज्य उभे करण्याचा मानस केवळ छत्रपती शिवाजी महाराजांचाच होता.  याउलट शिवा काशीद, जीवा महाला, बाजीप्रभू देशपांडे, तानाजी मालुसरे, नेताजी पालकर आदि अठरापगड जातीतील मावळ्यांनी "लाख मेले तरी चालतील, मात्र लाखोंचा पोशिंदा जगला पाहिजे" या न्यायाने जीवाची बाजी लावून इतिहासांत अजरामर झाले. तेंव्हा तमाम शिवप्रेमी वाचकांना माझे नम्र आवाहन आहे, कृपया कोणत्याही महापुरुषाला जाती-धर्माच्या कक्षेत बंदिस्त करू नका. त्या त्या काळातील परिस्थितीनुसार त्या माणसांनी केलेले क्रांतिकारी, दैदिप्यमान कार्य आपल्यासाठी नित्य प्रेरणा राहिले पाहिजे. या महामानवांचा संघर्ष आणि कठीण परिस्थितीत त्यांनी आलेल्या प्रसंगी मोठ्या धीरोदात्तपणे उभे राहून विजय संपादन केला. हे कार्य कोणत्या जाती-धर्मासाठी आदर्श नसते. हे कार्य तमाम मानवकल्याणाकरिता दिपस्तंभ असते! याचे मनोमन भान-जाण ठेवून आणि निर्व्यसनी राहून येणारी शिवजयंती साजरी होणे म्हणजेच छत्रपतींना खरा मनाचा मुजरा असेल! जय हिंद! जय शिवराय!




प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068




# पैठण तालुका शिवजयंती अध्यक्षपदी शिवराज पारिख, कार्याध्यक्षपदी असलम पठाण

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** तालुका सार्वजनिक शिवजयंती महोत्सव् २०२३ बैठक संत एकनाथ वाचनालय येथे पार पडली बैठकीत सर्वानुमते शिवराज रामभाऊ पारीख यांची बिनविरोध अध्यक्षपदी निवड करण्यात आली. तसेच कार्याध्यक्षपदी असलम मुसाखान पठाण तर स्वागत अध्यक्षपदी जितू गोपालसिंग परदेशी यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी महेश साळुंके यांची निवड करण्यात आली. सदर बैठकीस मराठा सेवा संघाचे नेते सर्वश्री दत्तात्रय चन्ने, दादासाहेब पठाडे, हरिभाऊ शेळके, अशोक भागवत, गंगाधर पंडित, आतिष गायकवाड, भाऊ निवारे, महेश पवार, विजय सुते, स्वप्निल साळवे, नामदेव खरात, राजू टेकाळे, साईनाथ कर्डिले, गणेश पवार, नीरज पापुलवार, सुरज गोजरे, कृष्णा तावरे, अमोल तुपे, आकाश पगारे, माऊली वाघे, अनिल राऊत, रामेश्वर बावणे, किरण जाधव, सुमित पोटे ,जगदीश गोर्डे, मोतीलाल घुंगासे, चंद्रकांत झारगड, ललित कायस्थ यांच्यासह मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या शिवप्रेमींच्या एका मताने ही निवड करण्यात आली.

# योग्य मोबदला मिळाला तरच महाशिवरात्र गोड

## रताळ्याला किमान दोन हजारांचा भाव देण्याची शेतकऱ्यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज



> दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी आम्ही रताळे पिकाची लागवड केली होती .यावेळी अडीच एकरमध्ये 250 क्विंटल रताळ्याचे उत्पन्न झाले .सध्या व्यापारी शेतकऱ्यांच्या बांधावर येऊन 1200 रुपये क्विंटलप्रमाणे खरेदी करत आहे . शेतकऱ्यास 1500 ते 2000 रुपये पर्यंत भाव मिळायला हवा .त्यामुळे आर्थिक फायदा होऊन शेतकऱ्यांची महाशिवरात्र गोड होईल .
>
> **अरुण सावंत ,शेतकरी ,लोणगाव**

**प्रा.बाळासाहेब बोराडे**

**श्रीक्षेत्र राजूर :** भोकरदन तालुक्यातील लोणगाव येथील शेतकरी अनेक वर्षापासून रताळ्याची शेती करत आहेत. आरोग्याच्या दृष्टीने पोषक असणाऱ्या रताळाची  उपवासाच्या दिवशी फराळ म्हणून मोठ्या प्रमाणात मागणी केली जाते. सध्या शेतकऱ्यांचा रताळ्यांचा हंगाम सुरू झाला असून लोणगाव येथील शेतकरी रताळे काढण्यात व्यस्त आहेत. महाशिवरात्रीला बाजारात मोठ्या प्रमाणात रताळ्याची मागणी असते. त्यातून लाखो रुपयांची उलाढाल होते. योग्य मोबदला मिळाल्यास महाशिवरात्री खऱ्या अर्थाने गोड होईल अशी प्रतिक्रिया शेतकऱ्यांमधून येत आहे.

लोणगाव येथील शेतकरी साधारणतः जून-जुलै महिन्यात रताळ्याची लागवड करतात.  त्यामुळे शेतकऱ्यांकडून महाशिवरात्रीला रताळ्यांची काढणी केली जाते.रताळे हे पीक कमी खर्चात आणि कमी वेळेत हलक्या प्रतीच्या भुसभुशीत जमिनीत उत्तम प्रकारे येते. खरीप हंगामात पावसाळ्यात या पिकाल पाणी भरण्याची देखील गरज भासत नाही. पीक व्यवस्थापन खर्चही कमी असतो. उत्पन्नही बरेपैकी होते.बाजारभाव मिळाल्यास यातून शेतकऱ्यास आर्थिक फायदा होतो म्हणून लोणगाव येथील शेतकरी रताळ्याची लागवड करतात.

रताळे काढणीस आले की त्यासाठी मोठ्या प्रमाणात मजुरांची आवश्यकता असते. रताळे काढल्यानंतर शेतकरी त्यास पोत्यात भरून पॅकिंग करतात. व्यापारी शेतकऱ्यांच्या बांधावर येऊन रताळ्याची खरेदी करतात. काही शेतकरी स्वतःबाजारपेठेत जाऊन किरकोळ पद्धतीने विक्री करतात. बहुतांश शेतकरी व्यापाऱ्यांना होलसेल भावात रताळ्याची विक्री करतात. यावर्षी पाऊसपाणी आणि हवामान चांगला असल्या कारणाने मोठ्या प्रमाणात रताळ्याचे पीक घेतले आहे.भरणपोषण आणि व्यवस्थापन योग्य पद्धतीने झाल्यामुळे पीकही बरदारपणे आले आहे.

# पाकिस्तानात नवा कर

आधुनिक केसरी

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून आर्थिक मदत मिळवण्यासाठी पाकिस्तान कोणतीही अट मान्य करण्यास तयार आहे. याचाच एक भाग म्हणून पाकिस्तान सरकारने नागरिकांच्या वीज वापरावर नवा कर लावण्याच्या प्रस्तावालाही मंजुरी दिली आहे. विशेष म्हणजे शेतकरीही या कराच्या कक्षेत येणार आहेत. पाकिस्तानला आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून लवकरात लवकर १७० अब्ज रुपयांची आर्थिक मदत मिळवायची आहे. अधिकाऱ्यांनी १.१ अब्ज डॉलरचा पुढील हप्ता जारी करण्यासाठी पाकिस्तानच्या सरकारी अधिकाऱ्यांशी १० दिवस चर्चा केली. पण ९ फेब्रुवारीला ते करारावर स्वाक्षरी न करताच ते वॉशिंग्टनला परतले. या चर्चेत पाकिस्तानचे नेतृत्व अर्थमंत्री इशाक दार यांनी केले. शुक्रवारी त्यांनी प्रसारमाध्यमांना सांगितले की, सोमवारपासून दोन्ही बाजूंमधील चर्चा पुन्हा सुरू होईल. ती आभासी स्वरूपाची असेल. त्याआधी काही कृती आवश्यक आहेत. त्यानंतर दार यांनी मंत्रिमंडळाच्या आर्थिक समन्वय समितीच्या बैठकीचे अध्यक्षस्थान केले. यामध्ये विजेवर प्रतियुनियन ३.३९ रुपये विशेष अतिरिक्त अधिभार लावण्याच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. याशिवाय एका वर्षासाठी प्रतियुनिट ३.२१ रुपये त्रैमासिक दर समायोजन आणि सुमारे चार महिन्यांसाठी ४ रुपयांपर्यंत प्रलंबित इंधन खर्च समायोजनाच्या प्रस्तावालाही मान्यता देण्यात आली. इसीसीने शून्य दर असलेल्या उद्योगांना वीज दर अनुदान बंद करण्याच्या प्रस्तावाला देखील मान्यता दिली. शेतकरी पॅकेजवरही बंदी घालण्यात आली आहे. नवीन निर्णय आता १ मार्चपासून लागू होणार आहेत. च्या अटी पूर्ण करण्यासाठी पाकिस्तान सरकारने ही पावले उचलली आहेत. पाकिस्तानातील जनता आधीच गगनाला भिडलेल्या महागाईने हैराण आहे. अशा स्थितीत वीज दरात वाढ केल्याने त्याचा त्रास आणखी वाढणार आहे. इसीसीने संरक्षण मंत्रालयाला ४५ कोटी रुपयांचे तांत्रिक पूरक अनुदान देखील मंजूर केले आहे. आर्थिक स्थिती अत्यंत बिकट असतानाही सरकार संरक्षणावरील खर्चात कोणतीही कपात करण्यास तयार नसल्याचे यावरून दिसून येते.

# दिवस अभ्यासाचे.. काय कसे करायचे ?



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**परीक्षा जवळ आल्या आहेत.हे दिवस अभ्यासाचे, खरे म्हणजे अभ्यासाच्या उजळणी चे आहेत. कारण प्रत्येक विद्यार्थ्याने नियमित वर्षभर,अभ्यास करणे अपेक्षित असते.आजकाल सारख्या टेस्ट होत असतात शाळा कॉलेजात. त्यामुळे ज्यांना अभ्यासाचे,परीक्षेचे गांभीर्य माहिती आहे ते विद्यार्थी टाळंटाळ न करता नियमित अभ्यास करतात.तरीही वार्षिक परीक्षा म्हटली की ताण असतोच. त्यातही १० वी १२ वी चे विशेष दडपण असते.कारण त्यावर पुढील भवितव्य, करियर अवलंबून असते.या रिझल्ट वर पुढील कोर्स ची दिशा ठरणार असते.**

हे दडपण न घेता परीक्षेची तयारी करणे ही प्राथमिक गरज आहे.कारण मला हवा तो कोर्स मिळेल की नाही,हव्या त्या संस्थेत प्रवेश मिळेल की नाही या काळजीत राहिले की त्याचा परिणाम मनस्थिती वर अन् पर्यायाने अभ्यासावर होणारच.तेव्हा पुढचा फारसा विचार न करता, सध्या केवळ परीक्षेवर,अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे.ज्या संकल्पना नीट समजल्या नाहीत त्यावर आधी भर द्यावा. खरे तर कठीण ,सोपे असे काहीच नसते.कठीण देखील पाठ पुरावा करून सोपे करता येते.त्यासाठी वर्गातल्या दुसऱ्या मुलाची,शिक्षकाची,पालकाची मदत घेता येते.आपल्याला जे समजले नाही ते दुसऱ्या योग्य व्यक्ती कडून समजून घेतले की सोपे होते.आपल्याला जे सोपे वाटले,नीट समजले,ते दुसऱ्याला समजावता येते.त्याने आपलीही उजळणी होते.

उत्तरे लिहिताना आधी प्रश्न नीट समजून घेणे गरजेचे असते.त्यासाठी आधी संपूर्ण प्रश्न पत्रिका नीट वाचा. त्यातले आपल्याला सोपे वाटतात ते प्रश्न आधी सोडवा. त्यामुळे लिहिताना च तुमचा आत्म विश्वास वाढेल. त्याचा फायदा अप्रत्यक्ष पणे कठीण प्रश्न सोडवताना होतो.प्रश्नात नेमके काय विचारले आहे ते नीट जाणून घ्या अन् तेव्हढेच मोजक्या शब्दांत पण पूर्णपणे लिहा. कुठलाही मुद्दा सुटता कामा नये. उत्तर पाल्हाळीक नको. अक्षर सुस्पष्ट हवे.हवे तिथे ,मुद्दा संपला की परिच्छेद बदला. CONTINUOUS लिहू नये. काही महत्वाचे शब्द, मुद्दे अधोरेखित करायला हरकत नाही. ते परीक्षकांच्या डोळ्यात भरतात. तुम्हाला समजले हे त्यालाही समजते. गुण व्यवस्थित मिळतात.

विज्ञान,गणित किंवा तत्सम विषयात फिगर, चित्रं,रेखाटने काढावी लागतात. ती देखील सुस्पश्ट अन् बोलकी हवीत.आवश्यक ती सर्व माहिती त्या फिगर मध्ये,चित्रात हवी. चित्र डोळ्यात भरले पाहिजे.ते उत्तरा शी सुसंगत असेल पाहिजे,पूरक असले पाहिजे.

गणित सोडविताना सर्व्य स्टेप्स एका पाठोपाठ यायला हव्या.पाठ केलेले जसेच्या तसे न उतरवता,लोजिकली लिहावे. हेच तत्व भाषे च्या पेपरला लागू होते. वर्णनात्मक उत्तर लिहितांना देखील मुद्देसूद लेखन हवे. विषयांतर करू नये.विचारले एक अन् आपण लिहितोय भलतेच असे गाडी रुळावरून घसरल्या सारखे व्हायला नको.

अभ्यास करतांना,वाचतांना, या भागावर काय प्रश्न अपेक्षित असू शकतात याचा विचार करावा.त्यासाठी बोर्डाचे आधीचे पेपर बघावे. त्यात कोणते प्रश्न नेहमी रिपीट होतात,कोणत्या भागावर नेहमी सारखे प्रश्न विचारले जातात याचा अभ्यास केला,नोंद ठेवली,तर तयारी साठी त्याचा चांगला उपयोग होतो.खरे तर मागचे पेपर पाहून या वर्षीचा पेपर कसा असेल याचा अंदाज घेता येतो.आजकाल संभाव्य प्रश्नांची यादीच आधी प्रसिध्द होत असते.मार्ग दर्शक म्हणुनी त्याचाही उपयोग करता येतो. पण तेव्हढाच अभ्यास करायचा,त्याच प्रश्नांची तयारी करायची असा जुगारही खेळायला नको! अभ्यास करताना काहीही सोडू नये. कठीण पोर्शन देखील उजळणी करावाच. कारण केव्हा काय उपयोगी येईल सांगता येत नाही.कठीण प्रश्नाचा सामना करताना, सर्वच बरोबर नाही तरी काहीतरी सुसंगत उत्तर तुम्ही देऊ शकाल. या तयारीने अभ्यास करावा. उत्तरे



लिहिताना ती ठोकळेबाज पद्धतीने न लिहिता,तुमचे स्वतःचे असे खास वैशिष्ट्य दाखविणारी असली तर त्याचे देखील परिक्षकावर छान इम्प्रेशन पडते.मग एखादी चूक देखील दुर्लक्षित केली जाऊ शकते. प्रश्नाला पूरक असेच उत्तर लिहिणे,मुद्देसूद,विषयाला धरून तेव्हढेच लिहिणे,स्वतःची वेगळी शैली उत्तरातून प्रतिबिंबित होणे,लिहिलेले एकदा तरी तपासून असल्यास चुका दुरुस्त करणे हे सारे यशासाठी,म्हणजेच उत्तम गुण मिळवण्यासाठी महत्वाचे असते.

शेवटी यश अपयश या रीलेटिव टर्म्स आहेत. भरपूर टक्केवारी म्हणजे ९०-९५ टक्के मिळविणारे हुशार , म्हणजे बुध्दीमान असतातच असे नाही. तरी या टक्केवारिवर पुढचे प्रवेश अवलंबून असतात हे कटू सत्य ही नाकारता येत नाही. आपले गुण अन् आपली मार्कांची टक्के वारी हे देखील परस्परांना पूरक असले पाहिजे.तरच आपण पुढे स्पर्धेत टिकून राहू शकू.म्हणजेच विषयाचे आकलन, संकल्पनांची समज,स्वतंत्र विचार करण्याची कूवत जास्त महत्वाची. आपण एखादा विषय शिकतो तो कशासाठी, त्याचा नेमका कुठे काय उपयोग होतो,त्यातल्या कठीण संकल्पना कोणत्या,सोप्या कोणत्या,त्यामागे तर्क काय,कोणत्या समस्या सोडविण्यासाठी त्याचा उपयोग होऊ शकतो या गोष्टीचा विचार अभ्यास करतांना केला की सगळे सहज सोपे होत जाते.एरवी तेच क्लिष्ट, कठीण, रटाळ वाटायला लागते. अभ्यासाचे ओझे न वाटता,अभ्यास करतांना मजा वाटली पाहिजे.आनंद मिळाला पाहिजे.याच आनंदाचे रुपांतर पुढे परीक्षेतील यशात निश्चित होते,याचा विश्वास बाळगा.यश तुमचेच आहे.

अभ्यास केव्हा करावा असाही प्रश्न विचारला जातो.याचे उत्तर तुमच्या सोयीने आवडेल तेव्हा केव्हाही करावा असेच आहे.अर्थात त्यासाठी एकाग्र लक्ष हवे.चित्त स्थिर हवे म्हणजे झाले.. पहाटे उठून शांत वातावरणात अभ्यास करणे केव्हाही चांगले. अनेकांना रात्रीच्या जागरणाचा त्रास होतो.त्यांनी पहाटे उठून अभ्यास करावा.

ज्यांना पहाटे उठण्याचा कंटाळा येतो त्यांनी दिवस,रात्री उशीरा अभ्यास करावा.तुमचे स्वतःचे अभ्यासासाठी तयार असणे जास्त महत्वाचे.सराव प्रश्नाची उत्तरे ठराविक वेळेत लिहून काढण्याची देखील प्रॅक्टिस करावी. ही उत्तरे दुसऱ्याकडून,मित्र शिक्षकाकडून,तपासून घ्यावीत.कोणत्या प्रश्नाला किती वेळ द्यायचा,ठराविक वेळेत सर्व प्रश्नाची उत्तरे व्यवस्थित ,अचूक कशी लिहायची याचा देखील सराव केला तर प्रत्यक्ष परीक्षेत सोपे जाईल.

थोडक्यात कसलेही दडपण मनात न बाळगता आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जा. आताच पुढचा विचार करून ताण घेऊ नका.यश तुमचेच आहे. ते निश्चित मिळणारच याची खात्री असू द्या. बेस्ट ऑफ लक..

# राष्ट्रध्वज देशाचा की धर्माचा ?



सुशील गायकवाड
संपर्क क्र.: 9309474068

आधुनिक केसरी

**भारत देशात १५ ऑगस्ट हा दिवस भारतीय स्वातंत्र्य दिन आणि २६ जानेवारी हा दिवस भारतीय प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा होत असतो. या दोन्ही दिवशी भारतीय ध्वज फडकवीत ध्वजारोहन केले जात असते. हे दोन्ही दिवस आपण राष्ट्रीय सण म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करत असतो. परंतु हा सण साजरा करत असतानाच या प्रसंगी धार्मिकतेला खतपाणी घालण्याचा प्रकार सुध्दा होत असतो. भारतीय संविधानाची अंमलबजावणी ज्या दिवशी करण्यात आली तो दिवसच आपण प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा करत असतो. २६ जानेवारी १९५० साला पासून ते आतापर्यंत हा देश संविधानानुसार चालत आलेला आहे.असे म्हटले जात असते. परंतु याच संविधानाचे उल्लंघन याच दिवशी केले जाते.**

भारतीय संविधानाने देशाचा कोणताही धर्म हा सर्वोच्च म्हणून मान्यता दिलेली नाही.परंतु ज्या दिवशी आपण आपला राष्ट्रीय सण साजरा करत असतो. अशा वेळी मात्र धार्मिक प्रतिमांचे पूजन करून धर्माचेच वर्चस्व पाहायला मिळत असते.

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत, अशी प्रतिज्ञा शाळेत घेतली जाते. आम्ही भारताचे लोक म्हणत असताना भारतीय संविधाना प्रति सुद्धा आदर व्यक्त होत असतो. पण ह्या देशाला कोणता ही धर्म नाही.असे जेव्हा आपले संविधान म्हणते तेव्हा राष्ट्रीय सण साजरा करत असताना धार्मिक प्रतिमा समोर मांडून पूजन करणे हे कितपत योग्य आहे ? हे संविधानाच्या विरोधातच आहे. हे संविधान या देशावर कोणत्याच धर्माची मक्तेदारी चालू देत नाही. मग धार्मिक प्रतिमा वापरून धार्मिक हुकुमशाही गाजवत राहायचे. हे धार्मिकीकरण संविधानास अजिबात मान्य नाही. स्वतःला कोणत्या ही धर्माचे न समजता एक भारतीय नागरिक म्हणून भारतीय नागरिकाने आता याचा विचार करायला हवा. स्वतःच्या मर्जीप्रमाणे वागून धार्मिकतेला अजून खतपाणी घालत बसणार असाल तर हे पूर्णपणे संविधानाच्या विरोधात असेल. जुन्या, रूढी, परंपरा आणि धार्मिकता या सर्वांचाच सामाजिक जीवनावर मोठा पगडा आहे. परंतु हा पगडा कायमपणे जपायचा की नाही हा प्रत्येकाच्या आयुष्याची वैयक्तिक बाब आहे. जेव्हा राष्ट्रीयत्वचा मुद्दा येतो तेव्हा फक्त आणि फक्त भारत, भारतीयत्व आणि आपला भारतीय ध्वज याचाच विचार होऊ शकतो. धर्म सोबत घेऊन राष्ट्रीय सणात धर्माच्या प्रतिमा पूजत धार्मिकीकरण करण्याचा इथे कोणालाच अधिकार नाही. भारतीय संविधाना बाबत आपण विचार करणार आहात की नाही, असा प्रश्न उपस्थित आहेच आहे. दरवर्षी हेच घडत असेल तर आता बदल करून घ्यायला हवा. राष्ट्रीय सणाच्या निमित्ताने इथे फक्त आणि फक्त आपल्या भारतीय ध्वजास महत्व देणे अपेक्षित आहे. राष्ट्रीय सणात इथे धार्मिक पूजन करत असाल तर इथे धार्मिक प्रतिमांचा आणि भारतीय ध्वजाचा संबंध आहे तरी काय ? हेच न समजण्या पलिकडचे आहे. २६ जानेवारी हा दिवस हा खरच प्रजासत्ताक व १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिन म्हणून साजरा होत असेल तर भारतीय ध्वज फडकविण्यापूर्वी धार्मिक प्रतिमांचे पूजन कशासाठी केले जाते.हे धार्मिक प्रतिमा पूजन करणे थांबणे आवश्यक आहे. यावर आता आत्मचिंतन होणे गरजेचे आहे. हा प्रजासत्ताक दिन धर्माचा की धार्मिक प्रतिमांना पूजन करण्याचा दिवस आहे. हे समजून घ्यायला हवे. अनेक शासकीय निम शासकीय कार्यालये, सरकारी व खाजगी शाळा, कॉलेज व स्थानिक स्तरावर सुद्धा याच दिवशी ध्वजारोहण होण्यापूर्वी धार्मिक प्रतिमा ठेवून पूजन केले जात असल्याचे निदर्शनास येत असते. भारतीय नागरिक म्हणून आपण एकत्र येत असतो. इथे कोणताही धर्म महत्वाचा नसतो. तर आपण एक



भारतीय म्हणून भारत देशाप्रति जयघोष करणाऱ्या घोषणा देत असतो.भारतीय ध्वज हा कोणत्याही धर्माचे प्रतिनिधित्व करत नाही. भारतीय ध्वज हा समस्त भारत देशातील विविध जाती धर्मातील लोकांना एकत्रित आणत असतो.हा देश घडण्यात अनेकांचे मोलाचे योगदान आहे. अनेकांनी या देशासाठी स्वतःच्या जीवाची बाजी लावलेली आहे.हे आपल्या देशाचे खरे नायक आहेत.ही लोकं कोणत्याही जात धर्मासाठी न लढता देशासाठी लढली म्हणून तर हा आपला देश सर्वसमावेशक असाच बनलेला आहे. प्रजासत्ताक दिनी आणि स्वातंत्र्यदिनी ध्वजास अनन्य साधारण महत्व असते. ध्वज व्यवस्थित फडकला पाहिजे म्हणून विशेष काळजी घेतली जात असते. ध्वज संहितेचे पालन केले जात असते.परंतु ध्वज फडकण्यापूर्वीच काही ठिकाणी असे धार्मिक प्रतिमांचे पूजन केले जाते.हे का ?आणि कशासाठी ? केले जाते ? भारतीय ध्वजा पेक्षा धार्मीकतेला महत्व दिले जात आहे. काही ठिकाणी असे धार्मिकतेचे प्रकार घडत असल्याने हे प्रकार थांबविण्यासाठी लोकांनीच स्वतः हून बदलले पाहिजे. भारत हा जगातील सर्वात मोठी लोकशाही प्रधान असलेला देश मानला जातो. देशात आजही शासकीय स्तरावर शालेय स्तरावर धार्मिकता जपली जात आहे. वैयक्तिक जीवनात प्रत्येकाला स्वतःची धार्मिकता जपता येते. कुणी कोणती धार्मिकता जपावी हा प्रत्येकाचा वैयक्तिक प्रश्न आहेच. परंतु जिथे राष्ट्रीय सणाचा विषय येतो, जिथे राष्ट्ध्वज फडकेल तिथे मात्र ही धार्मिकता दाखविणे म्हणजे राष्ट्रध्वजा सहित भारतीय संविधानाचा अपमान आहे.ही कृती भारतीय संविधानाचे उल्लंघन करणारी आहे. भारतीय ध्वजारोहण कार्यक्रमात धार्मिक प्रतिमांचे पूजन करणे हे चुकीचे असुन जे संविधान देशाला कोणत्याच धर्माचे वर्चस्व मान्य न करत असताना सुद्धा म्हणजे हा देश धर्माचाच असल्याचे दाखविले जात आहे. हे थांबायला हवे. भारतीय संविधानाची मूल्ये या देशात टिकण्यासाठी सर्वांनीच याचा विचार करायला हवा.आपण आपला धर्म हे जगतच आहोत. परंतू ध्वजारोहण कार्यक्रमात धार्मिक प्रतिमा पूजन हे संविधानास अपेक्षीत नसणारी कृती आहे.असे घडत राहिले तर धार्मिकतचे वर्चस्व आणि हा देश धर्माचाच आहे.अशा धार्मिकता असेच डोके वर करत राहील.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# बेडीतील प्रेम... खरंच... प्रेम म्हणजे काय असतं ?



सचिन कोरडे
90 21 92 0903

आधुनिक केसरी

**प्रेमात अश्रू कितीही प्रामाणिक असले , तरीही भूतकाळ परत आणण्याची ताकद त्यांच्यात नसते. कैदेतूनच जगाला प्रेमाचा संदेश देणारे संत व्हॅलेंटाईन यांना समर्पित. जीवन जगत असताना प्रत्येक जण आपल्या मुलांना समाजामध्ये वावरताना वारंवार वर्तणुकीचे धडे गिरवत असतो. मात्र मुलांची -मुलींची वयाची ठराविक काळात तारुण्यातील प्रेमाचा विषय येतो. पण प्रेम म्हटलं की सर्वत्र भयान शांतता येते. प्रेमाबद्दल कोणीच काही बोलत नाही. प्रेम ही भावना नेमकी काय आहे. विविध पैलू, प्रेमाची विभिन्नता, प्रेमाची व्याप्ती त्यासोबत प्रेमात योग्य वागणूक कशी असावी याविषयी कधीच कोणत्याही शाळेत कॉलेजात व्याख्यानमालेत शिकवल जात नाही.**


हे मोठे दुर्भाग्यच म्हणावे लागेल.
प्रेम ही भावना कशी ओळखावी?
या भावनेची हळुवार हाताळणी कशी करावी?
प्रेमाच्या भावनेत अनियंत्रित झालेले मनाला नियंत्रित कसे करावे? याबाबत शिकवने तर खूप दूरची गोष्ट आहे. या उलट प्रेमाला बेडीतच दाबून ठेवण्याचा कल जास्त आहे. प्रेमाच्या अथांग सागरात तरुणाईच्या मानसिक नौका का भरकटत जातात. त्याचा शोध घेतला तर अशा आढळते की,
प्रेम हे प्रेमाच्या कायम शोधत असते.

जेव्हा एखाद्या व्यक्तीला कायम एकाच व्यक्तीविषयी आकर्षण वाटते, मन त्या व्यक्तीच्या स्वप्नात गुंतते, ती व्यक्ती त्या व्यक्तीच्या संपर्कात नसली तरी देखील त्यांच्यातील प्रेम कमी होत नाही. कधी कधी हे प्रेम अबोल असते. यांच्यात संवाद जरी होत नसला तरी देखील एकमेकांबद्दल कायम आकर्षण वाटून प्रेम निर्माण होऊ शकते.
आयुष्यभराचे पूर्ण सार प्रेमात सामोरे असते.
अशाच आकर्षणात ना कधी कोणत्या अपेक्षा असते ना कोणते मागणी असते बरेचदा तर न सांगता देखील समजून जाते हेच ते खरे प्रेम.
नितांत प्रेम निभवायला योग्य अशा व्यक्तीचे गुणविशेष प्रेमींच्या मनात ठरलेले असतात.
मग या आभासी जगात ह्रदयाच्या ठोक्यामध्ये असे भास होतात की मी जिच्या किंवा ज्याच्या शोधात होतो/होतें तो हाच किंवा ती हीच.
प्रेमाला कुठलिही भाषा नसते, कारण प्रेमाचीच एक वेगळीच परिभाषा असते. प्रेमी युगल न बोलताही नुसत्या डोळ्यांच्या इशारातून प्रेमाची भाषा जाणतात.
समोरच्या व्यक्तीशी व्यक्त केलेल्या प्रेमालाच प्रेम म्हणतात अस हि नाही. न व्यक्त करता ही समोरच्या व्यक्तीने त्या भावना समजून घेणे हे प्रेमच आहे. मनाचे नात्याचे भावनांचे सर्वच गुण जुळले त्याला प्रेम म्हणतात असेही नाही, एखाद्याच्या अवगुणाकडे दुर्लक्ष करून त्याला स्वीकारणे ही सुद्धा प्रेमाची व्याख्या आहे. "एखाद्याच्या जीवनात प्रेम हे विवाह बंधनानंतर सापडलं तर त्या प्रेमाची कसोटी म्हणजे एक कैदच" समाजातील उंची, कुटुंबातील स्थिरता, पोटच्या मुलांचा लळा नष्ट होऊ नये म्हणून, वैवाहिक प्रवासानंतर हे असे मिळालेले प्रेम स्वतःच्या मानसिकतेला कायम विचारांच्या तुरुंगात डंबून सतत स्वतःला कोसत असते. का? मला तू लग्ना अगोदर भेटला नाहीस. कारण त्यांना आजच्या वर्तमान बद्दल बिलकुल तक्रार नसते. पण होऊन गेलेला भूतकाळी तेवढ्याच आठवणींना उजाळा देतो. आज अशा प्रेमी जोडप्यांची इकडे आणि तिकडे विहीर हीच अवस्था घेऊन जगणं असतं. यांच्या प्रेमात ना रोज डे असतो,ना प्रपोज डे असतो, ना हग डे असतो, ना किस डे असतो. एकमेकांवर जीवापाड प्रेम करणाऱ्या या प्रेमी युगोलांना ठराविक वयानंतर झालेले प्रेम ना मित्रासमोर व्यक्त करता येत नाही अन् जवळचा कोणाला सांगता येत. आणि खरंतर मुळातच प्रेम ही व्याख्या समाजालाही मान्य नाही.
आज विसाव्या शतका नंतरही प्रेमाकडे बदल बघण्याचा दृष्टिकोन समाजाचा बदललेला नाही.
याबाबतही मोठी खंत आहे. मुलाला करिअरचं ओझ तर प्रियसीला कुटुंबातून विरोध मग याच सुंदर अशा प्रेमाला बेडीत कैद करत,मनाविरुद्ध लग्न होऊन संसाराचं ओझं मनावर स्वीकारून दोघेही आपापल्या संसारिक दुनियात विराजमान होतात.
पण प्रेम एवढ्यावरच थांबत नाही. हे प्रेमी युगल जर काही ठराविक वर्षानंतर आजच्या ह्या सोशल मीडियाच्या माध्यमातून किंवा एकमेकांच्या परिचया त पुन्हा आले त्यांची अवस्था ही ऐन युद्धाच्या वेळी रथाचे चाक चिखलात बसल्यानंतर झालेली कर्णा प्रमाणे झालेली आहे. कारण आता हे पुन्हा आयुष्यात मिळालेले प्रेमाचे मृगजळ सोबत ठेवून जगायचं तरी कसं? याच विवंचनेतून खूप जण जात आहेत.
याबाबत मनातील धुसपुस कोणाजवळ मांडण सुद्धा त्यांच्यासाठी कैद आहे. विश्वालाप प्रेम संदेश पोहोचवणारे संत व्हॅलेंटाईनच्या नशिबी सुद्धा कैदच की, अशाच प्रकारची विवाहित जोडप्यांच्या नशिबात न दिसणारी बेडी आहे. याच लेखामध्ये हरवलेले प्रेम आज पुन्हा मिळालेल्या अनेक प्रेमींनी त्यावेळी आपल्या प्रेमाला विविध रूपातून झालेला विरोध, आलेल्या वेगवेगळ्या अडचणी मुळे प्रेमाचा त्याग करावा लागला, लग्न रुपी बेडी न बांधता त्या प्रेमाचा त्याग करत भविष्याला, जातीला, नात्याला, अशा इतर कारणांमुळे घरच्यां लोकांच्या विचारांना प्राधान्य दिले. आज तेच प्रेम वयाचा ठराविक टप्पा



संपल्यामुळे आज तरी आपला व्हॅलेंटाईन डे साठी आपल प्रेमाचे मन मोकळे करून आपापले विचार सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांच्या मते आज पुन्हा प्रेम भेटल आहे. प्रेमाची सुंदर तर व्याप्ती आहेच, हा आनंद आहे. पण चालताना पायाला ठेच लागलेली आहे. व ती जखम अर्धिकाची बरी झालेली आहे. मात्र या जखमेवर पुन्हा काहीतरी लागावं आणि त्या वेदना काळजाला छळणाऱ्या जेवढ्या तीव्र असतात. त्याहीपेक्षा तीव्र वेदनेने घासलेले युवक युवतीचे गृहस्थ व गृहिणी आपलं बेडीतील प्रेम. नाव न घेण्याच्या अटीवर एका प्रतिष्ठित प्रोफेसर सरांनी व्यक्त केली. तर आई वडिलांनी त्यांनी ठरवलेल्या समाजातील प्रतिष्ठेसाठी,स्वतःच्या प्रेमाचं बलिदान दिलेल्या नामांकित व्यापाऱ्याच्या मते हे जीवन एक क्षणभंगुर तरी आज मित्र संसार पत्नी मुलं आई-वडील यांच्यात जरी मी आनंदी राहण्याचा प्रयत्न करतो कारण मनाच्या कोपऱ्यातील एक सल कायम आहे. कारण मनाच्या व्यवसाय मध्ये आहे, पती-पत्नी म्हणून जे नात्याची देवाण-घेवाण झालेले आहे. ती पत्नी म्हणून होऊ शकते प्रियसी म्हणून नाही. आणि पत्नी सोबतच एक प्रियकर पती म्हणून वागण्याची ती जी खोटी कसरत करायला लागते, तो जो त्रास होतो ह्या त्रास होतो मुक्ती मिळण्यासाठी असं वाटतं की, योगी साधू प्रमाणे आपणही सर्व गोष्टीचा त्याग करत जगाच्या पाठीवर निस्वार्थ प्रेमाचा एक वेगळा संदेश देण्यासाठी जीवनप्रवास करावा.
नकळत प्रेमातून उच्च खंडपीठात कशी वकिली सुरू झाली, हे प्रेमातूनच घडलेल्या नामांकित वकिलाने सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. बारावी ते फर्स्ट इयर च्या काळात एकतर्फी निस्वार्थ प्रेम झालेल्या व्यक्तीने कॉलेज काळ संपत आला असता प्रेम व्यक्त केले, मात्र समोरच्या कॉलेज तरुणीने प्रेमाला स्पष्ट नकार देत चालू आर्थिक, शैक्षणिक परिस्थितीच जाणीव करून दिली. व शिक्षणाच्या शेवटच्या वर्षी त्या तरुणीचे लग्न झाले त्यानंतर या तरुणांने मनाला आवर घालत एक दृढ निश्चय करून ग्रामीण भागातून संभाजीनगर शहरात पुढील शिक्षण घेऊन नामांकित वकील झाले, विवाह केला. आज कालांतराने फेसबुक सारख्या सोशल मीडिया माध्यमातून या दोघांची पुन्हा ओळख झाली.
आज तू तुझं करिअर घडवलं त्याबद्दल ती आनंदी तर आहेच, पण त्याकाळची तरुणी व आजची ग्रहीनी बोलते माझे तुझ्यावर प्रेम त्यावेळीही होते आणि आजही आहे. पण आपले सामाजिक संस्कृती, संसारिक ओझ, मुलाबाळांचा आयुष्य, माहेर-सासर व समाजामधील मान_सन्मान अशा उंच च्या उंच भिंती असलेल्या कैदेत आज हे प्रेम पूर्णतः बेडीत अडकले आहे. पुण्यातील नामांकित कंपनीत सॉफ्टवेअर इंजिनियर असणाऱ्या तरुणीने समाजातील जात धर्मामुळे प्रेमाचे विवाहात रूपांतर न झाल्यामुळे तिच्या प्रेमाची व्याख्या वेगळाच पद्धतीने मांडली आहे. लग्न करून फक्त शरीरावरती अधिकार गाजवता येतो, मनावर अधिकार गाजवण्यासाठी ध्येयभान हरवून जीवापाड प्रेम करावं लागतं. स्वामी विवेकानंद यांनी सुद्धा सांगितला आहे की, जीवनात जास्तीत जास्त नाती असणे महत्त्वाचे नाही, नात्यांमध्ये जीवन असणं खूप महत्त्वाचा आहे. प्रेम म्हटलं की, पहिले नाव आपल्या ओठावर येते. ते म्हणजे राधा-कृष्ण भगवान श्रीकृष्ण यांच्यामते त्यांना भेटल्यावर किंवा त्यांची आठवण आल्या नंतर सुद्धा जगण्याची इच्छा वाढते. म्हणजेच तेच खर प्रेम..! प्रेमाला ना वयाचं बंधन ना कुठल्या अपेक्षांचं ओझं...आपलं प्रेम स्वीकारणं किंवा नाकारणं हा नशिबाचा भाग असतो... खऱ्या प्रेमात त्यानं काहीच फरक पडत नाही...एखाद्यावर असं निरागस, निर्मळ,प्रेम करायला मिळणं किंवा तसं ते लाभण ही ईश्वराकडून मिळालेली अप्रतिम भेट असते ...
आपल्या आवडत्या माणसाचं आपल्या सोबत असणं ही आयुष्यातील सगळ्यात मोठी कमाई... ती प्रत्येकाच्या वाट्याला येतेच असं नाही... आजकाल अशी माणसं भेटतात तरी कुठे ? नशिबानं कधी भेटलीच तर हळुवार जतन करून ठेवावीत....
कदाचित पुन्हा भेटतील असे नाही.
"लोक म्हणतात की, रिकाम्या हाताने आलो होतो रिकाम्या हाताने जायचं आहे.
पण ते खोट आहे." "कारण म्हणून जाताना कुणालाही न सांगता येणार अनेक वेदना, दुःख, सोबत घेऊन जात असतो."

# आनंदाने कसे जगावे याचा कानमंत्र



उद्धव भयवाळ
संपर्क क्र. ८८८८९२५४८८

आधुनिक केसरी

**जगावे कसे याबद्दल जितके बोलावे, जितके लिहावे तितके थोडेच आहे. त्यातही आनंदाने कसे जगावे याबद्दलही बरेच सांगण्यासारखे आहे. या बाबतीत एक महत्त्वाचे असे सांगता येईल की, आपण आपली विनोदबुद्धी जोपासली पाहिजे. विनोद जर आपल्या जीवनात नसता तर आपले जीवन रुक्ष आणि कंटाळवाणे झाले असते. विनोदाला जोडूनच येते हास्य.**

एका पैशाचाही खर्च नसलेला पण तुमच्या देखणेपणात भर टाकणारा उपाय म्हणजे हास्य. तुम्ही हसाल तर सारे जग तुमच्याबरोबर हसेल; पण रडलात तर एकटेच रडत बसाल. मूल जन्माला आल्याबरोबर रडते. तेवढेच एक रडणे सर्वांना आनंद देणारे असते. त्यावेळी मिठाई वाटून आनंद साजरा केला जातो. त्यानंतर मात्र आयुष्यात रडणाऱ्याला कुणीच साथ देत नाही. आपण हसतो म्हणून आनंदी राहू शकतो. म्हणून मनापासून हसा. समाधानाने हसा. आनंदी व्हा. आनंदी रहा. चिडचिडेपणाने आणि ताणलेल्या चेहऱ्याने घरी जाण्याऐवजी मजेत शिट्टी वाजवीत घरी जावे. याचा नक्की उपयोग होतो.

त्रागा करण्यापेक्षा विनोद्बुद्धीने परिस्थितीकडे पाहिले तर ताण हलका होतो. प्रश्न लवकर सुटतात. संबंध बिघडत नाहीत. विनोदाने परिस्थितीत बदल घडवता येत नसला तरी त्याने वेदनेची तीव्रता कमी व्हायला मदत होते. या संदर्भात आचार्य अत्र्यांचा एक किस्सा या ठिकाणी आठवतो. एकदा आचार्य अत्रे सिनेमा थियेटरमध्ये सिनेमा पाहण्यासाठी गेलेले असतांना त्यांच्या समोरच्या खुर्चीत पागोटे घातलेला माणूस बसला होता. सिनेमा सुरू झाला पण त्या माणसाच्या पागोट्यामुळे अत्रेसाहेबांना सिनेमा काही दिसेना. तेव्हा त्या माणसाला अत्रेसाहेब म्हणाले, "तुम्ही सिनेमा पहा. अगदी निश्चिंत मनाने पहा. पण अधून मधून त्या सिनेमाची थोडी थोडी स्टोरी मलासुद्धा सांगा. कारण तुमच्या पागोट्यामुळे मला काहीच दिसत नाही." हे ऐकताच त्या माणसाने निमूटपणे पागोटे काढून मांडीवर ठेवले. या ऐवजी अत्रे जर त्याला म्हणाले असते की, "ओ मिस्टर, ते पागोटे काढा. मला सिनेमा दिसत नाही." तर तो म्हणाला असता, "मी तिकीट काढलंय. आणि पागोट्याचं काय? वरच्या छतापर्यंतची जागा माझी रिझर्व आहे." हा किस्सा आचार्य अत्र्यांनीच एका पुस्तकात सांगितलेला आहे.

आणखी एक म्हणजे, नेहमी सन्मानाने जगावे. आपल्या जगण्याची आपणास लाज वाटेल असे जगू नये. यासंबंधी एक उदाहरण द्यावेसे वाटते. एकदा एक गृहस्थ आपल्या तेरा-चौदा वर्षांच्या मुलासोबत बसमध्ये चढले. त्याआधीच त्यांनी मुलाला बजावले की, "तू तुझे वय बारा वर्षांपेक्षा कमी सांग. म्हणजे अर्ध्या तिकिटाचे पैसे वाचतील." मुलगा थोडा बुचकळ्यात पडला. आपले वडील आपणास खोटे बोलायला शिकवितात याचे त्याला आश्चर्य तर वाटलेच. पण दुःखही झाले. अशा वडिलांविषयी त्याला आदर वाटेल का, हे आपण जणू शकतो.

मुलांना खोटे बोलण्याची सवय आपणच लावतो; आणि मोठेपणी मुलगा सफाईदारपणे खोटे बोलू लागला की, दोषही आपणच देतो. हे योग्य आहे का, हे आपणास ठरवायचे आहे.



नैतिकतेला आपल्या जीवनात मोठे स्थान आहे. आपण नेहमी नैतिक मूल्ये जपली पाहिजेत. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन एक ख्यातकीर्त वकील होते. एकदा एका गृहस्थांनी त्यांना त्यांचा खटला चालविण्याची विनंती केली. खटल्याची पूर्ण माहिती त्या गृहस्थांकडून ऐकून घेतल्यानंतर अब्राहम लिंकन त्या गृहस्थांना म्हणाले, "मी तुमची सर्व केस समजून घेतली आहे. तांत्रिकदृष्ट्या ही केस खूप मजबूत आहे. पण नैतिकदृष्ट्या खूपच कमजोर आहे. म्हणू मी तुमच्यातर्फे ही केस लढवू इच्छित नाही. कारण जेव्हा कोर्टामध्ये मी या खटल्याच्या संदर्भात युक्तिवाद करीन, तेव्हा प्रत्येक वेळी माझे मन मला खात राहील की, 'लिंकन तू खोटे बोलत आहेस. लिंकन तू खोटारडा आहेस.' त्या वेळी मी स्वतःला क्षमा करू शकणार नाही.

त्याचप्रमाणे आपला दृष्टीकोन नेहमी सकारात्मक ठेवावा. नशिबाने तुमच्या हातात तलवार दिली आहे. तिला मुठीकडून सुरक्षितपणे पकडायचे की, पात्याकडून धरून हात कापून घ्यायचा हे ठरवता आले पाहिजे. आपला दृष्टीकोन नकारात्मक कधीच नसावा. नकारात्मक दृष्टिकोनाचे एक उदाहरण आपण पाहू. एका वक्त्याने सभेमध्ये एकदा एक पांढरा शुभ्र कापडी फलक लावला आणि त्यावर एक छोटासा काळा ठिपका दिला. त्यानंतर त्याने श्रोत्यांना विचारले, "आपणास इथे काय दिसते?" तर सर्वांनी सांगितले, "एक काळा ठिपका दिसतो." या उदाहरणामध्ये श्रोत्यांना एवढा मोठा पांढरा फळा नाही दिसला; आणि छोटासा काळा ठिपका दिसला. यालाच म्हणतात नकारात्मक दृष्टीकोन. तुम्हाला कुणी गुलाबाचे फूल दिले तर सुगंधाचा, रंगाचा आस्वाद घेणार की, त्या फुलाच्या काट्यांकडे बघत बसणार?

दुसरे म्हणजे कुठलीही गोष्ट आत्मविश्वासाने करावी म्हणजे यश हमखास मिळते. या ठिकाणी जर स्वतःच्या कुवतीविषयी शंका आली तर होणारे कामही बिघडू शकते. हनुमानाची गोष्ट आपल्याला माहित आहे. त्याच्या कुवतीचा त्याला विसर पडला आणि समुद्रावरून लंकेला जाता येईल की नाही याविषयी त्याचा आत्मविश्वास डळमळीत झाला. ज्यावेळी नळ, नीळ, जांबुवंत यांनी त्याला त्याच्या शक्तीची जाणीव करून दिली, तेव्हा त्याचा आत्मविश्वास जागृत झाला.जे अटळ आहे, अपरिहार्य आहे, त्याचा खुल्या मनाने स्वीकार करावा. जे आपल्या हातात नाही त्याविषयी खेद करू नये. प्रयत्नात कसूर करायची नाही. पण अपेक्षित फळ मिळालं नाही म्हणून नाराज व्हायचं नाही. आपली सहनशीलता वाढवायची. कुणी दिलेली वेळ पाळली नाही किंवा कुणी आपल्याशी विनाकारण भांडले तर आपणास खूप मनस्ताप होतो. याठिकाणीच आपल्या सहनशक्तीची खरी कसोटी लागते. अशावेळी आपल्या मनाचा तोल ढळू देऊ नये. कारण ज्याने स्वतःचे मन जिंकले, त्याने जग जिंकले. मला वाटते, "आनंदाने कसे जगावे?" याचे उत्तर आपल्याला या लेखामधून नक्कीच मिळाले असेल.

# श्रीगुरुवन्दनम्

आधुनिक केसरी




मागच्या शतकातील थोर संत श्रीगुरू भगवानशास्त्री महाराज सोनपेठकर यांची पुण्यतिथी माघ वद्य नवमीचे दिवशी महाराष्ट्रात सर्वत्र साजरी केली जाते. या निमित्त श्रीगुरुंचे अंतरंग शिष्य ह.भ.प. डॉ. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर यांची रचना असलेले श्रीगुरुंचे संस्कृत अष्टक प्रकाशित करून याद्वारे आधुनिक केसरी परिवार देखील श्रीगुरू सोनपेठकर महाराजांना विनम्र अभिवादन करीत आहे.

श्रीसजुयशवन्तौ तौ धन्यौ हि पितरौ यथा।
आचार्यौ परमौ वन्द्यौ शङ्करलक्ष्मणौ तथा।।१।।



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

माता सजुबाई आणि पिता यशवंतशास्त्री जसे धन्य होत तसेच आचार्य शङ्करशास्त्री व आचार्य लक्ष्मणशास्त्री परम वंदनीय होत.

स्वर्णपीठं हि ज्ञानस्य भूषितं येन सर्वथा।
न्यायवेदान्तशास्त्रस्य विख्यातः प्रपितामहः।।२।।

ज्ञानाचे सुवर्णपीठ त्यांनी सर्व प्रकारे भूषविले, न्यायवेदांतशास्त्राचे ज्येष्ठ आचार्य अशी त्यांची ख्याती आहे.

विश्वेशनगरस्थां तां विद्वज्जनसभां पराम्।
जित्त्वा गुरुप्रसादेन पुरस्कारमहोदधिम्।।३।।

काशीनगरीतील श्रेष्ठ अशी विद्वत्सभा गुरुकृपेने जिंकली. त्यांना महोदधि म्हणून पुरस्कृत करण्यात आले.

ऋष्याश्रमे यथापूर्वं ज्ञानं भक्तिश्च कर्म च।
निवसन्ति चरित्रेऽस्य योगत्रयं च सर्वदा।।४।।

जसे पूर्वी ऋषींच्या आश्रमात तसे यांच्या चरित्रात ज्ञान, भक्ती, कर्म हे तीनही योग नेहमी एकत्र राहतात.

रेणुकाभक्तिभावोऽस्य योगानन्दकुलोद्भवः।
विद्यारत्नं नमामीशं भगवन्तं परात्परम्।।५।।

स्वामी योगानंदकुलास साजेसा श्रीरेणुकाभक्तिभाव ज्यांचा आहे, त्या विद्यारत्न परात्पर अशा श्रीगुरु भगवानमहाराजांना मी नमस्कार करतो.

कृपासिन्धुर्दयासिन्धुर्ज्ञानसिन्धुर्द्विजोत्तमः।
प्रीतिकरः प्रसन्नात्मा सर्वेषां प्रियकारकः।।६।।

ते कृपासिंधु आहेत. दयासिंधु आहेत. ज्ञानसिंधु आहेत. द्विजश्रेष्ठ आहेत. प्रेम करणारे, प्रसन्न असणारे व सर्वांचे प्रिय करणारे आहेत.

भागवते मतिर्यस्य तैलबिन्दुरिवाम्भसि।
भक्तजने तथा प्रीतिश्चन्द्रमसि यथा सुधा।।७।।

श्रीमद्भागवतात ज्यांची मती पाण्यातील तैलबिंदूप्रमाणे होती, भक्तजनांवर चंद्रस्थ अमृताप्रमाणे त्यांची प्रीती आहे.

भवस्य शृंखलां छेत्तुं भवतु तत्कृपा सदा।
गायामि कीर्तनं तस्य यावदस्मीह भूतले।।८।।

भवशृंखला पार करण्यासाठी त्यांची कृपा नेहमी असावी. जो पर्यंत मी या भूतलावर आहे, त्यांचेच कीर्तन गातो.

स्तोत्रमिदं परावाचा चन्द्रहासोक्तमिष्टदम्।
अर्पितं तेन सर्वं हि गुरुपादरजःकणे।।९।।

चंद्रहासाने इष्टद असे हे स्तोत्र परावाणीने वदिले आहे. त्याने सर्व काही गुरुपादरजःकणी अर्पण केले आहे.

# प्रेम मायेचं ! प्रेम स्नेहाचं ! प्रेम निर्मल मनाचं !!



मल्हारराव डोणगांवकर
संपर्क क्र. ९६३७९३७५७९

आधुनिक केसरी

**प्रेम ! प्रेम ! प्रेम ! प्रेम ! असाव तरी कसं ? मनापासून केलेलं प्रेम हे प्रेमच असतं हे वास्तविक सत्य कुणालाही नाकारता येणार नाही. तसेच प्रेम हे आंधळ असेही म्हटले जाते. जात, पात, धर्म, पंथ, ऊंच, नीच या भिंतीच्या पल्याड जाऊन वाहतो नितळ प्रेमाचा झरा तोच प्रेमाचा निखारा खरा. तुम्ही प्रेम कुणावरही व्यक्त करु शकता. प्रेम हे आदरयुक्त भावनेनं मोठया मनाने ही करता येते. मोठयांचा, वयोवृध्दांचा, जेष्ठांचा आदर करुन दोन प्रेमाचे शब्द बोला. मुक्या प्राण्यांवर प्रेम करा. पशु पक्षांना आधार देऊन, दाने खाऊ घालून प्रेम व्यक्त करा. दिव्यांग-पिडीतांच्या वेदनेला फुंकर घालून प्रेमभाव व्यक्त करा. अज्ञानाशी ज्ञान संघ करुन प्रेम ज्योत जगवा.**

प्रेम ! प्रेम ! प्रेम ! प्रेम ! असाव तरी कसं ? मनापासून केलेलं प्रेम हे प्रेमच असतं हे वास्तविक सत्य कुणालाही नाकारता येणार नाही. तसेच प्रेम हे आंधळ असेही म्हटले जाते. जात, पात, धर्म, पंथ, ऊंच, नीच या भिंतीच्या पल्याड जाऊन वाहतो नितळ प्रेमाचा झरा तोच प्रेमाचा निखारा खरा. तुम्ही प्रेम कुणावरही व्यक्त करु शकता. प्रेम हे आदरयुक्त भावनेनं मोठया मनाने ही करता येते. मोठयांचा, वयोवृध्दांचा, जेष्ठांचा आदर करुन दोन प्रेमाचे शब्द बोला. मुक्या प्राण्यांवर प्रेम करा. पशु पक्षांना आधार देऊन, दाने खाऊ घालून प्रेम व्यक्त करा. दिव्यांग-पिडीतांच्या वेदनेला फुंकर घालून प्रेमभाव व्यक्त करा. अज्ञानाशी ज्ञान संघ करुन प्रेम ज्योत जगवा.

स्वतःचे आयुष्य हे जीवन अमुल्य वरदान आहे, यावरही प्रेम करायला शिका. तसे पाहिले तर माता-पिता हे जगातही सर्वश्रेष्ठ समजले जातात. आईची माया, ममता, वात्सल्याने मुला-मुली प्रती ओतपोत भरलेले प्रेम हेच खर प्रेम होय. तेंव्हा आजच्या तरुणाईने प्रेमाच्या नावाखाली इतरत्र न भरकटता माता - पितावर प्रेम करायला शिका. याच विचाराने प्रेम निर्मल मनाच, अस्सल प्रेम माता पिताच या नुसार मी काव्यगीत तयार केले आहे ते खालील प्रमाणे.

जगणे प्रेमाचे

***लहानाहुनी लहान व्हावे***
***आईचे ही गुणगाण गावे***
***सुविचार मनी धरावे***
***या जगण्यावर प्रेम करावे***
***थोरांचे ही बोल ध्यानी घ्यावे***
***कणाकणाने साठवीत जावे***
***काही न राहिल त्याशी उणे***
***हेची विचार मनी धरावे.***
***प्रेम करुनी पुरुन उरावे***
***फुलासारखे फुलमय व्हावे***
***काट्यातुनही कोमल व्हावे***
***कोकीळे सारखे मधुर गीत गावे***
***सगळयांना तृप्तही करावे***
***या जगण्यावर प्रेम करावे***
***हेची विचार मनी धरावे***
***आईचेही गुणगाण करावे***
***नदी मिळे आफाट सागरा***
***पाण्याचा गुण घ्यावा खरा***
***प्रेमभाव ही वाहात करा***
***जागृत पवित्रतेची कासही धरा***
***या जगण्यावर प्रेम करावे***
***हेची विचार मनी धरावे***
***प्रेम करुनी पुरुन उरावे***
***आईचे ही गुणगाण गावे***
***वृक्षवल्ली वाढे भराभरा***
***दिन जणांना देऊ आसरा***
***सकट समयी धावून जावे***
***दुःखी दुरीतांना हसवावे***
***सदा नि सदा प्रफुल्लीत रहावे***
***अरे माणसा माणूस म्हणूनी जगावे***
***या जगण्यावर प्रेम करावे***
***हेची विचार मनी धरावे***
***आईचे ही गुणगणा गावे***
***प्रेम करुनी पुरुन करावे***

हे वरील काव्यगीत मागील पाच वर्षापूर्वी काही वर्तमान पत्रकातून प्रकाशित झाले. या काव्य लेखनामळे चार ते पाच सेवाभावी संस्थांच्या वतीने मला उत्कृष्ट काव्यलेखक म्हणून चार-पाच सन्मानपत्र, गौरव पुरस्कारही मिळाले आहे. परंतु प्रेमाच्या नावाखाली आंधळा व्याभिचार वाढत चालला आह. नैतिकताची मुल्ये ही लयास जातात की काय अशी भयावह परिस्थिती येऊन ठेपली आहे. प्रेमाच्या नावाखाली ऊतावीळपणा, आततायीपणा थांबणे गरजेचे आहे. प्रेम म्हणजे परिपूर्ण त्याग, निख्खळ, निर्मळ मनाने, ओतपोत भरलेल, जिव्हाळयाचं, मनसोक्तपणे, ह्दयाला, मनाला भिडणारं, एक आपुलकीची, मैत्रीच अतुट, अवीट, मैत्रीच नाते न तुटणारं म्हणजेच अस्सल प्रेम होय. तसेच प्रेम ही एक सुंदर भावना आहे. कुणासाठी तरी तिळतिळ तुटणार काळीज म्हणजे प्रेमच आहे. यासाठी आपलं नि परक यास्नी समजावून घ्याव लागत व मनापासून प्रेम कराव लागतं. तेंव्हाच प्रेम हे असाव तरी कस ? हे कळतय अन्यथा नाही.



दोन मनाचे पवित्र बंधन म्हणजे प्रेम. मी असेल, तू असेल, अन्य कुणीही असेल तरीही दोन्हीही बाजूने मनापासून केलेल प्रेम हे खरे असते व ते दिर्घकाळ किंवा आयुष्यभर टिकते. एकमेकांना बघून, शारीरिक आकर्षणापायी निर्माण झालेल प्रेम हे कुचकामी, दिखावू, क्षणभंगूर असते. हे प्रेम फार तर १ ते २ वर्षच टिकते. नंतर काही कारणास्तव घासाघीस, दुरावा निर्माण होऊन ताटातुट होते. असे मानसशास्त्रांच्या अभ्यासकांनी आपल्या विचार भुतिकेतुन मांडणी केली आहे. खर प्रेम असाव तरी कसं ? यासाठी राधा-कृष्णाची प्रेम लिलया व सत्यवृत्त प्रेमकथा आपण वाचली असेल, ऐकली असेल. असे नितांत, उदार, सरल, कोमल मनाने आंतरिक पवित्र बंधनाचे प्रेम असायला हवे. यालाच तर खरं प्रेम म्हणाव. तसे पाहिले तर अन्य नामांकित व्यक्तीच्या प्रेमकथाही आपण ऐकल्या असेल, किंबहुना डोळयांनी पाहिल्या असेल. उदा. लैला-मजनु, हिर-रांझा हे प्रेमासाठी एकमेकांची प्राण देण्यासाठीही मागेपुढे पाहत नाही. हे पण ऐकण्यात आले. सिनेसृष्टीतही काही अभिनेत्यांनी प्रेम केले व त्या प्रेमात बुडालेल्या तुरुणी बरोबर लग्नही करुन आपला सुखी संसार थाटला हे काही अंशीच खर ठरलं. शेवटी प्रेम हे प्रेमच असत हे मान्य करायलाच हवं.

परंतु सद्यस्थितीत तरुण व युवा पिढीला काय झाले कुणास ठाऊक ? प्रेमाच्या नात्याखाली उतावीळपणा व आततायीपणा हैदोस घातला आहे. आज तुम्ही सकाळीच वर्तमानपत्र उघडताच किंवा टी.व्ही. चॅनल मिडियावर बातमी बघतांना दररोज प्रेम प्रकरणांच्या नको त्या घटना घडतांना दिसत आहे. काय तर एकतर्फी प्रेमामुळे मुलाची किंवा मुलीची आत्महत्या. त्याने दुसरीशी लग्न केलं म्हणून प्रेमिकाची व औषध विषारी पिऊन किंवा रेल्वे समोर उडी मारुन जीवनज्योत संपविले. या वाह्यात, दिखाऊ, धोकेबाज, नाटकी प्रेमामुळे अनेक सुखी संसाराची धुळधान होत आहे. तेंव्हा आजच्या तरुण तरुणीने हे पण समजावून घेणे गरजेचे आहे, ऊतावीळपणाचे, आततायीपणाचे प्रेम करुन कुणाला कशाला बरबाद करायचे किंवा स्वतःही बरबाद व्हायचे ? एखाद्या मुलीने तक्रार दिली म्हणजे तिला धमकी देऊन अंगावर, तोंडावर ॲसिड फेकायचे. तरीही तयारी नसेल तर तिचा खुन करण्या इतपत खालची नीच पातळी गाठायची ? हे कुठले पे्रम. ती का तयार नाही ? मी कुठे चुकलो ? याच्या मुळाशी जाऊन विार करायला हवा. बळजबरी दाखवून तिचे संपूर्ण आयुष्य बरबाद करायचे कशासाठी ? तिला पण समाजात वावराव, रहाव लागत, जगाव लागतं. प्रेमाचा प्रस्ताव मांडायचा व तिने तो मान्य केलाच पाहिजे हा आग्रह, खटाटोप कशासाठी ? अशा प्रेमात खर प्रेम नसतच. मुळात आकर्षण व वासना असतात. त्या आहारी जाऊन मग हे युवा आततायीपणाचा कळस काढून त्या मुलीला जीवनातून संपविण्याचा प्रयत्न करतात.

जर अमुक-तमुक मुलीचेही माझ्यावर खर प्रेम असेल, तर तिने नकारच दिला नसता, हे तरुण युवा कधी समजून घेणार. अशा प्रेमकथा, घटना वाढून नको त्या जीव घेण्या घटना सद्यस्थितीत वरचेवर वाढत आहे. तेंव्हा याला बऱ्याच अंशी जबाबदार कोण ?

साहजिकच म्हणावे लागेल की, चित्रपट, निर्माते, दिग्दर्शक, अभिनेते, उ*ताण, भडक, अर्धांग कपडे घालणाऱ्या अभिनेत्री तर जबाबदार नाही ना ? अशी शंका निर्माण होते. तर काही चित्रपटातून, मालिकातून प्रेमाचा अतिरेक, नंगानाच, हैदोस याद्वारे दाखविला जातोय. यामुळे खऱ्या प्रेमाला कुठेतरी गालबोट लागत आहे. अनैतिकतेचा कळस गाठून खरं प्रेम करणारी युवक, युवती बदनाम होत आहे. सद्यस्थितीतही होणारे पे्रम हे खरे प्रेम राहिले नसून या प्रेमात विश्वासघात, धोकाधडी वाढली आहे. अस म्हणतात की जे खर मनापासून, आंतरिक भावना, पावित्र्यतेने प्रेम करतात ते देवलाही मान्य असते. म्हणूनच तर श्रीकृष्ण व राधाचे प्रेम हे संपूर्ण जगाने व मानवतेनेही मान्य केले आहे. तसेच आई वडीला प्रती असणारे मायेचं प्रेम हे सर्वश्रेष्ठ मानले जाते. त्यांचे गोडवे कायमस्वरुपी गायले जातात. तेंव्हा खर प्रेम असाव तरी कसं ?

# पाटी पेन्सिल : अभ्यासपूर्ण विवेचन!

आधुनिक केसरी


**पाटी पेन्सिल या पुस्तकातही वाकचौरे यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण असे पस्तीस लेख लिहिले आहेत. शिक्षण क्षेत्र एक महासागर आहे. कितीही दूर जा, कितीही खोलवर जा, हाती अमृतच येईल. जेव्हा संदीप वाकचौरे यांच्यासारखे पट्टीचे अभ्यासक या महासागरात यथेच्छ विहार करतात त्यावेळी त्यांना शंख, शिंपले, मोती याप्रमाणे काही नको असलेल्या गोष्टीही सापडतात. नंतर यथावकाश ते सापडलेले सारे काही अक्षराच्या कोंदणात बसवून सादर करतात.**

विद्यार्थ्याला या ना त्या कारणाने शाळेतून बाहेर काढणे हे बालमनाला नैराश्यात ढकलणारे आहे. त्याच्या आत्मसन्मानाला धक्का देणारे आहे. हा धक्का मुलांच्या मनावर आणि शरीरावर दीर्घकाळ परिणाम करणारा असतो. अशा आशयाचे विचार पाटी पेन्सिल या लेखात मांडून लेखक शाळेतील फी ठरविण्याचा अधिकार पालक सभेला द्यावा अशी सूचना करतात तेव्हा आठवते, शाळा-शाळांमधून असणाऱ्या पालक सभा कार्यान्वित आहेत का ? शाळा, शिक्षक आणि विद्यार्थी या त्रिकोणात पालक कुठे असतात ? केवळ पालक सभेला हजेरी लावली म्हणजे संपले सारे असे होते का ? खेडोपाडी तर अनेक वेळा पालक समिती सदस्यांच्या घरी जाऊन स्वाक्षऱ्या घ्याव्या लागतात हे चित्र बरोबर वाटते का ?

'भुकेचे करायचे काय ?' या लेखात लेखकाने जागतिक भूक निर्देशांकाची चर्चा करताना शालेय पोषण आहाराचे वास्तव समोर ठेवले आहे. शालेय पोषण आहाराचा विद्यार्थ्यांच्या उपस्थितीवर सकारात्मक परिणाम झाला आहे का हा खरा संशोधनात्मक विषय आहे. शरीराची भूक भागली पण ज्ञानाच्या भुकेचे काय ? अर्थात पोटाची भूक भागली असं म्हणणं ही थोडं धाडसाचे ठरेल.

'महाराष्ट्र म्हणजे शिक्षणातील प्रयोगशाळा' ही आपल्या राज्याची ओळख सर्वदूर आहे. आता राज्य सरकारच्या शालेय शिक्षण विभागाने चारशे अठ्ठ्याऐंशी शाळा आदर्श करण्याचे ठरविले आहे परंतु अंमलबजावणीचे काय ? अंमलबजावणीचे घोडे गवत खात असेल तर मग कोवळ्या, फुलणाऱ्या कळ्यांचं काय ? 'आपलं राज्य एक प्रयोगशाळा' हे चांगलं वाटत असलं तरीही ते किती लाभदायक आहे, यापूर्वी अनेक योजना आल्या नि गेल्या त्यांचा सकारात्मक परिणाम झाला का ? हेही विचारात घेणे गरजेचे आहे. कारण पुढील एका लेखात लेखक लिहितात,'आपण शिक्षणात अक्षराची साक्षरता पेरत गेलो मात्र शिक्षणातून अपेक्षित असलेल्या मूल्यांचा विचार रूजवायचा राहिला तर नाही ना ? अशी शंका येते. अभ्यासक्रमात गाभा घटक, जीवनकौशल्य आणि मूल्यांचा विचार अधोरेखित केला गेला आहे. मात्र प्रत्यक्षात तो विचार अंमलबजावणीत आला असता तर आपल्याला वर्तमानात दिसणारी परिस्थिती निश्चित नियंत्रणात आली असती...'

एकेकाळी गाभाभूत घटकांचा आणि मूल्य शिक्षणाचा एवढा गाजावाजा झाला होता तो लक्षात घेता आणि आता लेखकाचे विचार वाचताना असे वाटते की, सारेच मुसळ केरात गेले की काय ? कारण लेखक म्हणतात त्याप्रमाणे 'प्रामाणिकपणा' हे मूल्य रुजले असते तर एवढा भ्रष्टाचार माजला नसता.' हे निश्चित खरे आहे पण मूल्य रुजविण्याची जबाबदारी केवळ शिक्षकांचीच आहे का ? समाज, पालक हे नामानिराळे राहू शकतात का ? शाळेत विद्यार्थी सहा- सात तास असतो. उर्वरित काळात तो घरात आणि समाजात असतो. ते वातावरण आणि शाळेतील मूल्य शिक्षण किती विरोधाभास आहे ना ? त्यामुळे विद्यार्थी संभ्रमात पडतो आणि जे सहज साध्य असेल तिकडे वळतो. 'शाळा हे मंदिर' अशी माजी शिक्षण संचालक वि.वि.चिपळूणकर यांचं मतं होतं. तसे मानले तर या मंदिरातून बाहेर पडलेले काही विद्यार्थी पालकाला शोधायला मदिरालयात जात असेल तर कशाचे मूल्य नि कोणता गाभाभूत घटक आपण जोपासत आहोत ?




'साक्षरतेचं चांगभलं' हा लेख साक्षरतेची चिरफाड करणारा आहे, योजनांची दशा नि दिशा दाखवणारा आहे! साक्षरता अभियान आणि त्यापूर्वी प्रौढ साक्षरता ह्या दोन महत्त्वाकांक्षी योजना आपण राबविल्या आहेत. त्या योजनांचे चर्वितचर्वण आपण केले आहे. अनेक दंतकथा आपण ऐकल्या आहेत. त्यावेळी साक्षरता केवळ अक्षर वाचन, लेखनापुरती मर्यादित मानण्यात आली होती परंतु ती तरी पूर्ण झाली का ? निरक्षर साक्षर झाले का ? याबाबत लेखक म्हणतात,'आपल्याकडे शिक्षणाच्या साक्षरतेपेक्षा व्यक्तिचे शहाणपण महत्त्वाचे आहे... साक्षर किंवा उच्चशिक्षित माणसं भ्रष्टाचारी, नीतीहीन, कामचुकार, तत्वहीन, अप्रामाणिक माणसं चांगले नागरिक कसे होऊ शकतील ? असा प्रश्न जेव्हा संदीप वाकचौरे यांच्यासारख्या ज्येष्ठ शिक्षण अभ्यासकाला पडतो तेव्हा वाचकांची मनोवृत्ती 'संपले सारे' अशी होते.

एखाद्या शाळेचा सुरक्षा रक्षक जेव्हा एखाद्या पालकाला मारहाण करतो त्यावेळी मनात विचार येतो, हेच का ते शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण ? पालक आर्थिक ताण सोसून जी देणगी देतात त्यातून ह्या सुरक्षा रक्षकांचा पगार होत असेल तर प्रश्न पडतो की देणगी द्यावी तर कशासाठी ? सुरक्षा रक्षक असतील, शिक्षक असतील, संस्था चालक असतील ह्यांची मुजोरी सहन करण्यासाठी देणगी ? अशा शाळांमधील विद्यार्थ्यांमध्ये निर्भयता निर्माण होईल का ? अर्थात सर्व शाळांमध्ये असे वातावरण नाही. बहुतांश शाळा खूप छान आहेत पण देणगी द्यावीच लागते ना ? लेखकाने मुद्द्यांचे स्पष्टीकरण करताना अनेक थोर विचारवंतांच्या विचारांचा दाखला दिला आहे. तसेच अग्रगण्य संस्थांनी जाहीर केलेली आकडेवारी उद्धृत केली आहे. यावरून लेखकाचा शिक्षण विषयक अभ्यास किती सखोल आहे हे लक्षात आल्याशिवाय राहत नाही.

परीक्षा! अभ्यासक्रमाच्या पूर्ततेसाठी करावा लागणारा एक सोपस्कार! परंतु या मूल्यमापनातून पास- नापास आणि आशा-निराशा असे दोन गट पडतात. हे धोकादायक ठरू शकते. या संदर्भात लेखक चिंतनीय अशी प्रश्नपत्रिका सादर करतात...

'विद्यार्थी पुस्तकी परीक्षेत नापास झाले तरी जगण्यासाठी लागणारी सक्षमता प्राप्त करू शकले का ? शिक्षणाच्या प्रक्रियेत शिकणे महत्त्वाचे नाही का ? मुळात आपण का शिकतो ? शिक्षण देणाऱ्या संस्था समाजाने का निर्माण केल्या ? या प्रश्नांची उत्तरे संबंधित घटकांनी दिली पाहिजेत अर्थात त्यांना ह्या प्रश्नांमागचे गांभीर्य समजायला हवे.

गळती ही शिक्षण क्षेत्राला लागलेली कीड आहे. कितीही आणि कोणत्याही योजना नि अभियान राबविले तरीही ही कीड कमी होत नाही हे वास्तव आहे. याबाबत लेखकाने स्वामी विवेकानंद यांचा एक विचार अधोरेखित केला आहे. स्वामी म्हणतात, 'गरीब शिक्षणापर्यंत पोहचत नसेल तर शिक्षणाने गरिबांपर्यंत पोहचण्याची गरज आहे.' खरेच असे घडले का, घडते आहे का ? योजनांची उधळण पाहता शिक्षण गरिबांपर्यंत पोहचत असेल पण त्यातून शिक्षणाचा हेतू पूर्ण होतो का ? हे महत्त्वाचे आहे.

शालेय स्तरावर मराठी नापास, मातृभाषेत शिक्षण कधी, बोली जपायला हव्यात, गिरगिटायला हवेच ना अशा अनेक लेखांमधून वाकचौरे यांनी शिक्षण विषयक अभ्यासपूर्ण माहितीने परिपूर्ण असे विचार मांडले आहेत. ते पालक, अधिकारी, पदाधिकारी, संस्था चालक, शिक्षक, सरकार, शिक्षण तज्ज्ञ अशा सर्व घटकांना विचार करण्यासारखे आहेत.

सोबत शिक्षण क्षेत्रात जे नवनवीन प्रयोग केले जातात, सरकार बदले, शिक्षण मंत्री बदलला की योजना बदलते, धोरणं बदलतात ही पद्धती निश्चितच पोषक नाही तर घातक आहे. जे चांगले आहे त्यात आमुलाग्र बदल न करता आवश्यक असा मामुली बदल केला तर तो पोषक ठरेल.

संदीप वाकचौरे यांनी अत्यंत तळमळीने हा लेखसंग्रह लिहिला असून तितक्याच सक्षमपणे प्रकाशक घनश्याम पाटील यांनी प्रकाशित केला आहे. तो शिक्षण क्षेत्रातील सर्वांना मार्गदर्शक ठरेल यात शंका नाही. आगामी पुस्तकांची प्रतिक्षा आहेच. सोबत अनंत शुभेच्छा!

**पाटी पेन्सिल : लेखसंग्रह**
**लेखक : संदीप वाकचौरे**
**प्रकाशक : घनश्याम पाटील**
**(चपराक प्रकाशन,पुणे)**
**(७०५७२९२०९२)**
**पृष्ठ संख्या : १५२**
**किंमत : २५०/-**
**आस्वादक : नागेश शेवाळकर, पुणे**
**(९४२३१३९०७१)**

# प्रेमात इगो आड यायला नको



सुनील शिरपुरे
संपर्क क्र. ७०५७१८५४७९

आधुनिक केसरी

**प्रेम ही एक प्रकारची भावना आहे. जी एखादी वस्तू, एखादी व्यक्ती किंवा एखाद्या विशिष्ट गोष्टीविषयी आपल्या मनामध्ये निर्माण होते. तसं पाहायला गेलं तर एका ठराविक वयामध्ये प्रत्येकाला प्रेम हे होतच असते. मग ते वन साईड असो किंवा टू साईड... मग यामध्ये काही लोकांचे प्रेम यशस्वी होतात तर काही लोकांचे होत नाही तो भाग वेगळा. आज हाय एज्युकेटेड, कधी काळी टॉपर असलेल्या आणि कॉम्पिटिटीव्ह एक्झामची तयारी करणा-या मुलीसुद्धा या प्रेमात डोक्यावर पडताना दिसून येतात. एकाला उज्ज्वल भविष्याचे स्वप्न दाखवून, त्याच्या भावनांशी खेळून दुस-यालाच आपलं सर्वस्व अर्पन करतात. ही ज्याप्रमाणे दुस-याला दगा देत असते, त्याचप्रमाणे सर्वस्व मिळवलेलाही हिला दगा देत असतो. तेव्हा मात्र ही डोक्यावर हात मारत असते की, मी काय करून बसली? जी मुलगी दुस-याचं स्वप्न धुळीस मिळवत असते. ती स्वतःच्या स्वप्नांचे काय दिवे लावतील? हा गहन प्रश्न आहे.**

आधी या मुली हायफाय स्वप्न रंगवताना दिसून येतात, पण शेवटी खालच्या पोस्टींगच्या प्रयत्नात आपलं लक आजमायला लागतात. विचार करायला लावणारी गोष्ट आहे. जी मुलगी स्वतःच्या स्वप्नांबद्दलच ठाम राहू शकत नाही, ती प्रेमात दिलेल्या वचनांची पूर्ततः काय करेल? अशा मुलींपासून एक जरी संकेत मिळाल्यास तिच्यापासून तात्काळ अलिप्त होणेच योग्य राहील. त्यामुळे कुणावर प्रेम करत असाल तर पुढीलप्रमाणे करावं. अन्यथा प्रेमाचा विचारच मनात आणू नये.

एक मुलगा होता. तो एका मुलीवर स्वतःपेक्षाही जास्त प्रेम करायचा... त्याच्या परिवारातील लोकांनीही त्याला कधी साथ दिली नाही. तरीही तो त्या मुलीवर प्रेम करत राहिला. परंतु मलगी काही पाहू शकत नव्हती. कारण ती आंधळी होती. मुलगी नेहमी मुलाला म्हणायची की, तुम्ही माझ्यावर एवढं प्रेम का करता? मी तुमच्या कोणत्याही कामी येऊ शकत नाही. मी तुम्हाला ते प्रेम देऊ शकत नाही, जे इतर कुणी देऊ शकतात. परंतु तो मुलगा नेहमी तिला धीर देत होता की, तू ठिक होशील. तुच माझं पहिलं प्रेम आहे आणि राहशील. नंतर काही वर्ष हा प्रवास सुरु होता. एक दिवस तो मुलगा पैशाची जुळवाजुळव करून तिचं ऑपरेशन करायला लावतो. ऑपरेशन झाल्यानंतर ती सर्व काही पाहू शकत होती. परंतु तिला कळतं की, मुलगाही आंधळा आहे. तेव्हा मुलगी त्याला म्हणाली की, मी तुमच्याशी प्रेम करू शकत नाही. तुम्ही तर आंधळे आहेत आणि मी कोणत्याही आंधळ्या व्यक्तीला आपला जीवनसाथी म्हणून निवड करू शकत नाही. तुमच्यासोबत माझं कोणतंही भविष्य नाही. तेव्हा मुलगा हसायला लागतो आणि जाऊ लागतो. त्याचे शेवटचे शब्द हे असते की, माझ्या डोळ्यांची काळजी घे...

एक हवाई सुंदरी होती. ती दिसायला तर सुंदर होतीच, पण त्यापेक्षाही सुंदर तिची आपल्या पतीवर प्रेम करण्याची पद्धत होती. जेव्हा जेव्हा ती बाहेरच्या देशात असे, तेव्हा तेव्हा ती रोज एक गुलाबाचे फुल आपल्या पतीला पाठवत असे आणि जाणवून देत असे की, मी कुठेही असले तरी मनाने फक्त तुमच्या जवळच आहे. ती दुसरीकडे असताना तिच्या रोज येणाऱ्या गुलाबाच्या फुलाची सवय तिच्या पतीला झाली होती. पण, कदाचित त्या हवाई सुंदरीचे हे सुंदर प्रेम देवाला ही आवडले असावे म्हणून की काय? देवाने तिला आपल्याकडे बोलावून घेतले. ती ज्या विमानात होती, त्या विमानाचा अपघात झाला आणि बिचारी आपले प्राण गमावून बसली. ही बातमी ऐकून तिचा नवरा एवढा रडला की, तो कधी एवढा रडला नसेल किंवा त्याच्या इतके कुणीही एवढे रडले नसेल. पण इथे तिचे प्रेम संपले नव्हते, ते तर आता सुरु झाले होते. तिच्या दुर्दैवी मृत्यूनंतर देखील रोज त्याला गुलाबाचे फुल मिळत होते. हे बघून तिचा पती आश्चर्य चकीत झाला व या मागाचे कारण शोधण्यासाठी त्याने रोज फुल घेऊन येणा-या मुलास विचारले, "तुला हे फुल नक्की कोण देत. माझी पत्नी मरून १५ दिवस झाले. तरी तू रोज फुल आणून देत आहेस. नक्की प्रकार काय आहे?" मुलगा म्हणतो, साहेब! तुमची पत्नी तुमच्यावर खूप प्रेम करते. तिची विचारशक्ती खूप पुढची होती. म्हणून तिने आधीच विचार करून ठेवला होता की, "जर कधी विमानास अपघात झाला तर माझे जीवन संपेल. पण प्रेमाला कधी संपवायचे नाही आणि या विचाराने तिने मला आधीच भरपूर पैसे देऊन ठेवले आहेत." जेणे करून आयुष्यभर ती तुम्हाला रोज एक गुलाबाचे फुल देऊ शकेल आणि तिचे नसणे सुद्धा तुम्हाला असण्याची जाणीव करून देईल.

एकदा बस स्टॉपवर खुपच गर्दी होती. बस स्टॉपवर खुपच मोठी लाईन लागली होती. सर्वजन बसची वाट पाहत होते... तेवढ्यात एका मुलाचा एका मुलीला थोडा धक्का लागला. ती चिडली आणि रागाने ओरडली, का रे दिसत नाही का तुला? का डोळे फुटले तुझे..? तो सॉरी म्हणाला तिला, पण तिची बडबड काही केल्या थांबेनाच... मग, तोही चिडला आणि म्हणाला, इतका कसला माज आहे गं तुला.? मग, आहेच मुळी गर्व मला... आहेच मी इतकी सुंदर एखादी सुंदर मुलगी दिसली की लगेच तुम्ही मुलं घसरता तिच्यावर... असं बोलून तिनं तर त्याच्या स्वाभिमानालाच हात घातला होता... तो म्हणाला, मी म्हटलं तर तुझ्यासारख्या छप्पन पोरी उभ्या करू शकतो. पण, माझा तो मुळ स्वभाव नाही म्हणून गप्प आहे... ती... आला मोठा दीडशहाणा... मी सर्वांपेक्षा वेगळी आहे, मला पटवणं इतकं सोप्प नाही... त्यावर तो... असं म्हणतेस स्वीकारलं मी चॅलेंज... आजपासून बरोबर पंधरा दिवसांच्या आत तू मला आय लव्ह यू म्हणशील आणि तेही इथेच... आजपासून बरोबर पंधराव्या दिवशी... हा माझा विश्वास आहे. असं म्हणून तो तिथून टॅक्सीने निघून गेला. ती मनातल्या मनात म्हणत होती की, मी काही केल्या याला आय लव्ह यू कशी आणि का म्हणेन? छे!छे! वेडा आहे हा कॉलेजमध्ये पोहोचल्यावर ते एकमेकांना एकाच वर्गात दिसले. त्याबरोबर दोघांनीही एकमेकांकडे पाहून नाकं मुरडली होती. दोघांचं एकाच वर्गात ॲडमिशन झालं होतं. त्यामुळे ते एकमेकांना पुन्हा पुन्हा दिसू लागले. त्याला पाहिल्यावर तिला त्या दिवसाबद्दल राहून राहून वाईट वाटत होतं. म्हणून तिनं ठरवलं की त्याला सॉरी म्हणावं. मग, क्लासमध्ये तिची भिरभिरती नजर त्याचा शोध घेऊ लागली. पण तो काही दिसला नाही... कदाचित आज तो आला नसेल, असा विचार तिने केला. म्हणून तिने त्याला शोधणं बंद केलं आणि कॅंटीनच्या दिशेने ती चालू लागली. कॅंटीनमध्ये प्रवेश केल्याबरोबर तो तिथे कॉफी घेताना दिसला... मग, ती त्याच्या टेबलवर जाऊन बसली... त्याला थोडं आश्चर्यच वाटलं. पण तो शांतपणे कॉफी घेत राहीला. ती आय एम सॉरी... तो थोडा दचकलाच... पण तिने आणखी एकदा आय एम सॉरी म्हटलं... तो म्हणाला व्हॉट अबाऊट? ती म्हणाली की, बस स्टॉपवर जे झालं त्याबद्दल... त्यावर तो म्हणतो इट्स ओके यार! आय फॉरगिव्ह यू...कॉफी...ती, नो थँक्स... मला खरंच तू माफ केलंस ना... मि थोडं जास्तच बोलले तुला त्यावेळी, इतकं बोलायला नको होतं मी... (हात पुढे करून ) फ्रेन्ड्स... त्यानेही मोठ्या मनाने तिच्याशी मैत्री केली. तो दिवस, बस स्टॉपनंतरचा तिसराच दिवस होता. त्यानंतर ते क्लासमध्ये पुन्हा पुन्हा भेटू लागले, एकाच बेंचवर बसू लागले. दिवसागणिक त्यांची मैत्री वाढू लागली होती... एकमेकांच्या नोटबुक एक्सेंज करणं हे तर त्यांचं घरी येण्याजाण्याचं एक कारणच बनलं होतं... त्याचा स्वभाव इतका छान होता की, कोणालाही तो आवडावा...समोरच्याला समजून घेऊन त्याच्याशी वागणं, त्याला मदत करणं, अडचणीच्या वेळी योग्य तो सपोर्ट करणं हा त्याचा स्वभावच होता... दिसायलाही तो बरा होता...

त्या दोघांना भेटून एक आठवडाच झाला होता की, एकमेकांना ते खुपच आवडू लागले होते. दिवसानंतर दिवस गेले... आज त्याच्या पहिल्या भेटीनंतरचा चौदाव्या दिवसाची रात्र होता. ती गच्चीवर चांदण्यांकडे बघत एकटीच बसली होती... ती मनातच म्हणत होती. कधी कळणार रे तुला माझ्या भावना... ती रात्रीची चांदणी त्या चंद्राला काय म्हणते ते ऐकना... माझ्या मनातल्या भावना तुला का कळेना..? रात्रभर असेच विचार राहून राहून तिला सतावत होते. मग ती झोपी गेली... दुसरा दिवस ऊजाडला... तिने ठरवलं होतं की, काही केल्या त्याला प्रपोझ करायचं, आणखी किती दिवस त्याच्यासाठी झुरायचं..? तिने घड्याळाकडे पाहीले, सकाळचे नऊ वाजले होते... घड्याळाकडे पाहत असताना तिची नजर सहजच कॅलेंडरकडे गेली. आज सव्वीस तारीख होती... तशीच ती सॅक घेऊन बस स्टॉपकडे निघाली... थोडं दूर गेल्यावर तिच्या लक्षात आलं की, आज बस स्टॉपवरच्या पहिल्या भेटी नंतरचा बरोबर पंधरावा दिवस होता...

तिला धक्काच बसला. कारण त्याने तिला दिलेलं ते चॅलेंज आठवलं. ज्यानुसार खरंच पंधराव्या दिवशीच ती त्याला आय लव्ह यू म्हणणार होती...



बसमध्ये बसून ती कॉलेजला निघाली. कॉलेजला जाईपर्यंत तिने निर्णय घेतला की, काही केल्या आज त्याला आय लव्ह यू म्हणायचं नाही. कारण त्याने माझा इगो हर्ट होऊ शकतो... गाडी कॉलेजवरच्या बस स्टॉपवर थांबली. तो तिथेच हातात गुलाबाचं फुल घेऊन उभा होता. ती गाडीतून उतरली... तिने त्याला विचारलं की, हे फुल कुणासाठी..? तो म्हणाला...आहे कुणासाठी तरी तिचा परत प्रश्न... मला नाही सांगणार तो म्हणाला की, ते एक गुपित आहे. ते मी तुला उद्या सांगेन... प्लिज आता पुन्हा विचारु नकोस ती म्हणाली ठीक आहे चल तो प्रश्नार्थक भावनेने कुठे..? ती लगेच म्हणाली अरे क्लासमध्ये अजून कुठे..? त्याने उत्तरादाखल म्हणाला, आज मी नाही येणार... आज माझं थोडं काम आहे. तू जा कॉलेजला... तिचा उत्सुकतेचा प्रश्न... अरे कसलं काम, काय बोलतोस तू..? चल ना क्लासमध्ये जाऊया... तो नरवसल्या स्वरात अगं प्लिज मला इन्सिस्ट करु नको तू जा... ती भावूक चेह-याने अरे पण... तो जा म्हटलं ना... ती आवळते घेत जाते जाते चिढतो कशाला एवढा..? असं म्हणून ती वर्गात गेली. वर्गात तिचं मन लागत नव्हतं. तिला कळून चुकलं होतं की, ते तो फुल माझ्यासाठीच घेऊन उभा होता. या आशेवर की, मी ते फुल माझ्या हाताने हक्काने त्याच्याकडून घेईन आणि त्याला आय लव्ह यू म्हणेन... तसं करावं असं खूप वाटत होतं तिला... पण राहून राहून तिचा इगो आड येत होता आणि ते दिलेलं चॅलेंज तिला सारखं आठवत होतं... क्लास सुटला ती कॉलेजच्या बस स्टॉपकडे वळली. तो तिथेच उभा होता. त्याच्या हातातलं ते फुल सुकलं होतं. पण तो अजून तसाच हसतमुख वाटत होता. तिला वाटत होतं की, तो तिथून गेला असेल. पण त्याला स्टॉपवर बघून ती स्तब्धच झाली... दोघांनी एकमेकांकडे पाहीलं. तेवढ्यात बस आली. ती गोंधळात होती... तिला काही सुचत नव्हतं. बस आल्यावर ती बसमध्ये जाऊन बसली... राहून राहून खिडकीतून ती त्याला आणि तो तिला पाहत होता... घरी पोहोचल्यावर ती खोल विचारात गेली होती. वारंवार त्याचे विचार, त्याचा चेहरा तिच्या मनामध्ये रेंगाळत होता. अशातच रात्र झाली... खरंच हा माझ्यावर इतकं प्रेम करतो. का करतो माझ्यावर इतकं प्रेम..? अशा काही अनुत्तरीत प्रश्नांच्या विचारातच ती झोपी गेली..?

आज एक नवीन दिवस उजाडला... ती आज लवकरच उठली होती. कारण आज तो दिवस उजाडला होता, ज्या दिवसाची ती खुपच आतुरतेने वाट पाहत होती... सकाळची आंघोळ आवरून ती आरशासमोर आली... आरशात बघून स्वतःशीच म्हणाली, किती वेडेपणाने प्रेम करतोस रे तु माझ्यावर? खुपच त्रास दिला ना मी तुला... प्लिज माफ कर मला... मनातल्या मनात ती थोडी खुश होती. कारण तो चेलेंज हरला होता... किती गर्वाने बोलला होता तो मला... असा ती विचार करत होती... तिने आज ठरवलं की, आज माझ्या मनातल्या सर्व भावना मी त्याला सांगणार... तो मला किती आवडतो? सगळं सगळं मी त्याला सांगेन... ती खुपच आतुरतेने नऊ वाजण्याची वाट पाहत होती... नऊ वाजताच ती लगबगीने कॉलेजकडे निघाली. आज आनंदाने एक वेगळीच स्फुर्ती तिच्यात आली होती, एक वेगळंच हसू तिच्या ओठाची शोभा वाढवत होती. बस स्टॉप येण्याची खुपच अधीरतेने वाट पाहत होती. तिने त्याच्यासाठी एक गुलाबाचं फुल घेतलं होतं. तिने आय लव्ह यू म्हणायची प्रॅक्टिस ही केली होती... जस जसा बस स्टॉप जवळ येऊ लागला होता, तस तशी तिच्या हृदयाची धडधड वाढत होती... मघाची अधीरता आता भीतीमध्ये रुपांतरीत झाली होती... कॉलेजचा बस स्टॉप आला, ती बसमधून उतरली... तशीच तिथे जाऊन ती गुलाबाचं फुल घेऊन उभी राहीली, जिथे काल तो उभा होता... एका अनामिक भीतीने त्याच्या येण्याची वाट बघू लागली... थोड्या वेळाने तोही आला... आज त्याची सॅक थोडी जास्तच जड दिसत होती... तो तिच्याजवळ आला. त्याने तिच्या हातातलं ते गुलाबाचं फुल पाहीलं नव्हतं आणि म्हणाला मला माफ कर... मी चेलेंज हरलो. तुला पंधरा दिवसांच्या आत मिळवण्याचं... ती मनातल्या मनात हसत होती. पहिल्यांदा एक चॅलेंज म्हणून घेतलं होतं मी याला... पण, नंतर नंतर मी खरंच तुझ्यावर प्रेम करून बसलो... मग, ठरवलं की तुला मनातलं सगळं सांगावं आणि मला वाटलं की, मी या पंधरा दिवसांत पूर्णपणे ओळखलं तुला... मला तुझ्या डोळ्यात माझ्याविषयी प्रेम दिसलं आणि तुही मला तितकीच ओळखते असं मला वाटलं होतं आणि म्हणून मी काल ते फुल घेऊन तुझ्यासाठीच ऊभा होतो... ना की माझं चॅलेंज पूर्ण करण्यासाठी... तू येशील आणि ते फुल हक्काने माझ्याकडून मागून घेशील. तू आली, फुलाविषयी चौकशी केली आणि माझ्याच सांगण्याने गेली. मला वाटलं होतं तू माझ्या मनातलं ओळखशील... चॅलेंजबद्दल तर मला आज सकाळी लक्षात आलं. मी आज पुण्याला जातो तिथेच उरलेलं शिक्षण घ्यावं म्हणतो... तुला शेवटचं भेटून जावं, असं मला वाटलं म्हणून मी तुला भेटायला आलो... मी निघतो. अरे थांब वेड्या! मलाही तुला काही सांगायचं आहे. तू मला कॉलेजच्या दुस-या दिवसापासूनच आवडू लागला होता. पण मी तुला सांगू शकले नव्हते आणि ज्या दिवशी खरंच सांगावसं वाटलं. त्या दिवशी माझा इगो आड आला हे फुल मी तुझ्यासाठीच आणलं. तिने हात पुढे करून त्याला आय लव्ह यू म्हणलं... तो ते फुल हात पुढे करून स्वीकारणार... तेवढ्यात, एक मोठी वा-याची झुळूक आली अन ती भानावर आली... मी त्या बस स्टॉपच्या शेजारी असलेल्या मेडीकल स्टोअरवर उभा होतो. मी रामचंद्र काकांना (मेडीकल स्टोअरचे मालक) विचारलं होतं की, काका मी इथे आल्यापासून बघतो की, ती मुलगी दररोज त्या बस स्टॉपवर एक गुलाबाचं फुल घेऊन बरोबर १० ते ५ या वेळेत का उभी असते..? याच्या उत्तरादाखल ते मला या मुलीची कहाणी सांगत होते... इथपर्यंत तिची प्रेम कहाणी ऐकल्यावर खरोखरच मला तिच्या प्रेम कहाणीबद्दल असणारी रुची खुपच वाढली होती... एकदा मी त्या मुलीकडे एका नजरेनं पाहीलं आणि पुन्हा रामचंद्र काकांना उत्सुकतेपोटी विचारलं. मग, त्या मुलाने तिचं प्रेम स्वीकारलं का? सांगा ना, सांगा ना काका, सांगा ना मी खुपच अधीर झालो होतो. ते म्हणाले, अरे थांब सांगतो. काका सांगू लागले... तोही ते फुल स्वीकारण्यासाठी हात पुढे करत होता. तेवढ्यात एक अकल्पित घडलं... क्षणार्धात तो तिच्यापासून खूप लांब जावून पडला होता. कारण एका भरधाव येणा-या ४ चाकी गाडीने त्याला उडवलं होतं... ती हात पुढे करून तशीच उभी होती. तिच्या डोळ्यातला एक अश्रू पावसाचं थेंब जसं आळवाच्या पानावर घरंगळतो तसा तिच्या गालावर घरंगळत होता. क्षणार्धात त्याचा मृत्यू झाला होता.

त्याला मरून पाच वर्षे झाली. पण, तेव्हापासून आजपर्यंत ही मुलगी तिच्या कॉलेजच्या वेळेत १० ते ५ इथे उभी असते. फक्त याच आशेवर की, तो येईल आणि ती हे फुल त्याला देऊन आय लव्ह यू म्हणेन आणि तो तिला घेऊन जाईल... त्या मुलीची कहानी ऐकून माझी आसवं दाटली होती. मनात खुपच प्रश्न उभे होते की, खरंच एवढं प्रेम कुणी करू शकतं का..? मी अश्रू पुसले आणि त्या मुलीकडे बघतच रामचंद्र काकांना विचारलं. हे सर्व तुम्हाला कसं माहीत..? तेवढ्यात माझं लक्ष गेलं की, त्या बस स्टॉपवरचा एक पत्रा हालत होता आणि तो पत्रा तिच्या हाताच्या कोप-याला येऊन धडकला... त्याने तिच्या हातातलं ते फुल रस्त्यावर जाऊन पडलं होतं... ते फुल घेण्यासाठी ती वाकली आणि तिलाही समोरच्या एका ट्रकने उडवलं ते मी माझ्या स्वतःच्या डोळ्याने पाहत होतो... रामचंद्र काकांनी ते पाहताच दुकानाच्या काऊंटरवरून उडी मारून तिच्याकडे धावले. मीही त्याच दिशेने धावत गेलो. ते त्या रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या मुलीचे प्रेत आपल्या मांडीवर घेऊन रडू लागले. मी काही वेळ स्तब्ध झालो होतो. ते म्हणत होते, मुली तुझ्या या अभागी बापाला माफ कर... तुझी काळजी मी व्यवस्थितपणे घेऊ शकलो नाही... पण, तुही कुठे माझं ऐकत होती. तुही फक्त तुझ्याच मनाचं करत होती. कसला वेडेपणा केलीस गं तू... त्यांच्या या वागण्यानं मला माझ्या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळाली होती... तेच त्या मुलीचे अभागी बाप होते..

जर त्या मुलीने फक्त त्या एका दिवशी आपला इगो म्हणजेच अहंकार बाजूला ठेवून त्या वाट पाहणा-या आपल्या प्रियकराला आय लव्ह यू हे तीन शब्द म्हटले असते, तर कदाचित तो मेला नसता... कदाचित तिला त्याच्यासाठी पाच वर्षे अश्रू ढाळत त्या स्टॉपवर वाट पाहावी लागली नसती... कदाचित तिचा मृत्यूही झाला नसता आणि कदाचित त्या तिच्या बापाने तिला गमावलं नसतं... म्हणूनच तो एक दिवस किती महत्वाचा असतो... असा एक दिवस प्रत्येक प्रेमविरांच्या आयुष्यात येतो. त्याला हातचं जाऊ देऊ नका... कदाचित तुमचं प्रेम तुम्हाला मिळेल.

---

## पहिलं प्रेम



आधुनिक केसरी

रणरणत्या उन्हानंतर तापलेल्या धरणीला सुखावणारा तो पहिला पाऊस
अंगावर पाऊस धारा झेलणार्या मातीचा येणारा तो पहिलावहिला सुगंध
अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर रोपट्याला येणारी पहिली कळी फुलणार ते पहिल
फुल खरच किती खास असत ना सगळ पहिलावहिल घडणार ... तसच थोडस
प्रेमाबाबतही असत का ? आयुष्यातल ते पहिल प्रेम अगदी अविस्मरणीय ..
हृदयात साठवून ठेवलेल .. कधी आठवून रडवणार तर कधी हसवणार .. तर
कधी सावरणार .. खरच किती खास असत ना ते पहिल प्रेम ...
आपल्याला ते मिळो अथवा न मिळो ते क्षण किती भरभरून जगलेलो असतो ना
आपण तसा विचार केला तर काय जादू असेल बर ह्या पहिल्या शब्दात म्हणजे
सगळ काही अदभुत घेऊन येतो ना हा आपल्या सोबत हो आता काही गोष्टी
अपवाद असतात असो
.. हेच पहिल प्रेम काहींमधला कवी जागवतो आणि सुरू होतो प्रत्येक कवितेत त्या
व्यक्तीसाठी लिहिल्या जाणाऱ्या गोड कवितेचा प्रवास .. ह्या प्रवासात अनेक शब्द
साथीस येतात.. तर काही व्यकतींच रंगीत स्वप्न रंगवन सुरू होत
एक सुंदर चित्र रेखाटन.. या रेखाटनात असतात आवडते रंग आणि हृदयीचे भाव
तर कधी त्या मोगर्याच्या आणि कुंदाच्या फुलाप्रमाणे दरवळत वेगळी सफर
अनुभवयाला मिळते जगायला मिळते .. भिती नाहीशी होऊन लाज तेथे ठाण
मांडते .. डोळे मिटले कि काळजात वस्तीला असणार समोर दिसत .. जग तिथच
थांबाव अस वाटत .. आणि वैगेरे वगैरे बरच काही... आयुष्यातल पहिल प्रेम
फक्त तुमच असत मग एकतर्फी का असेना पण एकनिष्ठ... मग आठवतय ना
कुणीतरी शाळेतल कॉंलेजमधल अगदी कुठलही पण नवख अल्लड खोडकर
पहिल प्रेम.. काय मगं आल का डोळयासमोर पहिल प्रेम पण तुम्ही आता नाही
म्हणनार आणि मनात तर लाडू फुटत असणार हाहाहा
असो आता लाजत बसण्यापेक्षा पुन्हा एकदा करा तुमच्या पहिल्या प्रेमाची सफर मी
थांबते .... उगाच व्यत्यय नको . . . नाही का ?

**- © प्राजक्ता रविंद्र मनवेलीकर**

# भारताने दुध उत्पादनातील अव्वलस्थान टिकवणे गरजेचे



सुरेश मंत्री
संपर्क क्र. ९४०३६५०७२२

आधुनिक केसरी

**सहकाराच्या माध्यमातून दुग्ध व्यवसाय साकारणारा भारत हा जगातील एकमेव देश आहे असे म्हणता येईल. अन्न आणि कृषी संघटनेच्या कॉर्पोरेट सांख्यिकी डेटाबेसमधील (एफएओएसटीएटी) उत्पादनविषयक माहितीनुसार २०२१-२२ मध्ये जागतिक पातळीवरील दूध उत्पादनात २४ टक्क्यांचे योगदान नोंदवत भारताने या क्षेत्रात प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्यानंतर अमेरिका, चीन, पाकिस्तान आणि ब्राझीलचा क्रमांक लागतो. २०१४- १५ ते २०२१-२२ अशा मागील ८ वर्षांच्या कालावधीत भारतातील दूध उत्पादनात ५१ टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली आहे.**

दुग्धव्यवसाय देशात या क्षेत्रातील ८ कोटींहून अधिक शेतकऱ्यांना थेट रोजगार देखील प्रदान करतो. २०२१-२२ मध्ये देशातील दुधाचे उत्पादन सुमारे ६.२ टक्के च्या चक्रवाढ वार्षिक वाढीने २०९.९६ दशलक्ष टन झाले आहे. २०१४-१५ मध्ये ते केवळ १४६.३१ दशलक्ष टन होते. न्यूझीलंड, नेदरलंड, बल्गेरिया, चीन, डेन्मार्क, फिनलंड, फ्रान्स, जर्मनी, इटली, लिथुआनिया, मलेशिया, इंग्लंड, अमेरिका, थायलंड असे मोठे स्पर्धक दूध उत्पादनात असताना त्यांना मागे टाकून अव्वल स्थान अबाधित राखणे तशी सोपी गोष्ट नाही. महासत्ताक होण्याच्या दिशेने भारताचे हे एक पाऊल असल्याचे यानिमित्ताने मानले जात आहे.

भारतीय अर्थव्यवस्था झपाट्याने वाढत असून त्यात अनेक क्षेत्रांचा मोठा वाटा आहे. कृषी क्षेत्र देखील त्यापैकी एक आहे. या अर्थव्यवस्थेत दुग्धजन्य पदार्थांचे मोठे योगदान आहे. दुग्धव्यवसाय हा देशाच्या राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत ५ टक्के योगदान देणारा सर्वात मोठा कृषी माल मानला जातो.

देशात राजस्थान आणि उत्तर प्रदेश ही सर्वाधिक दूध उत्पादन करणारी राज्ये आहेत. नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्डाने दिलेल्या माहितीनुसार दूध उत्पादनात उत्तर प्रदेश प्रथम, तर राजस्थान दुस-या क्रमांकावर आहे. तिस-या क्रमांकावर मध्य प्रदेश, चौथ्या क्रमांकावर गुजरात आणि पाचव्या क्रमांकावर आंध्र प्रदेश आहे. लहान शेतकरी दुग्ध व्यवसायातील सर्वात मोठे लाभार्थी आहेत. शेतीला जोडधंदा म्हणून बहुसंख्य शेतकरी पशुपालन करतात. देशातील शेतकऱ्यांकडे सरासरी एक व दोन जनावरे असे प्रमाण आहे. कौटुंबिक पातळीवर ग्रामीण भागाचा अभ्युदय करण्याचे प्रभावी साधन म्हणून दूध व्यवसायाचा उल्लेख करावा लागेल. दुग्ध उत्पादन क्षेत्राचे नेतृत्व ख-या अर्थाने महिलाच करतात. कारण दुग्ध उत्पादनात महिलांचे ७० टक्के योगदान आहे. ७.५ कोटी महिला दुग्ध उत्पादन व पशुपालन या मध्ये महत्वाची भूमिका बजावतात. पूर्वीच्या काळी दुधाचे उत्पादन अधिक होते. भगवान श्रीकृष्णाच्या ठिकाणी लाखो गायींची सेवा केली जात असे. गोपालन हा गावच्या परंपरेचा एक भाग होता. सणाला देशी तुपापासून विविध प्रकारचे पदार्थ बनवले जात. खूप दिवसांनी दोन माणसं भेटत असतील, तर घरात दूध, दही आहे की नाही, असा प्रश्न विचारला जाई. श्रद्धेनुसार ज्या घरात गाय पाळली जात नाही ते घर अपवित्र असते, असे मानले जाई. हळूहळू ही प्रथा संपुष्टात आली. आता डेअरी फार्म आणि परदेशी जातीच्या गायींच्या आधारे भरपूर दूध तयार केले जात आहे. देशातील दूध उत्पादनात अनेक चढ-उतार झाले आहेत. सद्यपरिस्थितीवर नजर टाकली तर १९७० च्या दशकात भारतात झालेल्या श्वेतक्रांतीचे यश आजही दिसून येते. श्वेतक्रांतीमुळे दूध उत्पादनाला पुन्हा एकदा चालना मिळत आहे. भारत दुध उत्पादनात प्रथम क्रमांकाचा देश झाला असला तरी निर्यातीत प्रथम क्रमांकावर येण्यासाठी खूप कष्ट करावे लागतील, कारण आपला देश त्यात खूप मागे आहे. जगात न्युझीलंड, अमेरिका व ऑस्ट्रेलिया हे तीन देश दूध स्वतः च्या देशातील जनतेला पुरवतातच पण आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे, ह्या नाजूक प्रकृतीच्या पेयाला जगभर निर्यातही करतात. पुढील काळात मोठ्या सहकारी दूध संस्थांनी आंतरराष्ट्रीय बाजारात उतरणे आवश्यक आहे. कारण आपल्या दुधाचा उत्पादन खर्च तुलनेने कमी आहे. त्यामुळे जगाच्या तुलनेत आपण ते किफायतशीर दरात विकू शकतो. तसेच बटर, खवा, चीज यांच्या विक्रीला चालना देऊ शकतो. यासाठी नेस्लेसारख्या कंपनीप्रमाणे दूध संस्थांनी प्रचंड मोठे प्लँट उभे केले तर जगाच्या बाजारपेठेत आपले डेअरी प्रॉडक्ट्स सहजगत्या विकता येतील. त्यातून रोजगारही वाढेल. डेअरी ॲनालॉग्स, वनस्पती-आधारित उत्पादने आणि भेसळ करणारे हे डेअरी उद्योगासाठी एक मोठे आव्हान आणि धोके आहेत. त्याचबरोबर हिरवा चारा संसाधनांचा अभाव आणि जनावरांच्या रोगांवर कुचकामी नियंत्रण याकडे आज लक्ष देण्याची गरज आहे. आजही पशुधनाची काळजी घेण्यासाठी देशात पुरेशा प्रमाणात पशुवैद्यकच उपलब्ध नाहीत. देशात सध्या ५९ हजार नोंदणीकृत पशुवैद्यक असून या क्षेत्राची व्याप्ती लक्षात घेता देशात १ लाख २५ हजार पशुवैद्यकांची गरज आहे. देशात देशी जातींसाठी क्षेत्राभिमुख संवर्धन धोरणाचा अभाव आहे आणि अधिक दुधाच्या पार्श्वभूमीवर देशी जाती वाचवणे हे सरकार समोर मोठे आव्हान असेल. दुध व्यवसाय आणि उत्पादनाशी निगडित शेतकऱ्यांना नवीन तांत्रिक कौशल्ये आणि दर्जेदार बाजार व्यवस्था उपलब्ध करून देण्यावरही सरकारने भर देण्याची गरज आहे, जेणेकरून लोकांच्या उत्पन्नात वाढ होऊन अधिकाधिक लोक एकमेकांकडे बघून या क्षेत्रात जोडले जावेत याचा फायदा होईल. जगाला रोज ९५१.२३ दशलक्ष टन दुधाची गरज असताना जगभर उष्णता वाढत असल्याने सध्या केवळ ८६४.८६ दशलक्ष टन दूध उपलब्ध होत आहे. ही परिस्थिती भारताचीच नसून विकसित देशातही दुधाची टंचाई भासत आहे. डेअरी उद्योगाने देशात ८ कोटी लोकांना रोजगार मिळवून दिला आहे, पण वातावरणातील बदलांमुळे दरवर्षी दुधाचे उत्पादन तीन दशलक्ष टनाने कमी होईल असा अंदाज आहे. त्यामुळे सामान्य ग्राहकांना ते महागड्या दराने विकत घ्यावे लागेल. यामुळे या विषयावर गंभीरपणे चर्चा होणे आवश्यक आहे. हवामानातील उष्णतेमुळे पशुपालनावर व त्यांच्या खाद्यावर परिणाम होत असून त्यावर उपाय करता येतील, पण गरम वातावरणात दूध लवकर खराब होते आणि त्यामुळे त्याचा उत्पादनावरही परिणाम होत आहे. दूध उत्पादनात भारत अग्रेसर असल्याने यापुढे दुधाचे उत्पादन वाढवण्यासाठीच्या उपाययोजनांत भारताला योगदान द्यावे लागेल. त्यासाठी संशोधकांची फौज कामाला लावावी लागेल. कोट्यवधी शेतक-यांची उपजीविका दुधावर अवलंबून असताना भारत वर्षाला ८.५ लाख कोटी रुपयांचे दूध उत्पादन करतो. पण याकडे बड्या अर्थतज्ज्ञांसह देशातील अनेक लोकांचे दुर्लक्ष होत आहे. खेड्यांमधील विकेंद्रीत अर्थव्यवस्था याचे उदाहरण आहे. गहू आणि तांदळामधून होणारी उलाढाल देखील दुधाच्या उत्पादनइतकी नाही. हा व्यवसाय गरीब देशांसाठी उद्योगाचे एक आदर्श उदाहरण ठरू शकेल.



# मनातील मनापासून जपलेल्या नात्यातील ऋणानुबंध



तृप्ती नितीन तोडकर
संपर्क क्र. 9322506052


आधुनिक केसरी

**आज शनिवार दिनांक 11 फेब्रुवारी 2023 रोजी शाळेत गोष्टींचा शनिवार साजरा करायचा म्हणून सगळे विद्यार्थी उत्साही होते. मुलांना आज वेगळा अनुभव द्यायचा हे ही माझे नियोजन तयार झाले होते. शनिवार म्हटलं की हमखास दांडी मारणारे काही विद्यार्थी हे ठरलेले च होते. तर काही सकाळी नऊ वाजे पर्यंत शाळेत येणारे असेही काहीजण होते. पण आज मी शाळेत पोहोचण्याच्या आधीच वर्गात सगळे जण हजर. मी वर्गात पाऊल ठेवताच सर्वांनी आनंदाने उड्या मारायला सुरुवात केली. आज गावी गेलेली मुले सोडता घरी कोणीच राहिले नव्हते. दर शनिवारी हमखास घरी राहणारी वैभवी खराडे तर म्हणाली मॅडम आता मी कधीच घरी राहणार नाही. मला फार आनंद झाला की आपण नवीन प्रयोग केला तो यशस्वी झाला. दर शनिवारी मी मुलांना अभ्यास घेताना त्यांच्या आवडीचा व प्रत्येक वेळी नवीन वेगळा त्यांच्या आवडीचा खाऊ करून देण्याचा प्रयोग करण्याचे ठरवले होते. त्यानिमित्ताने मुलांशी सहज मोकळ्या वातावरणात त्यांच्याही नकळत चर्चा करण्यात आली.मुलं गप्पा गोष्टीत काम करता करता कधी रमून गेली हे त्यांच्याही लक्षात आले नाही.**

आज आवडीचा खाऊ मॅगी करण्याचे ठरवले होते. प्रत्येकजण एक कांदा, एक टोमॅटो, एक मिरची, थोडी कोथिंबीर, 2 मॅगी चे छोटे पुडे असे साहित्य घेऊन आले होते. आणलेले साहित्य प्रत्येकाने स्वतः चिरायला घेतले, विशेषतः कांदा कापताना प्रत्येकाच्या डोळ्यात पाणी आले. तेंव्हा मी सहज विचारले, बाळांनो आज एक दिवस एकच कांदा कापताना तुम्हाला त्रास होतो आहे, मग तुमच्या डोक्यात काय विचार सुरू झाला बरं. मुले लगेच म्हणाली मॅडम आई आपल्यासाठी रोज किती कष्ट करते, ती किती त्रास घेते आपल्यासाठी. पुन्हा मी विचारले मग बाळांनो तुम्ही असे का म्हणता मग ही भाजी नको, ती भाजी नको तर मुले म्हणाली मॅडम आता नाही म्हणणार. मग म्हटलं बघा बरका बाळांनो आज मी शाळेच्या ग्रुप वर MSG टाकते घरी मुले येई पर्यंत कारल्याची भाजी बनवून ठेवा , तर सगळ्यांनी एकमेकांच्या हो हो मध्ये स्वतःचा होकार दर्शवत मोठ्याने गलका केला चालेल मॅडम. पण गौरव खिलारे दोन्ही हात वर करून, नकारार्थी मान हलवत, मोठ्याने नाही खाणार म्हणाला. सगळे मुलं आणि मी एक स्वरात त्याला म्हटलो अरे आता म्हणाला की आई जे देईल ते खाईल म्हणून. पण तरीही तो त्याच्या नकारावर ठाम होता. मग तोच म्हणाला मॅडम मला माहित आहे, मला कारल्याची भाजी आवडत नाही आणि ती मी खाणार पण नाही. मग तुम्हाला सगळे म्हणतात म्हणून,आणि तुम्ही शाबासकी द्यावी म्हणून होकार कसा देऊ. त्याचे विचार ऐकून मीच निःशब्द झाले. सर्वांना मॅगीचे वाटप करून झाल्यावर मी उरलेली मॅगी छोट्या पातेल्यात काढत होते तेवढ्यात मुलांची प्रार्थना म्हणून झाली आणि मुलं म्हणाली मॅडम तुम्हाला पण घ्या ना खायला, मी म्हटलं बाळांनो तुम्ही सुरू तर करा, हे पातेलं घासून दूध तापायला ठेवते चुलीवर, म्हणजे तुमची मॅगी खाऊन झाली , सफाई झाली, झाडांना पाणी देऊन झाले की लगेच दूध देता येईल.

मुली म्हणाल्या नाही मॅडम तुम्ही आधी खा, उशीर झाला तरी चालेल. त्यांचं मन मोडवेना म्हणून मी दोन घास खाल्ले व पातेलं घासायला घेतले. त्या पातेल्यात दूध तापवायला ठेवले. आता मुलं मागे लागली, झालं ना तुमचं, आता खा. मी पटकन खाऊन होईल म्हणून हातानेच चमचा न घेता खायला सुरुवात केली, माझं सगळं लक्ष दुधाकडेच होते तेवढ्यात मुलांचा आवाज आला. मॅडम बघा ह्या मुली हातानेच खात आहेत, माझ्या लक्षात नाही आले, मी म्हटलं काय झालं,कशाला आवाज करत आहात, घ्या खाऊन लवकर. मग अश्विनी म्हणाली मॅडम तुम्ही हातानेच मॅगी खाल्ली, म्हणून आम्ही पण चमचा बाजूला ठेवून हातानेच खात आहोत. मला भरूनच आले. मुलांचं किती लक्ष असतं आपल्याकडे... त्यानंतर काम करताना, खाऊ खाताना चर्चा रंगल्याच होत्या म्हणून म्हटलं बाळांनो आज गोष्टींचा शनिवार आहे ना आपला, आधी आपण शब्दावरून गोष्ट तयार करू, शब्द डोंगर तयार करू आणि मग आपण सगळे एक एक गोष्ट वाचू आणि तीच सांगण्याचा तुम्ही प्रयत्न करायचा. मुलांची गोष्ट वाचून झाल्यावर मी प्रत्येकाला गोष्ट सांगायला सांगितली. त्या गोष्टीतून आपण काय शिकलो हे सांगताना प्रत्येकजण, मी माझ्यातच, स्वतः मध्येच कसा बदल केला पाहिजे हे सांगण्याचा प्रयत्न करत होता.

त्यावेळी आजचा उपक्रम यशस्वी झाल्याचे समाधान वाटले. कारण आपण प्रत्येकजण इतरांकडून अपेक्षा करत असतो. पण स्वतः मध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करण्यास तयार होत नाही, त्यामुळे आयुष्यात दुःख व नैराश्य येतं. आनंदी जीवन जगण्यासाठी फार काही लागत नाही, फ़क्त जे कार्य करू ते आनंदाने करू व कार्य केल्यानंतर जे प्राप्त होईल त्यातच समाधान मानू. असा एक छोटासा विचार मुलांनाच्या मनी रुजवण्याचा प्रयत्न होता. त्यांच्या विचारात झालेला बदल किती वेळ टिकेल माहीत नाही, पण त्यांना जाणीव होत आहे याचे खूप मोठे समाधान आहे. तीच सर्वाधिक अनमोल अशी गोष्ट आहे माझ्यासाठी.



# भूकंपामुळे तुर्कीची जमीन ५ मीटरने सरकली

आधुनिक केसरी

तुर्की आणि सीरियामध्ये निसर्गाचा मोठा प्रकोप पाहायला मिळाला. हे दोन्ही देश भूकंपाच्या प्रचंड मोठ्या धक्क्याने हादरले. ७ रिस्टर स्केलपेक्षा मोठ्या धक्क्याने क्षणार्धात होत्याचे नव्हते झाले. भूकंपामुळे दोन्ही देशात मोठ्या प्रमाणात वित्त आणि जीवितहानी झाली. भूकंपामुळे २० हजारांहून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. जखमींची तर गणतीच नाही. भूकंपाची भीषणता पाहता मृतांची संख्या आणखी वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. या विनाशकारी भूकंपानंतर जगभर हळहळ व्यक्त होत आहे. या प्रलयंकारी भूकंपाने ३० वर्षांपूर्वी महाराष्ट्रात झालेल्या प्रलयंकारी भूकंपाची आठवण झाली. ३० सप्टेंबर १९९३ रोजी लातूर उस्मानाबाद सीमेवर झालेला हा भूकंप महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातील सर्वात विनाशकारी भूकंप मानला जातो. ६.८ रिस्टर स्केलच्या या भूकंपात जवळपास ८ हजारांहून अधिक नागरिक मरण पावले होते तर २० हजारांच्या आसपास नागरिक जखमी झाले होते. या भूकंपात दोन्ही जिल्ह्यातील जवळपास ५२ गावे जमीनदोस्त झाली होती. आता तुर्की आणि सीरियामध्येही जवळपास हीच परिस्थिती आहे. जाणकार तर या भूकंपाला आजवरचा सर्वात मोठा भूकंप मानत आहे. २०११ मध्ये जपानमध्ये असाच प्रलयंकारी भूकंप आला होता मात्र तिथे इतक्या मोठ्याप्रमाणात जीवितहानी झाली नव्हती. २०११ मध्ये जपानमध्ये भूकंप झाला तेंव्हा तेथील जमीन सरकल्याचा दावा भू वैज्ञानिकांनी केला होता आताही तसाच दावा केला जात आहे. तुर्की सीरियामध्ये झालेल्या भूकंपाचा केंद्रबिंदू तुर्की होता. भूकंप झाल्यानंतर इथल्या टेक्टोनिक प्लेट्स ५ मीटर सरकल्याचा दावा तज्ज्ञांनी केला आहे. तुर्की ३ टेक्टोनिक प्लेट्समध्ये वसले आहे. या प्लेट्स म्हणजे अनाटोनिक्स टेक्टोनिकप्लेट्स, युरेशियन आणि अरेबिक प्लेट्स. तज्ज्ञांच्या मते अनाटोनिक्स टेक्टोनिक प्लेट्स आणि अरेबियन प्लेट्स २२५ किलोमीटर दूर सरकल्या आहेत. त्यामुळे तुर्की आपल्या भौगोलिक स्थानापासून ५ मीटर दूर सरकली आहे. अर्थात भूकंप झाल्यानंतर टेक्टोनिक प्लेट्स सरकणे ही नवी बाब नसली तरी इतक्या मोठ्या प्रमाणात टेक्टोनिक प्लेट्स सरकल्याने तज्ज्ञांनी चिंता व्यक्त केली आहे. टेक्टोनिक प्लेट्स सरकल्याने भविष्यात या भागात आणखी भूकंप होण्याची भीती तज्ज्ञांनी व्यक्त केली असून नद्यांची दिशाही बदलू शकते अशी भीती तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

श्याम ठाणेदार दौंड जिल्हा पुणे ९९२२५४६२९५

# नितळ, निर्मळ, निर्लेप मनानं लिहिलेल्या कवी शिवाजी नामपल्ले यांचा कवितासंग्रह 'आधारवड'

## संयमाचा परीघ



चित्र : बाबूराव पाटील, भोकर



प्रा. डॉ.मुकुंद राजपंखे
संपर्क क्र. 9881294226

भाग : १५

आधुनिक केसरी

तुम्ही लिहीता, ही आनंदाची गोष्ट.

याचा साधा सोपा अर्थ एवढाच की तुम्ही विचार करता. तुम्ही कविता लिहीता ही अजून आनंदाची गोष्ट की तुम्ही ताला-सुरात विचार करता.

तुम्ही चांगली कविता लिहीता याचा अर्थ तुम्ही चांगलाच विचार करता. हळवी कविता लिहायला लागणारं हळवं मन तुमच्या जवळ आहे.

कणखर कविता लिहायला लागणारं कणखर मन तुमच्या जवळ आहे. जेंव्हा तुम्ही म्हणता 'झाडं जोपासली पाहिजेत घरोघरी' याचा अर्थ इतकाच की 'तुम्हाला झाडा-झुरपाडांची उपयोगिता माहीत आहे'. तुम्ही म्हणता 'सगळी माणसं सुखी, समाधानी असायला हवीत' याचा अर्थ इतकाच की 'तुम्ही लोकशाही शिरसावंद्य मानता'.

तुम्ही 'जपले जावेत म्हणता आपले आई-बाप सगळ्यांचेच सगळ्यांकडूनच' याचा अर्थ इतकाच की 'कृतज्ञता मुरली आहे तमच्या नसानसात'.

'तुम्हाला आवडत नाही कुणी कुणाची विनाकारण केलेली पिळवणूक आणि समग्र शोषणाविरुद्ध लढा उभा करावा' म्हणता तेंव्हा 'तुम्ही तमाम पुरोगामी महापुरुषांच्या वाटेवर चालण्याची पुर्वतयारी केली आहे'.

तुम्ही जेंव्हा जेंव्हा म्हणता 'हे जग आनंदानं भरुन जावं' तेंव्हा तेंव्हा 'तुमच्या विकसीत, व्यापक अंतःकरणाला बहार आलेला असतो'.

तुम्ही कविता लिहीता म्हणजे 'तुम्ही विवेकवादी वर्तनाशी कटीबद्धधता स्विकारली आहे'.

तुम्ही कविता लिहीता याचा अर्थ इतकाच की 'तुम्ही अंतरंगातून उजळून घेतलं आहे तुमचं अंतःकरण,ज्याचा उजेड तुमच्यासहीत जगताचीही वाट उजळून टाकणार आहे'.

तुम्ही कविता लिहीता याचा सरळ सरळ अर्थ इतकाच की 'तुम्ही उघड उघड उजेडाची बाजू घेतली आहे'.

अगदीच आरंभीच हे ही स्पष्ट असो की या आणि अशा किती तरी कारणांसाठी कविता लिहिणारी व्यक्ती मग ती कोणत्याही वयोगटाची, भूप्रदेशाची,भाषेची, स्त्री असो नाही तर पुरुष, सगळे सारखेच.भूमीका बहुतेकाच्या भल्याचीच तर आहे ना, मग भावना आणि विचारांचा दर्जा कमी-अधीक असला तरी चालेल.

मुठभरांची मनमानी समर्थणीय म्हणणारे मुळाक्षरं कसे म्हणावेत बरं कविता ?

रचना जी अन्याय, अत्याचाराचे, विध्वंस, वैगुन्य, व्यभिचाराचे समर्थण करेल तीच्या भाषेचा पोत भलेही मखमली असला तरी मला म्हणवत नाही कविता मला.

या आणि अशा किती तरी गोष्टी उभ्या राहिल्या माझ्या नजरेसमोर, जेंव्हा मी नामवदे महोदयांनी पाठवलेलं कवितांचं बाड वाचलं.विविध साहित्यिक भूमिकांनी भारलेलं भवताल कवीच्या अवती-भवती असताना, त्यांच्या कवितांवर मात्र कसलाही प्रभाव जाणवत नाही, हे मला अधीक महत्वाचं वाटतं. आपल्या संवेदनेला जाणवलेलं, भावलेलं कवीनं जसं जमेल तसं मांडलं आहे, ज्याला कवितेच्या कसल्याही कसोट्या लावण्याची गरज नाही. हा दस्तैवज कसल्याही कवितेच्या व्याकरणीय कसोट्यांशीवाय पहायला हवा.आषयाचा दर्जा शोधत बसन्याचंही कांही कारण नाही कारण ही एका शिक्षक मनुष्याची आपली दिनक्रीया सुलभ करणरी सुरुवात आहे.अगदीच आरंभीचं निरागसपण जसं या कवितांनी आहे तसाच आषयाचं साधंसोपंपणही आहेच.आरंभ असल्याने, ही कविता कसल्याही एकांगी इझमला बळी पडत नाही. मुळातच हे समकालीन सामाजिक चळवळींची कसलीही बाधा न झालेलं हे छोटंसं कवितेचं पुस्तक आहे, ज्याचं स्वागत नितळ निर्मळ मनानंच वाचकांनी करावं ही अपेक्षा.

**कवी शिक्षक : शिवाजी निवृत्ती नामपल्ले**

कवी शिवाजी निवृत्ती नामपल्ले हे मुळात लोहा तालुक्यातील मुरंबीचे. बीएस्सी बीएड आणि एम ए इंग्रजीही आहेत महोदय.शाळेवर जिल्हा परीषद शिक्षक आहेत किनगाव परीसरात. 'आधारवड' या कवितासंग्रहातून समोर येत असलेला मानुष्य शिक्षक आहे आणि बालकांशी सुसंवादीत आहे याचाही मोठा आनंदच आहे.ज्यांना शाळेतुन सांस्कृतीकदृष्ट्या सुसंस्कारीत करायचं त्यांना साहित्याच्या अंगानं लिहितं बोलतं करण्यासाठी कविता, कथांइतकी इतकी निर्मळ वाट दुसरी नाही. अशा वेळी स्वतःच कविता लिहिणारी व्यक्ती आपल्याला शिकवायला असल्याचाही एक मोठा प्रभाव लेकरांवर पडत असतो ज्याचा सकारात्मक परीनाम विद्यार्थ्यांच्या भावनीक, वैचारीक जडण घडणीवर निश्चितपणे होत असतो. विद्यार्थ्यांचा दर्जेदार भाषिक विकास होत जातो. लेखण, वाचण, चिंतण आणि सादरीकरणाच्या पातळीवर विद्यार्थी गती घेतात. या आणि अशाच कितीतरी महत्वाच्या कारणांसाठी मी कवी नामवदे यांचं कवितेच्या क्षेत्रात स्वागत करायला हवं.

**'आधारवड' मधील आपुलकी, जिव्हाळा व्यक्त करणाऱ्या प्रेम कविता :**

या कविता संग्रहातील सुरुवातीच्या पंचेवीस कवितांनी व्यक्त झालेला निसर्ग, आणि प्रेम या सगळ्या कवितांचा आषय नितळ निर्मळ जग निर्माणाचा आहे. कधी प्रेयशीला 'हळदीचं खोंब' कधी 'जलपरी' कधी 'लावण्ययवती' कधी 'चंदण' तर कधी अधीकच मन गाभुळलं म्हणजे 'टिप्पारणी' संबोधून कविला तिची देहभूल पडल्याचे व्यक्त करते.मन पुन्हा था-यावर आलं की पुन्हा कवी व्यक्त होतो 'लावण्याची खणी' या रचनेत ते हे असं...

**"यौवनाच्या मस्तीत फिरुन**
**पदर डोईवर घे जरा सारुन"**

आता कुठल्याही परीस्थितीत जगणं आनंदानंच जगायचं तर मनाचा निश्चचय हा असाही करतो कवी 'प्रेम' कवितेत-

**" वाट सोडून गेली तरी**
**वाटेवर सरळ आनेन मी.**
**डोळे मिचकावून गेली तरी**
**डोळे तपासून आनेन मी"**

पशु,पक्षी,प्राणी आणि मनुष्य जीवन आनंददायी व्हावं ही व्यापक अपेक्षा, स्वप्न या सगळ्या कवितांच्या मुळाशी घट्ट मिठी मारुन आहे, याचा मोठा आनंद आहे.

'आपलं असं' ही रचना कवीची इच्छा व्यक्त करणारी आहे.

**"पळून पळून दमल्यावर**
**जवळ येवून रेशीम पदरानं**
**घाम पुसणारं असावं.**
**कुणीतरी आपलं असावं."**

जिवाभावाचं, आपल्यासाठी कुणीतरी जगणारं, मरणारं असावं ही रास्त अपेक्षा कवी ठेवतो. 'प्रेम हे असं कुणीतरी कुणालातरी जपणं असतं' याची सुंदर समज कविला आहेच ज्याची झलक या कविता संग्रहातील खूप सा-या कविता देत रहातात,हे चांगलंच आहे.

**आई-बापाच्या कविता :**

आधारवड या कविता संग्रहातील वडीलांबद्दलच्या दोन रचना आहेत आणि दोन्हीमधून वडीलांनी उपसलेल्या कष्टाबद्दलचा आदरभाव व्यक्त होतो.

आई विषयी लिहिलेली ही कविता कवीचा आईनं जन्मभर केलेल्या कष्टाबद्दलचं प्रेम-जिव्हाळा आणि आदर व्यक्त करतो...




**"माय माझी रोज रोज शेताकडं जायची**
**भाकर तुकडा मिळवुन पोटाला घालायची.**
**उन्हाचा तप्त गोळा, पोटाला मारुन खिळा,**
**पावसात न्हाऊन निघायची,**
**केसाच्या बटांना लुगड्याची चिंधी बांधायची."**

हे आठरा विश्व दारीद्र्य आईच्या जगण्यात सामावलेलं कवीनं पाहिलं आहे,त्यामुळं आई बद्यलचा आदर अगदीच अंतःकरणातून जाणवतो. वादळ वा-यात कौलारु घरं, पतरं उडून जात तेंव्हा भोगलेल्या यातनांनी कवी व्यथीत होतो आणि आईला विनम्र अभिवादन करतो.

'दादा तुम्ही' आणि 'मव्हा दादा' या दोन रचना कवीने लहानपणी बघितलेला बाप दर्शवतात जो कायम कष्ट करत राहिला आणि कुटुंबाचं पालण-पोषण केलं.

आपल्या बापाचा इतिहास लिहिताना कवी 'दादा तुम्ही' या कवितेत लिहितो...

**" विंचवाचं बि-हाड पाठीवर**
**जोंधळा काढला रुमणजवळ्यावर**
**संगं माय-भाऊ लहान पोरगं काखेवर,**
**काम केलं मरोस्तर."**

हे गावगाड्यात पिंजून निघालेलं आपल्या बापा-भावाचं जगणं मांडताना त्यांनी कांही मौलिक सांगीतल्याची नोंदही कवी करतो 'मव्हा बाप' या कवितेत ती ही अशी...

**"डॉ. बाबासाहेब अण्णा भाऊ**
**यांच्या लेखणीची कास धरा.**
**विद्याविभूषित बनुन**
**माझी अतृप्त इच्छा पुर्ण करा !"**

ही बापाची अतृप्त इच्छा ही अशी शिक्षक होवून, कविता लिहून, ती प्रकाशीत करुन कवीने पुर्ण केली आहे.

**उद्याच्या व्यापक जनहीताची कविता लिहिण्यासाठी हार्दिक स्वागत :**

आज चालत असलेली ही कवितेची वाट निश्चितपणे नवं,निर्लेप,निरागस काव्य आहे आणि त्यामुळंही या कविचं हार्दिक स्वागतच आहे. ही सुंदर सुरुवात आहे. उद्या मनगटातल्या जोराची ओळख पटेल आणि अन्यायी व्यवस्थे विरुद्ध कवी शब्द उच्चारील हा आशावाद आहेच. कवी शिवाजी नामपल्ले यांच्या हातून आणि त्यांच्या शाळेमधूनही सातत्यानं हा काव्यलेखणाची गोडी लागेलच या बद्ध मला खात्री वाटते. कवी वन्या पिढीच्या अंतःकरणातील ओल कवी वाळू देणार नाही निश्चितपणे याची मला खात्री वाटते. कवी शिवाजी नामपल्ले अधीक उर्मीने लिहिते, बोलते रहावेत आणि त्यांच्या हातून गावकुसाबाहेरील व्यथा वेदनांच्या कवितांसोबतच समग्र मानवी जीवन उन्नत करणारी कविता लिहिली जावी यासाठी हार्दिक स्वागत करतो.

**कविवर्य शिवाजी नामपल्ले यांच्या पैल्यारुपणासाठी हार्दिक अभिनंदन !**

**पुस्तक : आधारवड**
**कवी : शिवाजी नामपल्ले**
**प्रकाशक : मराठीचे शिलेदार प्रकाशन, नागपूर**
**किंमत : १२० रु.**

**(लेखक मराठी भाषेचे साहित्यिक आणि इंग्रजी भाषेचे संशोधन मार्गदर्शक आहेत)**

# प्रेमात पडले तरी ...



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**भारतीय संस्कृतीत जसे सणांना महत्त्व असते तसेच पाश्चिमात्य भावविश्वास एक दिवस नात्यांसाठी निश्चित केला जातो. त्यानुसार फ्रें डशीप-डे, मदर्स-डे , फादर्स-डे यासारख्या दिवसांसोबतच दरवर्षी 14 फेब्रुवारीला 'व्हॅलेंटाईन-डे' नावाने प्रेम दिवस साजरा केला जातो.गेल्या दोन दशकांपासून भारतात हा दिवस प्रकर्षाने जाणवतो. जोडीदारासोबत हा दिवस संस्मरणीय बनवण्यासाठी विविध फंडे शोधले जातात. परंतु, तरुण-तरुणीच्या प्रेमापुरता मर्यादित असलेल्या या दिवशी 'प्रेमभंग' होण्याचे प्रकार वाढीस लागले.**

यातून मनोविकार आणि गुन्हे घडताना दिसतात. त्यामुळे 'प्रेमात पडले तरी डोळे उघडे आणि मन विचारी ठेवा.

हल्ली व्हॅलेंटाईन-डे साजरा करणे प्रतिष्ठेचे समजले जाते. यादिवशी सुरू झालेले प्रेम किती दिवस टिकेल याची काहीच खात्री नाही. कारण एखाद्या मुलाला 'गर्लफ्रेंड' नाही आणि मुलीला 'बॉयफ्रेंड नाही' या विचारानेच अनेक जण गर्लफ्रेंड-बॉयफ्रेंडच्या शोधात एकमेकांवर प्रेम करत असतात. तर अधिकांश तरुण-तरुणी कुमारावस्थेत असल्याने केवळ आकर्षणाने जवळ आले असतात.

तरुण-तरुणीमध्ये हार्मोन्स बदलामुळे एकमेकांबद्दल आकर्षण निर्माण होते. त्याला 'प्रेम' असे म्हणता येणार नाही. याच प्रक्रियेत एका मुलीला अनेक मुले तर एका मुलाला अनेक मुलीदेखील आवडू शकतात. यालाच 'ट्रायल अँण्ड एरर'(चुका आणि शिका) असेही म्हणता येईल. ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. मात्र अशा अवस्थेतच अनेक चुका तरुण-तरुणीकडून होताना दिसून येतात, आणि या सर्व प्रकारांना पालकांनाच समोर जावे लागते. त्यामुळे प्रत्येक मुलांच्या आई-वडिलांनी त्यांना योग्य मार्गदर्शन करणे आवश्यक आहे.

आपली मुलं दररोज काय करतात याविषयी आई-वडिलांना माहिती असणे गरजेचे आहे. सोशल मीडियाचादेखील वापर आपली मुले कसा करत आहेत याविषयी देखील माहिती पालकांनी ठेवणे गरजेचे असून वेळ पडली तर त्यांच्या सोशल मीडियावरील मॅसेजदेखील पालकांनी तपासणे गरजेचे आहे. एवढेच नाही तर प्रत्येक आई-वडिलांना सोशल मीडियाचे अद्यावत ज्ञान असणेदेखील गरजेचे आहे. मात्र, यासाठी पालक आणि मुलांमध्ये दैनंदिन संवाद असणे गरजेचे आहे. तरच मुलांना जीवन कसे जगावे याविषयी



माहिती मिळेल.

सध्याच्या परिस्थितीत 'निःस्वार्थ प्रेम' ही संकल्पनाच लोप पावल्याचे दिसून येते. त्वरित मिळणारे समाधान यामागे सध्याची पिढी धावताना दिसून येते. कुमारावस्थेत 'निःस्वार्थ प्रेम' ही संकल्पनाच नसते. व्यक्तिमत्वात प्रगल्भता येते त्याचवेळेस निःस्वार्थ प्रेम अनेक जोडीदारांचे एकमेकांवर असल्याचे दिसून येते. जोडीदारापैकी एक सदस्य निःस्वार्थ प्रेम करत असतो. त्यामध्ये मुलींचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते.

व्यक्तिमत्वात प्रगल्भता येण्याआधी 'प्रेम' या संकल्पनेच्या आधारे सुरूझालेल्या संबंधाचे रुपांतर पुढे शारीरिक संबंधात होत असते. लग्नाआधी 70 टक्के तरुण-तरुणी शरीर संबंध ठेवतात, असे संशोधानातून सिद्ध झाले आहे. त्यामुळे प्रेम करताना अथवा आपला जोडीदार निवडताना बुद्धीचा वापर करून तसेच सभोवतालच्या परिस्थितीचा सारासार विचार करूनच समोरच्या व्यक्तीची निवड करावी. अन्यथा यामधूनच देहविक्री, गँगरेप, बलात्कार अशा गुन्ह्यांची निर्मिती झाल्याचे दिसून येते.

प्रेमसंबंधातून एखाद्याचा खुन करणे अथवा स्वतःच आत्महत्या करणे याचे प्रमाण वाढल्याचे दिसून येते. या सर्व घटना के वळ एकमेकांशी संवाद तुटल्यानेच घडतात. प्रेमसंबंधात नकार पचवायचीदेखील तयारी समोरच्याची असणे गरजेचे आहे.'मला आवडलेली वस्तु मला मिळाली नाही तर ती कोणालाही मिळणार नाही' असा विचार मनात येणे म्हणजे हे मानसिक विकृतीचे लक्षण आहे. त्यावर समुपदेशन होणे गरजेचे आहे. प्रेमसंबंधातून निराश झालेल्या व्यक्तींनी त्यांच्या भावना इतरांशी व्यक्त क रणे गरजेचे असून त्यामुळेच अशा चुकीच्या घटना टाळता येतील.

# छत्रपती शाहू महाविद्यालयाला प्रथम पारितोषिक

## भोपाळ येथील इंडियन इंटरनॅशनल सायन्स आंतरराष्ट्रीय विज्ञान महोत्सव

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** कांचनवाडी येथील छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था संचलित (सी. एस.एम.एस.एस.) छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या टीफण टीम समस्काराच्या विद्यार्थ्यांनी स्वयंचलित रोप लागवडणी यंत्र बनवलेले आहे. विद्यार्थ्यांनी विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालय आणि अंतराळ मंत्रालयाने आयोजित केलेल्या एन.आय.टी., भोपाळ येथे इंडियन इंटरनॅशनल सायन्स फेस्टिवल (आय. आय. एस. एफ.) आंतरराष्ट्रीय विज्ञान महोत्सवात स्वयंचलित पालेभाजी लागवड यंत्राला प्रथम पारितोषिक प्राप्त केले.

इंडियन इंटरनॅशनल सायन्स फेस्टिव्हल (आयआयएसएफ) हा भारतीय विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या यशाचा उत्सव आहे आणि वैज्ञानिक वृत्ती निर्माण करण्यासाठी आणि विज्ञानाची आवड वाढवण्यासाठी लोकसहभागाचा उत्सव आहे. 2018 पासून लखनौ येथे विज्ञान आणि तंत्रज्ञान संचालक , अंतराळ मंत्रालयाने याचे आयोजन केले होते. 2019 मध्ये कोलकाता 2021 गोवा आणि 2022 मध्ये मध्य प्रदेश येथे आयोजन केले होते. टोमॅटो, मिरची आणि वांगी यांसारख्या वनस्पतींची लागवड स्वयंचलित भाजीपाला लागवड यंत्राद्वारे करता येते. ही यंत्रणा कमीत कमी मनुष्यबळ आणि कमी वेळेत अधिक भाजीपाल्याची रोपे लावू शकते. यंत्रामुळे दोन रोपांमधील अंतरही कमी होते, त्यामुळे कमी जागेत जास्त उत्पादन मिळते. ट्रेमधुन रोप उचलुन हे आपोआप जमिनीत लावले जाते. यंत्र विकसित करण्यासाठी महाविद्यालयाच्या टीममध्ये आणि वैभव जाधव (कॅप्टन), सोपान भोपळे (ॲडमिनिस्ट्रेशन), अभिषेक अधाने (लॅब मॅनॅजमेण्ट), रविंद्र घाटे आणि महेश हेंद्रे (फीडिंग सिस्टिम), शेख दानियाल, गुफरान अन्सारी (पिक-अप,हॉपर मेकॅनिझम), गणेश जंढे, राणी राठोड, (पॉवर ट्रान्समिशन) अनिकेत विसपुते, रोहन मुरदारे, ओम घाडगे, अनिकेत गाडे, पवन कर्पे, श्रीनाथ पाटील, नितीन ताठे, हरिओम काबरा, अनिकेत साळुंके, अर्जुन मटने, बिनीत सिंग, ओंकार हुगेवार (मॅनुफॅकच्युरींग), जान्हवी पाटील, मयुरी जामदार, रिया धूत, जान्हवी बैरागी, आरती मोहन (मार्केटिंग), निकिता राठोड, प्रदीप डोंगरे, महेश लघाणे, अल्ताफ शेख (ॲक्चुएटर अँड लॉजिक प्रोग्रामिंग सिस्टिम), फॅकल्टी ॲडवाईझर प्रा. सचिन लहाने, प्रा युवराज नरवडे, मेकॅनिकल विभाग प्रमुख डॉ. आर. पी. चोपडे, अंकिता ॲग्रो इंजिनीरिंग चे डायरेक्टर श्री एस. एन. पाटील, श्री विष्णू खडप, श्री सुनिल जाधव व शेती अभ्यासक श्री.जनार्धन कांबळे यांचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री. रणजित मुळे, सचिव श्री. पद्माकर मुळे, प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख, प्राचार्य डॉ. उल्हास शिंदे यांनी अभिनंदन केले आहे.

स्वयंचलित रोप लागवडणी यंत्राच्या प्रकल्पाचे प्रजासत्ताक दिनानिमित्त राजभवन येथे सादरीकरण छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयाच्यामधील टीफण टीम समस्काराच्या विद्यार्थयांनी स्वयंचलित रोप लागवडणी यंत्र बनवलेले आहे. पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठामध्ये १० जानेवारी ते १४ जानेवारी दरम्यान 'अविष्कार' या उपक्रमांतर्गत ८० प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले होते. त्यामधून छत्रपती शाहू कॉलेजमधील पालेभाजी लागवड यंत्राची राजभवन, मुंबई येथे प्रकल्पाच्या सादरी कारणासाठी निवड झाली होती. २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त या प्रकल्पाचे सादरीकरण राज्याचे राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी, मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे आणि पालकमंत्री श्री. मंगलप्रभात लोढा यांनी या स्टॉलला भेट देऊन विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्यात.





# वसंत केसरीचा मानकरी पै.माऊली कोकाटे

आधुनिक केसरी न्यूज

**ज्योती खिलारे**

**पंढरपूर :** भाळवणी पै.संतोष जगताप आणि माऊली कोकाटे यांच्यामध्ये सहकार शिरोमणी वसंतराव काळे साखर कारखाना कार्यस्थळावर ' वसंत केसरी ' किताबासाठी झालेल्या अटीतटीच्या लढतीमध्ये पै.माऊली कोकाटेने घुटना डावावर चित करुन ' वसंत केसरी चषक' पटकावला सांगोला विधान सभा मतदार संघाचे आमदार ॲड शहाजीबापू पाटील व कारखान्याचे अध्यक्ष कल्याणराव काळे यांच्या हस्ते पै.माऊली कोकाटे यांना 2.51 लाख रोख, प्रशस्ती पत्र व वसंत केसरी चषक देवुन गौरविण्यात आले. कारखान्याचे संस्थापक स्व्. वसंतरावदादा काळे यांच्या 21 व्या पुण्य्तिथीनिमित्त् कारखाना कार्यस्थळावर लाल मातीतील जंगी कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. आखाड्याचे पुजन कारखान्याचे संचालक बिभिषन पवार, भैरवनाथ शुगर्स लि चे व्हा.चेअरमन अनिलदादा सावंत, धनश्री परिवाराचे शिवाजीराव काळुंगेसर यांचेहस्ते करण्यात आले. वसंतराव काळे चषकासाठी कुर्डूवाडीच्या शिवराय व्यायाम शाळेचा माऊली कोकाटे आणि शिवनेरी तालीम अकलुज येथील नामदेव वाघमारे यांचा पट्टा संतोष जगताप या तोडीस-तोड व जोडीस-जोड असलेल्या मल्लांमध्ये आमदार ॲड शहाजीबापू पाटील व कारखान्याचे अध्यक्ष कल्याणराव काळे यांच्याहस्ते कुस्ती लावण्यात आली. खडाखडी, डाव प्रतीडाव करत अवघ्या काही मिनीटात कोकाटेने पै.जगतापला आस्मान दाखवले. तर व्दितीय इनामी कुस्तीमध्ये गंगावेस तालीम कोल्हापूर येथील पै.सतपाल नागटिळक याने दिल्लीचा पैलवान खान यास चितपट करुन वसंत केसरी चषक पटकावला. लाल मातीतील या कुस्ती मैदानात प्रथम लहान गटातील पै.सुर्या अभंगराव विरुध्द् पै.निखील माने याच्या कुस्तीने सुरुवात करण्यात आली. सदर कुस्ती मैदानात घिस्सा, भारंदाज, कलाजंग, धोबीपछाड, साल्तो, बॅकथ्रो या कुस्ती कलेतील अनेक डाव प्रतिडावाने सहकार शिरोमणी कारखान्यावरील कुस्ती मैदान प्रेक्षणीय व लक्षवेधक ठरले. हालगी व घुमक्याचा ठेक्याने आणि वस्ताद धनाजी मदने यांच्या कुस्तीच्या धावत्या समालोचनाने उपस्थित कुस्ती शौकीनांमध्ये नवचैतन्य् निर्माण केले. उपस्थित मान्यवरांनी समालोचनाचे कौतुक करुन धनाजी मदने यांना रोख रक्कमेचे बक्षिस दिले. सदर कुस्ती मैदानात महिलापट्टुनेही सहभाग घेतला.

सर्व विजेत्या मल्लांना श्रीविठ्ठल सह.साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील, भैरवनाथ शुगर्स लि चे व्हा.चेअरमन अनिलदादा सावंत, धनश्री परिवाराचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव काळुंगेसर, स्वेरी इंजिनिअरींग कॉलेजचे प्राचार्य-सचिव बब्रुवाहन रोंगे, शिवसेना जिल्हाध्यक्ष संभाजी शिंदे, शिवसेनेचे सहसंपर्क प्रमुख सुधाकर कवडे, मनसेचे प्रदेश सचिव दिलीप धोत्रे, निशिगंधा बँकेचे मा.व्हा.चेअरमन विलास साळुंखे, व्हा.चेअरमन आर.बी.जाधव, विठ्ठल सुतगिरणीचे चेअरमन दिनकर पाटील, यशवतराव चव्हाण पतसंस्थेचे चेअरमन शहाजी साळुंखे, प्रतिभादेवी पतसंस्थेचे चेअरमन विष्णु यलमार, पंढरपूर तालुका कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष हणमंत मोरे, विरोधीपक्षनेते नगर पालिका पंढरपूर सुधिर धोत्रे, माजी नगरसेवक सुधिर धुमाळ, जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे सचिव अमर सुर्यवंशी, शहराध्यक्ष राजेश भादुले यांचे हस्ते रोख रक्कम व प्रशस्ती पत्र देवुन सन्मानित करण्यात आले.


# अनिलकुमार साळवे यांना उत्कृष्ट चित्रपट लेखनाचा आंतरराष्ट्रीय पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** मनोज कदम निर्मित, अमृत मराठे सहनिर्मित बहुचर्चित मराठी चित्रपट ग्लोबल आडगाव चित्रपटाचे लेखक दिग्दर्शक अनिलकुमार साळवे यांना अमेरिकेतील न्यू जर्सी आंतरराष्ट्रीय मराठी फिल्म फेस्टिव्हलमध्ये द बेस्ट रायटर हा पुरस्कार मिळाला आहे.

2023 या नव्या वर्षात मराठी चित्रपटांना चांगले दिवस आले आहेत. रितेश देशमुख यांचं वेड , परेश मोकाशी यांचा वाळवी हे सुपर हिट ठरले. त्या पाठोपाठ सिल्व्हर ओक फिल्म्स अँड एंटरटेनमेंट मनोज कदम निर्मीत अमृत मराठे सह निर्मीत आणि अनिलकुमार साळवे दिग्दर्शीत मराठी चित्रपट ग्लोबल आडगाव देश विदेशात नावलौकिक प्राप्त करत आहे. आतापर्यंत 10 अंतरराष्ट्रिय चित्रपट महोत्सवात चित्रपटांची निवड झाली असुन दोन आंतरराष्ट्रिय पुरस्कार मिळाले आहेत. नुकत्याच अमेरिकेतील न्यू जर्सी या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात ग्लोबल आडगाव चित्रपट चे लेखक दिग्दर्शक अनिलकुमार साळवे यांना 'बेस्ट रायटर अवॉर्ड 'मिळाला आहे. अमेरिकेतील या मानाच्या पुरस्कारामुळे मराठी चित्रपटसृष्टीत आणि जागतीक पातळीवर ग्लोबल आडगाव चित्रपताची सकारात्मक चर्चा होत आहे.

अनिलकुमार साळवे यांना अमेरिकेतील महाराष्ट्र फाउंडेशन चा रां .श. दातार पुरस्कार , युवक महोत्सवात 5 वेळा सांघिक पुरस्कार , माजलगाव भूषण पुरस्कार, समाज भूषण पुरस्कार आदींसह अनेक सन्मान प्राप्त झाले आहेत. अनिलकुमार साळवे यांनी या पूर्वी 4 लघुपट दिग्दर्शीत केले आणि 39 एकांकिका लिहिल्या, 6 नाटके 12, पथनाट्ये लिहिली आहेत. 15 ऑगस्ट लघुपटास प्रभातचा व्ही. शांताराम, दादासाहेब फाळके, लंडनचा न्यू लिन बेस्ट FILM अवॉर्ड असे 91 आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत. ग्लोबल आडगाव चित्रपटासाठी अशोक कानगुडे या अभिनेत्यास अजंठा वेरूळ आंतरराष्ट्रिय चित्रपट महोत्सवात बेस्ट सहायक अभिनेता पुरस्कार मिळाला. शेतकरी पुत्र असलेल्या आणि राष्ट्रीय उद्योजक्ता पुरस्कार विजेता उद्योजक मनोज कदम यांनी ग्लोबल आडगाव चित्रपटाची निर्मिती केली आहे. या चित्रपटात ग्रामीण संवाद म्हणी, यांचा सुरेख वापर केला आहे. कथेला पुढे घेऊन जाणारी गाणी आहेत.



'ग्लोबल आडगाव' हा बहुआयामी लेखक आणि पुरस्कार विजेते व्यक्तिमत्व डॉ.अनिलकुमार साळवे दिग्दर्शित एक बिग-बजेट चित्रपट आहे. अभिनेता प्रा. डॉ. सिद्धार्थ तायडे यांनी सहदिग्दर्शन केले आहे. पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासह 'ग्लोबल आडगाव' हा चित्रपट कोलकाता आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात निवडण्यात आला आहे. तसेच अधिकृतपणे न्यू जर्सी इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल अमेरिका साठी निवडला आहे. या चित्रपटास देश-विदेशातील नामवंत प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. नुकत्याच संपन्न झालेल्या अजंता एलोरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात अशोक कानगुडे याला सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेता पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव हा जगातील प्रसिद्ध चित्रपट महोत्सवापैकी एक प्रतिष्ठित चित्रपट महोत्सव आहे. या महोत्सवात प्रेक्षकांना ग्लोबल आडगाव चित्रपट टाने चांगलीच भुरळ घातली. महाराष्ट्र शासन आयोजित यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातही ग्लोबल आडगावची निवड झाली आहे. या चित्रपटात सुप्रसिद्ध अभिनेते सयाजी शिंदे, उषा नाडकर्णी, उपेंद्र लिमये, अनिल नगरकर, सिद्धी काळे, शिवकांता सुतार, अशोक कानगुडे, महेंद्र खिल्लारे, रौनक लांडगे, अनिल राठोड, संजीवनी दिपके, डॉ. सिद्धार्थ तायडे, साहेबराव पाटील, प्रदीप सोळंके, रानबा गायकवाड, विष्णू भारती, जालिंदर केरे, विक्रम त्रिभुवन, विष्णू चौधरी, परमेश्वर कोकाटे, प्राजक्ता खिस्ते, आशिर्वाद नवघरे, प्रियंका सदावर्ते, जगदीश गोल्हार, ऋषिकेश आवाड, विक्की गुमलाडू, मंगेश तुसे प्रमुख भूमिकेत आहेत. प्रख्यात गायक आदर्श शिंदे, डॉ. गणेश चंदनशिवे आणि जसराज जोशी यांनी गीतांना स्वरसाज चढविला आहे. प्रशांत जठार, निर्मिती व्यवस्थापक सागर देशमुख, छायाचित्रण गिरीश जांभळीकर, संगीत विजय गावंडे, ध्वनी विकास खंदारे, कलादिग्दर्शन संदीप इनामके, संकलन श्रीकांत चौधरी, डीआय दिशा रंगालय, मेकअप मंगेश गायकवाड यांनी केला आहे.

# अजित सिड्स प्रा. लि. प्रायोजित औरंगाबाद खो-खो प्रीमियर लीग १९ फेब्रुवारीपासून

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त प्रख्यात बियाणे कंपनी अजित सिड्स प्रा. लि. आणि औरंगाबाद जिल्हा खो-खो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने औरंगाबाद खो-खो प्रीमियर लीग चे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा रविवार, दि. १९ फेब्रुवारी २०२३ रोजी सायंकाळी ठीक ०४ वाजता जिल्हा परिषद मैदान, औरंगपुरा, औरंगाबाद येथे होणार आहे, याबाबतची माहिती अजित सिड्स प्रा. लि. व्यवस्थापकीय संचालक तथा औरंगाबाद जिल्हा खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष श्री. समीर पद्माकर मुळे यांनी दिली आहे.

औरंगाबाद खो-खो प्रीमियर लीगमध्ये एकूण ०४ संघ असून प्रत्येक संघात ०७ पुरुष खेळाडू, ०६ महिला खेळाडू, ०३ खेळाडू हे १४ वर्षाखालील वयोगटातील राहणार आहे. या संघात संपूर्ण सामने हे साखळी पद्धतीने खेळवण्यात येणार आहे. साखळी पद्धतीच्या सामन्यात ज्या दोन संघाचे अधिक असतील ते संघ अंतिम सामन्यासाठी पात्र ठरणार आहेत.

संघ पुढीलप्रमाणे-

स्पर्श डिफेंडर : वरद कचरे ( कर्णधार), अमित हलदीकर, मयूर जाधव, सुकन्या जाधव, आकांक्षा क्षीरसागर, देवगिरीकर, शर्वरी भगत, निल जावळे, अजय साबळे, विनायक सूर्यवंशी, रोहित बोरडे, आदित्य भंगाळे, ओम लोंढे, साक्षी चौधरी, प्रणव पाटेकर, वैष्णवी, आदित्य

गोदावरी लॉयन्स : नितीन इंगळे (कर्णधार), प्रमोद गुंड, पूजा सोळंके, भक्ति कुलकर्णी, अभिषेक गावित, मृणाल जोगदंड, दिशा, अनिकेत मराठे, मोहित कान्होरे, अतुल गावित, हर्षल पाडवी, प्रतीक चव्हाण, वेदिका गोर्डे, समर्थ हातकर्णे, ऋतुपर्ण कातुरे, वैष्णवी माळी, तनिष्क शर्मा.

समर्थ टायगर्स : राजपाल निकाळजे (कर्णधार), अस्मित गावित, अनिकेत मालोदे, सोजल जाधव, ऋतिका हाके, दिव्या बोरसे, शर्वरी पाटील, भीम सोनटक्के, दक्ष क्षीरसागर, वेदांत गावित, आशिष ठाकरे, तेजराज होले, धनश्री गोर्डे, स्वरूप सुरडकर, विरेन, सोनाक्षी, सम्यक हिवाळे.



पद्मावती अटॅकर : आकाश खोजे (कर्णधार), योगेश भोगे, सूरज चिरमाडे, प्राची कर्डिले, आकांक्षा हरकळ, आनंदी मामुर्डे, वैष्णवी पवार, यश मोरे, आर्यन सहारे, रुपेश चौधरी, योगेश राऊत, आर्यन सपकाळ, अक्षदा लासुरे, साई पवार, हरिष, प्रणव मुळे.

स्पर्धेतील सर्व संघास अजित सिड्स प्रा. लि. च्या वतीने गणवेश देण्यात येणार आहे.

या खो-खो प्रीमियर लीगसाठी जास्तीत जास्त खो-खो खेळाडू, प्रशिक्षक, क्रीडा शिक्षक, पालक तसेच क्रीडा प्रेमींनी उपस्थित राहावे, असे आवाहन औरंगाबाद जिल्हा खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष श्री. समीर पद्माकर मुळे, महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस श्री. गोविंद शर्मा, जिल्हा खो-खो असोसिएशनचे कार्याध्यक्ष श्री. बालाजी सागर किल्लारीकर, उपाध्यक्ष श्री. ऋषिकेश जैस्वाल, सारिका भंडारी, सचिव श्री. विकास सूर्यवंशी, सहसचिव भारती काकडे, अभयकुमार नंदन, विनायक राऊत, आशिष कान्हेड, श्रीपाद लोहकरे, मनोज गायकवाड यांनी केले. अधिक माहितीसाठी राहुल नाईकनवरे 9527883546 यांच्याशी संपर्क साधावा.



# इंदिरानगरात गुंडांचा हैदोस

## त्रस्त नागरिकांनी घेतली पोलीस अधीक्षक यांच्या कार्यालयास घेतली धाव

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** इंदिरानगर भागात असलेले लक्ष्मी माता व विश्वकर्मा मंदिर असून तेथे काही गावगुंड रोज रात्री मंदिरावर बसून दारू पितात व मंदिराच्या हडसाला अनैतिक कृत्य करतात व बसून मोबाईलवर जोरजोरात गाणे वाजून शिवीगाळ करतात आजूबाजूच्या राहणारे नागरिकांनी विरोध केल्यावर शिवीगाळ करून मारहाण करतात. या सर्व गावगुंडांचे चेहरे सीसीटीव्ही कॅमेरा मध्ये समाविष्ट झाले आहेत यासाठी पोलीस अधीक्षक यांच्या कार्यालयास धाव घेऊन त्यांना या गोष्टीची संपूर्ण व्यथा सांगून ताबडतोब यांच्यावर कारवाई करण्यासंदर्भात निवेदन देण्यात आले. व पोलीस अधीक्षक यांनी नागरिकांना समजावून सांगितले की कुठलीही घटना घडल्यास अगोदर 112 नंबर डायल करा त्यासाठी तुम्हाला स्वतंत्र ताकद दिली आहे तुम्ही त्याचा वापर करा.

या गोष्टी केल्यास माझ्यापर्यंत येण्याची गरज पडणार नाही असे या ठिकाणी परिसरातील नागरिकांना समजावून सांगण्यात आले व निराकरण करून कारवाईचे आश्वासनही दिले व नागरिकांनी सदर आरोपींची नावे पोलीस अधीक्षक यांच्याकडे सोपवण्यात आले आहेत.या निवेदनास उपस्थित. संध्या चौधरी, ज्योती बोरसे, देवकाबाई मिस्तरी, मंगलाबाई निकम, निर्मलाबाई पाटील, सुनीता पाटील, सुरेखा हिरे, मायाबाई राखपसारे, ललिता अहिरे, प्रेरणा देसाई, सुरेखा पाटील इत्यादी उपस्थित होते.

# सार्वजनिक शिवजयंती अध्यक्ष संदिप खरे; उपअध्यक्ष पवन ठाकूर यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शिवजयंती उत्सव समिती २०२३ ची बैठक शिवाजी महाराज पुतळा परिसरात संस्थापक अध्यक्ष सुनील पवार, मनोज देशमुख, शेखर शिंदे, सुरेश चव्हाण, साईनाथ करवंदे विजय भोसले, सिद्धार्थ निकाळजे, अमोल मैराळ, संदेश पवार, प्रकाश सिरसे, प्रदीप बोडखे, अविनाश काळे, श्रीराम घुगे यांच्या उपस्थितीत झाली. कार्यकारिणी निवड करण्यात आली. अध्यक्ष संदीप खरे पाटील, उपाध्यक्ष पवन ठाकूर, योगेश जाधव, सचिव सोपान शिरसाठ, कार्याध्यक्ष यश गायकवाड, कोषाध्यक्ष संदीप नरवडे,सहसचिव राकेश शर्मा, गणेश साळुंके, सहकोषाध्यक्ष गोविंद वर्मा, किशोर पवार, स्पर्धा





समिती, प्रवीण जमदाले ,प्रवीण वेताळ, निलेश काथार, विजय बोरसे, राहुल सिरसे, बाळू आल्हाड, मिरवणूक नियोजन अध्यक्ष शिवराज पाटील, अमोल जाधव सदस्य- प्रवीण दाभाडे, नितीन घाडगे, दीपक डोळस, साईनाथ करवंदे, विष्णू मनगटे. यावेळी शिवप्रेमी उपस्थीत होते.

# ज्योतिषाचार्य प्रकाश जगदीशप्रसाद जांगिड यांना आचार्य व वास्तुशास्त्र उपाधी

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** राजराजेश्वरी हस्तरेखा वास्तु, ज्योतिष अनुसंधान संस्थान आणि सेंटर फॉर एडवांस रिसर्च इन पामिनट्री एंड डरमाग्लाफिक्स पंढरपुर यांच्याकडून 11/12 फ़रवरी 2023 रोजी पंढरपुर मध्ये ज्योतिष,वास्तुशास्त्र, हस्तरेखा का महासम्मेलन घेण्यात आले आणि त्याचे आयोजन श्रीमती रेखा किशोरीजी टाक और डॉ शैलेशजी बजाज जी, दाते पंचांग के निर्माते श्री मोहनजी दाते, श्री लक्ष्मण पंथी (नेपाल)डॉ दामोदर बंसलजी (जयपुर) , पंडित श्री गुड्डू महाराज (उज्जैन),दिलीप अवस्थी जी (जयपुर), कुबेर उपासक श्री प्रिया मालवाकर या महान ज्योतिषाचाऱ्य कडून प्रोग्राम संपन्न झाला आणि त्यांच्या पात्रतेनुसार त्यांना पुरस्कार / उपाधि देण्यात आली त्यात आचार्य ज्योतिषचार्य श्री प्रकाश जगदीश प्रसाद जांगिड यांना वास्तुशास्त्र ही उपाधि देण्यात आली आणि श्री सोमेश माने कोल्हापुर यांना ग्रैंड रेकी मास्टर, किशोर देशमुख प्रवीण कांगने यांना ज्योतिषाचार्य ही उपाधि देण्यात आली, संमेलन मध्ये 300 से 400 लोग उपस्थित होते आणि नंतर प्रोग्राम ची सांगता करण्यात आली.



# जंगलीकोठा येथे शालेय मुलांमार्फत पौष्टिक तृणधान्य कार्यक्रमाची जनजागृती

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** कृषी विभागाच्या वतीने तालुका कृषि अधिकारी एस. जी. वाघ यांचे मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा परिषद शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक व कृषि विभाग सोयगांव येथील कृषि सहाय्यक यांचे सहकार्याने जंगलीकोठा येथे कृषि विभागामार्फत शालेय मुलांमार्फत संपूर्ण गावात प्रभात फेरीच्या माध्यमातून पौष्टिक तृणधान्य कार्यक्रमाची जनजागृती करण्यात आली. कृषि सहाय्यक बी. ए. वायकर यांचे मार्फत ज्वारी पिकाचे आहारातील महत्त्व तसेच फायदे याविषयी सखोल असे मार्गदर्शन करण्यात आले यात प्रामुख्याने ज्वारीत असलेल्या तंतुमय पदार्थ, थायमिन, रायबोफ्लोवीन, फॉलिक असिड, कॅल्शीयम यांचे महत्त्व सांगण्यात आले. तसेच ज्वारी पिकाचे आहारात असलेले अनन्यसाधारण असे महत्त्व सांगून होणारे फायदे यात प्रामुख्याने हृदयविकार, स्थुलता कमी होणे, संधिवात कमी होणे तसेच गर्भवती महिलांसाठी आवश्यक खजिने व जीवनसत्त्वे यांची उपलब्धता होते तसेच मधुमेहासाठी गुणकारी आहे असे सांगण्यात आले. आजच्या कार्यक्रामात ए.एस.महाजन तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक सोयगाव यांनी प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेची माहिती दिली व योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले. आजच्या कार्यक्रमास मुख्याध्यापक जिल्हा परिषद शाळा बोरमाळ एन आर मोरे, शिक्षक एस ए पाटील,एल एस भानगडे, एम आर बच्छाव, सी के कांबळे, ए.एस.महाजन तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक सोयगाव, बी.ए. वायकर कृषि सहाय्यक नांदगाव, यांनी मार्गदर्शन केले सदरील कार्यक्रमाला गावाचे सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील, प्रगतीशील शेतकरी, शालेय विद्यार्थी, कृषि मित्र व गावातील ग्रामस्त उपस्थित होते.

# जेथे कीर्तनाची जागा तेथे पांडुरंग उभा

## श्री श्री १००८ महामंडलेश्वर परमानंदगिरी महाराज

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** ज्या ज्या ठिकाणी कीर्तन, प्रवचन, भजन, चरित्र पारायण होत असते तेथे तेथे भगवंताचे अस्तित्व निश्चित असते थोडक्यात जेथे कीर्तनाची जागा-तेथे पांडुरंग उभा असे अमृत वचन भांगशी माता गढचे महंत-श्री.श्री. १००८ महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरीजी महाराज यांनी वैजापूर येथील श्री गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त आयोजित त्रिदिवशीय पारायण व कीर्तन सोहळा कार्यक्रमात शुक्रवार(ता,१०) रोजी केले. ते पुढे म्हणाले की,भगवंतांच्या नाम उच्चाराने वाणी पवित्र होते. तीन



दिवस हा कार्यक्रम चालणार आहे. कार्यक्रम सूत्र संचलन प्रास्ताविक जेष्ठ नागरिक धोंडीराम सिंह राजपूत यांनी केले. या प्रसंगी उपनगराध्यक्ष साबेरखान, जेष्ठ नागरीक प्रकाश शेठ बोथरा, काशिनाथ भावसार, शुभम राजपूत, युवराज राजपूत, काशिनाथ आगाज, संतोष बोथरा, श्रावण चौधरी, राजू पुणे, श्याम पवार, बाळू पुणे, निशिकांत पवार, कुणाल जगताप यांनी सहभाग नोंदविला.



# रमेश प्रतापसिंग सोळंके यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** रमेश प्रतापसिंग सोळंके रा.रिधोरा (खंडोबा)ता मोताळा यांचे काल दि. १०/२/२३ फेब्रुवारी शुक्रवार रोजी वयाच्या ४३ व्या वर्षी अल्पशा आजाराने सायंकाळी सात वाजता निधन झाले आहे.ते जळगाव येथे एका खाजगी कंपनीत वीस ते पंचवीस वर्षे पासून काम करीत होते. त्यांचा अंत्यसंस्कार दि.११/२/२३ रोजी सकाळी अकरा वाजता शोकाकुल वातावरणात रिधोरा खंडोबा येथील स्मशानभूमीत करण्यात आला.

# वैजापूरात शेतकरी मेळाव्यानिम्मिताने राष्ट्रवादीचे शक्ती प्रदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** पक्षाची संपुर्ण सुत्रे आता काँग्रेसमधुन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात आलेले माजी जिल्हा परिषद सदस्य पंकज ठोंबरे व पर्यायाने जेष्ठ नेते भाऊसाहेब ठोंबरे व ऍड प्रतापराव निंबाळकर यांच्याकडे असणार आहेत. या राजकीय पार्श्वभुमीवर राज्याचे माजी उपमुख्यमंत्री व विरोधी पक्षनेते अजित पवार यांचे शेतकरी मेळाव्याच्या निमित्ताने दिनांक 11 फेब्रुवारी रोजी वैजापूर शहरात आगमन झाले होते याप्रसंगी या मेळाव्यात अजित दादा काय बोलणार याबाबत राजकिय वर्तुळात सर्वसामान्य नागरिकांमध्ये प्रचंड उत्सुकता दिसून येत होती.

यावेळी शरद पवारांच्या सोबत काम करणार असे प्रत्येक सभेत सांगुन राष्ट्रवादी सोबत असलेली आपली निष्ठा जोपासणारे माजी आमदार भाऊसाहेब पाटील चिकटगावकर यांचा उद्धव बाळासाहेब ठाकरें शिवसेनेत प्रवेश झाल्यानंतर दादा त्यांचा नामोल्लेख करणार का? किंवा पक्ष सोडुन गेलेल्यांबाबत एक शब्दही न बोलता पक्षातील तरुण व जेष्ठ नेतृत्वालाच पुढे करुन पक्षाला उभारी देणार याबाबत मेळाव्यात चर्चा होणार का याकडे सर्वांचे लक्ष होते परंतु विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी याबाबत फारसे न बोलता पक्षाला आगामी काळात बळकट करण्याबाबत आवाहन केले.यावेळी त्यांनी वीज, महिला सक्षमिकरण, पत्रकारांवरिल हल्ले सह आदी मुद्याबाबत चर्चा केली. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे तर माजी केंद्रीय मंत्री जयसिंग गायकवाड, पक्ष निरीक्षक अमरसिंह पंडित, आमदार सतीश चव्हाण, कोपरगावचे आमदार आशुतोष काळे, शिक्षक मतदारसंघाचे आमदार विक्रम काळे, पक्षाचे जिल्हाध्यक्ष कैलास पाटील, कार्याध्यक्ष मनोज घोडके, जेष्ठ नेते भाऊसाहेब पाटील



ठोंबरे, माजी आमदार किशोर पाटील आदिसह मान्यवरांची उपस्थिती होती. वैजापूर मतदार संघातील नागरिकांना मोठ्या अपेक्षा असताना सुद्धा विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी वैजापूर मतदार संघातील प्रलंबित प्रश्नावर बोलणे टाळले. यात वैजापूर मतदार संघात सिंचनाचे अनेक प्रश्न प्रलंबित प्रश्नापैकी शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या नारंगी मध्यम प्रकल्पात नाशिक जिल्ह्यातील पालखेड धरणातील पाणी कालव्याद्वारे आणले जाते. परंतु हा कालवा अरुंद असुन त्याच्या रुंदीकरणासाठी भाजप शिवसेना युती सरकारच्या काळात निधी मंजुर होऊनही अद्याप हे काम रखडले आहे. तालुक्यातील मन्यआड धरणाची उंची वाढवण्याचा प्रश्न गेली कित्येक वर्ष रखडला असून पाटबंधारे मंत्री असताना खुद्द अजित पवार यांनी मन्याड धरणाला भेट दिली असतांना या धरणाची उंची वाढवण्याबाबत सकारात्मक भाष्य केले होते मात्र त्यानंतर आलेल्या कुठल्याही सरकारने यावर कार्यवाही केली नाही. जायकवाडी धरणाच्या बॅकवाटर वर चालणारी रामकृष्ण उपसा गोदावरी जलसिंचन योजना ही तालुक्यातील पंधरा ते वीस गावांसाठी जलसंजीवनी योजना ठरली असूनही सद्यस्थितीत ही योजना बंद असुन शेतकऱ्यांच्या सातबाऱ्यावर कर्जाचा बोजा आहे. शेतकरी कधी कर्ज मुक्त होणार? असे अनेक प्रश्न प्रलंबित असून याबाबत बोलणे नागरिकांना अपेक्षित होते. याप्रसंगी राष्ट्रवादी चे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते यांची उपस्थिती होती.

# आ. फारुक शाह यांच्या हस्ते विकासकामांचा शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** प्रादेशिक पर्यटन विकास योजना २०२१-२२ अंतर्गत धुळे जिल्ह्यातील 'ऐतिहासिक पुरातन एकविरा देवी मंदिरासाठी पर्यटन विभाग शासननिर्णय दि. २३-०२-२२ नुसार ३ कोटी रुपये मंजुर करण्यात आले होते. यात प्रामुख्याने सभामंडप दुरुस्ती करणे, भक्त निवास दुरुस्ती करणे व मंदीर परिसरातील इतर अनुषंगिक कामांचा समावेश आहे. आमदार फारुख शाह यांच्या शुभ हस्ते आज रोजी एकविरा देवी मंदिर परिसरातील विकास कामांचा शुभारंभ करण्यात आला.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्यावतीने सविस्तर प्रस्ताव तयार करण्यात आला होता. मात्र राज्यात सत्ताबद्दल झाल्यानंतर मा.मुख्य सचिव यांचे दि. १८/०७/२०२२ च्या निदेशानुसार १/०४/२०२१ पासून मंजुर केलेल्या परंतु निविदा न काढलेल्या तसेच कार्यादेश दिलेत मात्र काम सुरु न झालेल्या कामाच्या अनुषंगाने कोणतीही कार्यवाही करू नये अशा सूचना दि. २५/०७/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सर्व संबंधित जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार एकविरा देवी मंदीर परिसरातील विकास कामांना स्थगिती देण्यात आली होती. आदिशक्ती एकविरा देवी खान्देश वासियांचे कुलदैवत असल्याने मंदीर परिसराचा विकास होणे आवश्यक आहे हि बाब लक्षात घेवून आ. फारुख शाह यांनी दि.१४/११/२०२२ रोजी मुख्यमंत्री महोदयांना प्रत्यक्ष भेटून स्थगिती उठविणेची मागणी केली. त्यानुसार पर्यटन विभागाने दि. १६/१२/२०२२ रोजी स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करून एकविरा देवी मंदीर परिसरातील विकास कामांबद्दल स्थगिती उठविली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्यावतीने केल्या जाणाऱ्या या कामात सभामंडप दुरुस्ती, भक्तनिवास दुरुस्ती, व इतर कामांचा समावेश आहे. व पर्यटन मंत्री ना. मंगलप्रभात लोढा यांनी एकविरा देवी मंदीर परिसरातील विकास कामांची स्थगिती उठविली त्याबद्दल आ. फारुख शाह यांनी मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे व पर्यटन मंत्री ना. मंगलप्रभात लोढा यांचे आभार मानले आहे.





# पर्यावरण समस्येचे समाधान संस्कृतीच्या मूलभूत तत्वांचे पालन करूनच शक्य

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** पर्यावरण समस्येचे समाधान भारतीय संस्कृतीच्या मूलभूत तत्वांचे पालन करूनच शक्य आहे. आपले वेद, वेदांगे, शास्त्र, साहित्य, परंपरा,लोकगीते, कला मनोरंजन, लोकव्यवहार यात पर्यावरण संवर्धनाची बीजे आहेत असे प्रतिपादन पुनरुत्थान विद्यापीठ अहमदाबादच्या कुलपती इंदूमतीजी काटदरे यांनी केले. रा स्व संघ जनकल्याण समितीच्या वतीने आयोजित श्रीगुरुजी पुरस्कार प्रदान सोहळ्याच्या प्रमुख वक्ता म्हणून त्या बोलत होत्या. याप्रसंगी व्यासपीठावर प्रमुख अतिथी ह.भ.प. चैतन्य महाराज देगलूरकर, पुरस्कारार्थी डॉ. क्षमाजी मेत्रे व अमूलचे प्रतिनिधी, माहिती तंत्रज्ञान व कार्यान्वयन प्रमुख श्री मनोजभाई मुंधडाजी रा स्व संघ देवगिरी प्रांत संघचालक अनिलजी भालेराव, श्रीगुरुजी पुरस्कार स्वागत समिती अध्यक्ष श्रीमती रेखाजी राठी, रा. स्व. जनकल्याण समितीचे महाराष्ट्र प्रांताध्यक्ष डॉ रविंद्र साताळकर व संभाजीनगर जिल्हाध्यक्ष गोवर्धनजी अग्रवाल यांची प्रमुख उपस्थिती होती. त्या पुढे म्हणाल्या पृथ्वी, जल, वायू, आकाश व अग्नी या पंचतत्वांचा विचार करून त्या पूरक असा आपला व्यवहार मानवाने ठेवला तर पर्यावरण समस्या सोडवता येईल या सर्वप्रती प्रेम, कृतज्ञता, दोहन, रक्षण याचा अवलंब करण्याची गरज आहे. असे त्या म्हणाल्या. महिला सबलीकरण या संदर्भात बोलताना त्या म्हणाल्या स्त्री अबला कधी होती. भारतीय परिप्रेक्षात विचार केला संपूर्ण कुटुंब व्यवस्था ही स्त्रियांना केंद्रस्थानी ठेवून झाली आहे. स्त्री व पुरुष हे एकमेकाविना अपूर्ण आहेत. ते एकत्र आले तरच एकात्मता शक्य आहे असे प्रतिपादन त्यांनी केले.

याप्रसंगी वेदमंत्राच्या जयघोषात,महिला सबलीकरणाच्या क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल धरमशाला, हिमाचल प्रदेशच्या सामाजिक कार्यकर्ता, चिन्मय ऑर्गनायझेशन ऑफ रुरल डेव्हलपमेंट या संस्थेच्या संस्थापक डॉ क्षमा मेत्रे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला तसेच पर्यावरण क्षेत्रात प्रभावी कार्य करणाऱ्या अमूल ब्रँड असलेल्या खेडा जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ लि आणंद यांना प्रदान करण्यात आला. अमूलचे प्रतिनिधी श्री मनोजभाई मुंधडा यांनी तो स्वीकारला. पुरस्काराचे स्वरूप रु. 1 लाख राशी, सन्मानपत्र, गौरव चिन्ह शाल व श्रीफळ हे आहे.

तसेच चिन्मय ऑर्गनायझेशनमधील विशेष कार्याबाबत श्री नरेंद्र पॉल यांचा सत्कार सीमाताई कुलकर्णी यांचे हस्ते करण्यात आला. याप्रसंगी डॉ क्षमा मेत्रे यांच्या महिला सबलीकरण कामासंदर्भात तर अमूलचे पर्यावरण विषयक कामाची माहिती असलेली ध्वनी चित्रफीत दाखविण्यात आली. याप्रसंगी बोलतांना डॉ क्षमा मेत्रे म्हणाल्या स्वामी चिन्मयानंद सरस्वती यांच्या कृपाशीर्वादाने व प्रेरणेने आरोग्य या विषयापासून कामाला सुरुवात झाली. मात्र केवळ तेवढ्याने भागणार नाही तर ग्रामीन भागातील त्यांच्या सर्व समस्यांना हात घातला तरच बदल शक्य होईल यातून सर्वांगीण विकासाचे काम महिला मंडळींच्या स्थापणेतून सुरू झाले.

# आईचे मरणोपरांत विधी, कर्मकांड टाळत विधायक कार्यास देणगी

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** मेंदूमृत अवस्थेत मानवी देह तब्बल ९६ तास सचेत अवस्थेत राहून एक मेंदूमृत व्यक्ती ८ व्यक्तींना सुमारे ६० ते ७० अवयव दान करू शकतो त्यामुळे अवयवदान ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन फेडरेशन ऑफ ऑर्गन अँड बॉडी डोनेशन, मुंबई उपाध्यक्ष मा.सुनील देशपांडे यांनी केले.
अंनिसचे राज्य कार्यवाह कृष्णा चांदगुडे यांनी मातोश्रींच्या निधनानंतर त्यांचा देहदान व त्यानंतर कर्मकांड टाळून रक्तदान शिबिर तसेच अवयवदान यावर आयोजित मार्गदर्शन कार्यक्रमात ते बोलत होते.

सुगंधाबाई चांदगुडे यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या निधनानंतर चांदगुडे यांनी त्यांचा देह वैद्यकीय महाविद्यालयाला दान केला. त्यानंतरचे कर्मकांड टाळून मारूतीराव दगडू तिडके विद्यालयास २५ हजार रु, प्राथमिक शाळेस १५ हजार रु, अंधश्रद्धा निर्मूलन समितीस ५ हजार रु, लायन्स मूक बधीर विद्यालयास ५ हजार रु, वात्सल्य वृद्धाश्रम नाशिक यांना जेवण देण्यात आले. याप्रसंगी नाशिक येथील समता रक्तपेढीच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते. प्रस्ताविक जयश्री शिंदे यांनी, सूत्रसंचालन किरण चांदगुडे यांनी तर आभार ॲड. समीर शिंदे यांनी मानले. विधायक कार्यास आर्थिक मदत तसेच रक्तदान शिबिराचे आयोजन करून त्यांनी समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे.




# जलजीवन योजनेत सांगोला तालुक्यात 4 कोटींचा भ्रष्टाचार

## कारवाई करण्याची शेतकरी कामगार पक्षाची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**रविंद्र कांबळे**

**सांगोला :** सांगोला तालुक्यामध्ये जलजीवन मिशन योजनेअंतर्गत कामे न करता बीले अदा करून भ्रष्टाचार केल्याचा आरोप शेतकरी कामगार पक्षाचे राज्यचिटणीस मंडळ सदस्य बाबासाहेब करांडे व सांगोला पंचायत समितीचे माजी सभापती बाळासाहेब काटकर यांनी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने पत्रकार परिषद घेऊन भ्रष्टाचाराची चौकशी करण्याची मागणी केलेली आहे.

जलजीवन मिशनची कामे राज्यभरामध्ये मोठ्या रक्कमेची कामे सुरु आहे. केंद्र व राज्य सरकार प्रत्येक तालुक्यास १०० कोटी पेक्षा जास्त निधी देत आहे. तोच निकष वापरुन दुष्काळी तालुका म्हणून १२५ कोटी रुपयेच्या पिण्याच्या पाण्यच्या योजना सांगोले तालुक्या मध्ये मंजुर केलेल्या आहेत. ज्या वेळी अशा योजना मंजूर होतात. त्यावेळी प्रशासनाच्या प्रमुखांना हातीशी धरुन अनेक समाजकंटक व लोकप्रतिनिधी भ्रष्ट पध्दतीने पैसा मिळवतात. तसाच प्रकार जलजीवन मिशनच्या सांगोलेतील योजने मध्ये झाला आहे. सांगोले तालुक्यामध्ये ७० गावासाठी ही योजना मंजर आहे. तिची निवीदा प्रसिध्द करुन निविदेमध्ये जिवो- टॅन्गीग अट या निवीदेच्या प्रसिध्दीकरणामध्ये घालवणेत आली होती. आम्ही आवाज उठविल्यानंतर ती पुन्हा रद्द करण्यात आली. ठराविक ठेकेदारांनाचा पैसे मिळविता यावे असा प्रयत्न कार्यकारी अभियंता श्री कोळी आणि सांगोला उपविभागाचे उपअभियंता श्री कमळे हे करीत आहेत. याबाबत मुख्यकार्यकारी अधिकारी याबाबत लेखी तक्रार देऊन सुद्धा कारवाई करीत नाहीत या मागच रहस्य काय असा प्रश्न उपस्थि



**खोटी बिले काढलेल्या ग्रामपंचायतींची नावे-** १)लक्ष्मी नगर २)कटफळ )वाटंबरे ४)वाणीचिंचाळे ५मांजरी ६)धायटी ७) एखतपुर ८)आचकदानी.

केला आहे.

**या ई-निविदेमधील गंभीर बाबी** १) कायदयामध्ये तरतुद नसताना जीओ टॅन्गीग अट घातली. २) निविदे मध्ये स्पर्धा होवू दिली नाही. ३) कमी दराने आलेल्या पात्र निविदअपात्र केल्या. ४) संस्था क्षमतेची (खोटी) मर्यादामान्यकरुन भ्रष्टाचाऱ्यांच्या साखळीतील काम दिले. ५) शासन निर्णयानुसार १० टक्के लोकवर्गणी भरणे अनिवार्य असताना न भरताच ठेकेदारांना वर्क आर्डर दिल्या. ६) पाईप न आणताच ८५ टक्के बिले आदा केली आहेत आणि सरपंच ग्रामसेवकाच्या स्टॅक रजिस्टर न पाहता करता खोटी पाईप खरेदी दाखवून खोटी बिले आदा केली. खोटी बिले काढलेल्या ग्रामपंचायतीची नावे १) लक्ष्मी नगर २) कटफळ ३) वाटंबरे ४) वाणीचिंचाळे ५) मांजरी ६) धायटी ७ ) एकतपूर ८) आचकदाणी वरील गावाच्या अंदाजे ४ कोटी रुपयाची जलजीवन मिशन योजनेची काम न करता बिले अदा करुन गैरप्रकार केला आहे. म्हणून ग्रामीण पाणी पुरवठा विभाग सोलापूर चे कार्यकारी अभियंता श्री कोळी आणि सांगोला उपविभागाचे उपअभियंता श्री सुरेश कमळे यांना निलंबीत करुन चौकशी करणेत यावी अशी माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली. यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे राज्य मंडळ सदस्य बाबासाहेब करांडे, माजी सभापती बाळासाहेब काटकर, डॉक्टर दादासाहेब जगताप, अमोल खरात, माजी जि प सदस्य गजेंद्र कोळेकर, हनुमंत कोळवले सर इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

# सम्राटकार बबन कांबळे यांच्या आठवणींना उजाळा

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** एडीटर अँड प्रेस रिपोटर असोसिएशनने पुढाकार घेवून आयोजित केलेल्या अभिवादन सभेत अनेक मान्यवरांनी बबन कांबळे यांच्याशी आलेल्या संबंधांना व आठवणींना आपल्या भाषणातून उजाळा दिला.

सदर अभिवादन सभेच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ नेते रतनकुमार पंडागळे हे होते. यावेळी या व्यासपीठावर जेष्ठ साहित्यिक व विचारवंत प्रा. डॉ. ऋषीकेश कांबळे, जेष्ठ पत्रकार ज्ञानेश्वर खंडारे, निवृत्त माहिती उपसंचालक यशवंत भंडारे, इंजि. विनय घनबहाद्दुर, बौध्दाचार्य व्ही. के. वाघ, प्रा. भारत सिरसाठ, एडीटर ॲण्ड प्रेस रिपोर्टर असोसिएशनचे अध्यक्ष रतनकुमार साळवे आदींची उपस्थिती होती.

प्रारंभी सम्राटचे संपादक कालकथित बबन कांबळे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन उपस्थित मान्यवरांनी अभिवादन केले. प्रा. भारत सिरसाट यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना ते म्हणाले की, बबन कांबळे यांनी परिवर्तनवादी पत्रकारितेतून समाजाला दिशा दिली व लेखणीद्वारे आपला एक नैतिक दबाव निर्माण केला.

जेष्ठ पत्रकार शांतीलाल गायकवाड यांनी आपल्या भाषणात स्पष्ट केले की, बबन कांबळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या परखड पत्रकारितेची परंपरा कायम ठेवली. कांबळे यांनी वाचक वर्ग निर्माण केला. जेष्ठ विचारवंत प्रा. डॉ. ऋषीकेश कांबळे यांनी बबन कांबळे यांच्या पत्रकारितेचा गौरव करतांना सांगितले की, खैरलांजी प्रकरणा नंतर बबन कांबळे यांनी परिवर्तनवादी पत्रकारितेतून अन्याय अत्याचाराच्या विरुध्द आवाज उठवला व समाजात जाणीवपूर्वक असंतोष पेरण्याचे काम केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पत्रकार असण्या विषयीचे जे निकष सांगितले ते सर्व निकष बबन कांबळे यांनी आचरणात आणले, त्यांनी निर्भयता जपली. अन्याया विरुध्द आवाज उठवताना बबन कांबळे यांनी राजसत्तेचे भय कधीच बाळगले नाही, असे प्रा. ऋषीकेश कांबळे यांनी स्पष्ट केले.कांबळे यांच्या विनंतीवरुन आपण सम्राट मध्ये त्रिसरण व पंचशीलावर लेख लिहीले, हे लेख चार दिवस प्रसिध्द करण्यात



आले. याचाही उल्लेख प्रा. डॉ. कांबळे यांनी केला. जेष्ठ पत्रकार स.सो. खंडाळकर यांनी सांगितले की चळवळीतील गद्दारांवर व कर्मकांडावर प्रहार करण्याचे कार्य बबन कांबळे यांनी जे केले, त्याला तोड नाही. सम्राटचे जिल्हा प्रतिनिधी ॲड. नामदेव सावंत यांनीही बबन कांबळे यांचेविषयी गौरवोद्गगार काढले. मी पत्रकार त्यांचेमुळेच घडू शकलो. माझ्या कौटुंबिक संकट काळातही त्यांनी मला मोलाची साथ दिली. बबन कांबळे यांनी पत्रकार व संपादक म्हणून वैयक्तिक जीवनातही नैतिकतेचे पालन केले, याचाही उल्लेख नामदेव सावंत यांनी केला. जेष्ठ पत्रकार ज्ञानेश्वर खंदारे म्हणाले की, बबन कांबळे यांची पत्रकारिता हे एक प्रकारचे मिशन होते. अन्याय, अत्याचाराच्या विरोधातही त्यांनी सातत्याने आवाज उठविला. राहुल साळवे यांनी सांगितले की, बबन कांबळे यांची पत्रकारिता सध्याच्या काळात उठून दिसणारी असल्याने त्यांचे कार्य नेहमी स्मरणात राहील. वंचितांचा आवाज त्यांनी बुलंद केला. धनराज गोंडाणे, यशवंत भंडारे, बौध्दाचार्य व्ही. के. वाघ, विनय घनबहादूर, आर. बी. वानखेडे यांनी भावपूर्ण शब्दात बबन कांबळे यांच्या कार्याचा गौरव केला. अध्यक्षीय भाषणात जेष्ठ नेते रतनकुमार पंडागळे यांनी बबन कांबळे यांच्या आठवणी सांगितल्या.

त्याचे मी ऐकलेले एक भाषण अंगावर शहारे आणणारे होते, याचीही आठवण पंडागळे यांनी बोलून दाखविली, या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन एडीटर्स ॲण्ड प्रेस रिपोर्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष रतनकुमार साळवे यांनी केले, आभार प्रदर्शन जेष्ठ पत्रकार ज्ञानेश्वर खंदारे यांनी केले.यावेळी रशपालसिंग अट्टल, ज्ञानेश्वर खंदारे, शांतीलाल गायकवाड, परमेश्वर साळवे, जगन्नाथ सुपेकर, संजय सोनखेडे, चंपालाल दुर्वे, शेख शफिक, बबन सोनवणे, प्रल्हाद गवळी, महेश मुरकुटे, राज ठाकरे, देविदास कोळेकर, सुजित ताजने, नामदेव सावंत, महादेव पंडीत, भाऊसाहेब शेजूळ,उमेश खडसे, धनराज गोंडाणे, सि.पी.पाटील,आदी पत्रकार, समाजबांधव मोठया प्रमाणावर यावेळी उपस्थित होते.

## मराविमं अधिकारी संघटनेची नूतन कार्यकारिणी जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ अधिकारी संघटनेची औरंगाबाद परिमंडळ कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली.







अध्यक्षपदी सुनील पावडे, उपाध्यक्षपदी रमेश सोनवणे व सचिवपदी नितीन पारिपेल्ली यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. परिमंडळ कार्यालय स्तरावर सभासदांचे प्रश्न निकाली काढण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून विविध प्रलंबित प्रश्न प्रशासनापर्यंत पोहोचवण्याकरिता नुकतीच औरंगाबाद परिमंडळ स्तरावर बैठक झाली. यावेळी संघटनेचे अध्यक्ष प्रवीण बागुल, उपसरचिटणीस प्रणेश शिरसाट व पतसंस्था सचिव दिलीप पवार यांच्या उपस्थितीत विचारविनिमय करून सर्वानुमते औरंगाबाद परिमंडळ कार्यालय स्तरावर २०२३-२४ साठी नवीन कार्यकारिणी निवड करण्यात आली. उर्वरित कार्यकारिणी पुढीलप्रमाणे : कोषाध्यक्ष- पंकज उदावंत, कार्याध्यक्ष- विलास म्हस्के, चेतन वाघ, विशाल कासलीवाल, महिला प्रतिनिधी- कांचन राजवाडे, शिल्पा काबरा, संघटन सचिव-सागर चव्हाण,गणेश बोडरे, शत्रुघ्न फुके, सहसचिव- नितीन पाडसवान, नरेश प्रसाद, शिवाजी तिकांडे, सल्लागार- राजेश डोणगावकर, विश्वास पाटील, कार्यकारिणी सदस्य - राहुल शंभरकर, सुहास बोंडे.

## पत्रकारावरील हल्याच्या निषेध करत जळगाव जा. ठाणेदारांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** बुलढाणा येथे स्वाभिमानी संघटनेचे नेते रविकांत तुपकर यांच्या आत्मदहन आदोलनावेळी बातमीचे वृतांकन करण्यासाठी गेलेल्या पत्रकार विवेक गावंडे यांना पोलीसांनी असभ्य वर्तनूक देत धक्काबुक्की केली तसेच राजापूर येथील रिफायनरी प्रकल्पाच्या विरोधात बातमी प्रकाशीत केली म्हणून शशिकांत वारिसे या पत्रकाराला चार चाकी वाहणाने उडून देवून ठार केले. त्याचा निषेध म्हणून जळगाव जामोद तालुक्यातील प्रींट व ईलेक्ट्रॉंनिक मिडीयायाच्या पत्रकारांनी जळगाव जामोद पोलीस स्टेशनमध्ये सदर घटनेचा निषेध करत 12 फेब्रुवारी रोजी ठाणेदरांना निवेदन देण्यात आले.

यावेळी पत्रकार गुलाबराव इंगळे,जयदेव वानखडे, गुलजारखा पठाण, सागर झनके, महम्मद फारूख, गोपाल अवचार, राजेश बाठे, राजू वाढे, अनिल भगत, नागेश भटकर, विजय वानखडे, योगेश म्हसाळ, दंत्तू दांडगे, किशोर दाताळकर,अमोल भगत, राजेश लहासे आदी पत्रकार हजर होते.



## कन्नडच्या पत्रकारांच्या वतीने जाहीर निषेध

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** पत्रकांराच्या वतीने रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर येथील पत्रकार शशिकांत वारीशे यांच्या निर्घृण हत्येचा कन्नड तालुका पत्रकार संघाच्या वतीने निषेध नोंदवून पत्रकारांना संरक्षण देण्यात यावे या मागणीचे निवेदन नायब तहसीलदार मोनाली सोनवणे सह कन्नड शहर पोलिस स्टेशन येथे प्रभारी सहाय्यक पोलिस निरीक्षक सचिन खटके यांना देण्यात आले यावेळी अध्यक्ष रवींद्र अजमेरा, माजी अध्यक्ष कल्याण पाटील, विठ्ठल शिरसे उपाध्यक्ष सहयोग जावळे,संजय जाधव,संतोष सोमासे, प्रशांत सोळुंके , शेख आकीब , मुजीब खान, बापू रामकर आदींसह पत्रकार बांधव उपस्थित होते.



## शिवजयंतीनिमित्त बाजार बंद

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** सावळदबारा येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त गावातून भव्य छत्रपती शिवाजी महाराज यांची मिरवणूक काढण्यात येत असल्याने दि.१९ फेब्रुवारी जयंती आहे.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजन करण्यात आलेले आहे. असल्याचे गृहीत धरुन या आठवडे बाजारात छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य पुतळा बसवलेला आहे याठिकाणी यांची होणारी गर्दी लक्षात घेता सावळदबारा येणारा आठवडे बाजार दि. १९ फेब्रुवारीला आठवडे बाजार बंद ठेवण्याची दवंडी येथील कार्यक्रमांचे अध्यक्ष सुनील माळी, उपाध्यक्ष आकाश गायकवाड, अक्षय कोते, मयूर रावळकर, पवन बोबडे, सागर गावडे व ग्रामस्थ यांनी दिली आहे. तरी बाहेरगावाहून येणाऱ्या व्यापारी वर्गानी बाजार बंद राहिल यांची दखल घ्यावी अशी माहिती यांनी बोलताना सांगितले.



## अखेर प्रशासनाला व विमा कंपनीला जाग; दैनिक आधुनिक केसरी इफेक्ट

आधुनिक केसरी न्यूज

**औसा :** तालुक्यातील अनेक शेतकरी बांधवांनी खरीप हंगामातील पीक विमा मोठ्या प्रमाणात भरला होता. विम्याही मोठ्या संख्येने मंजूर झाला.परंतु सदरील विम्याची रक्कम ही बोटांवर मोजता येईल इतकेच शेतकरी बांधवांना मिळाली होती. पण दि (१०) वार गुरुवार दैनिक आधुनिक केसरीचा बातमीचा धसका घेत प्रशासनाला व विमा कंपनीला जाग आली. अखेर शुक्रवारी काही शेतकऱ्याच्या बँक खात्यात मध्ये विमा जमा झाल. तरी जिल्ह्यातील व तालुक्यातील सर्व शेतकऱ्याने आमच्या प्रतिनिधीनी संवाद साधला त्यावेळेस काही. शेतकऱ्यांनी आपल्या भावना बोलून दाखवल्या म्हंटले की दैनिक आधुनिक केसरी ने बातमी लावल्यामुळे प्रशासनाला व विमा कंपनीने धसका घेत काही शेतकऱ्याच्या बँक खात्यात मध्ये विमा जमा झाला अशी प्रतिक्रिया आमच्या प्रतिनिधीसी बोलताना शेतकऱ्यांनी दिली.


केसरी
बोटांवर मोजता येतील इतक्या शेतकऱ्यांना मिळाला विमा
विमा कंपनीचा भोंगळ कारभार

## शहराच्या विविध भागात तिघांची गळफास घेऊन आत्महत्या; विद्यार्थी, शेतकरी व रक्षकाचा समावेश

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** शहराच्या विविध भागात राहणार्‍या तीन जणांनी राहत्या घरी गळफास घेवून आत्महत्या केली. आत्महत्या करणार्‍यामध्ये एक महाविद्यालयीन विद्यार्थी, एक शेतकरी आणि एक सुरक्षा रक्षक असल्याची माहिती पोलिस सुत्रांनी दिली आहे. तिघांनी आत्महत्या का केली याचे कारण समजू न शकल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शेंद्रा येथे राहणारे शेतकरी भाऊसाहेब बबनराव कचकुरे (वय ४०) यांनी शेंद्रा शिवारातील गट नंबर १३१ मध्ये असलेल्या शेतातील लिंबाच्या झाडाला दोरीच्या सहाय्याने बांधुन गळफास घेतला. हा प्रकार कचकुरे यांच्या कुटुंबियाच्या लक्षात आल्यावर त्यांनी भाऊसाहेब कचकुरे यांना उपचारासाठी घाटीत दाख्ला केले असता डॉक्टरांनी तपासून मयत घोषीत केले. फुलंब्री तालुक्यातील नायगाव येथील कॉलेज ऑफ फायर इंजिनियअरींग आणि सेफ्टी मॅनेजमेंट येथे शिक्षण घेत असलेला अंकुश बालाजी बर्गे (वय १९,रा. कुपटी,ता.वसमत,जि. हिंगोली,ह.मु. कॉलेज वस्तीगृह) या विद्यार्थ्याने शनिवारी सकाळी वस्तीगृहातील आपल्या खोलीत गफाळास घेतला होता. अंकुश बर्गे याला बेशुध्दावस्थेत घाटीत दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला तपासून मयत घोषीत केले.

बालाजीनगरातील मोरे मंगल कार्यालयाजवळ राहणारे रमेश रामराव दांगोडे (वय ३२,मुळ रा.चौसरनगर) हे एका शाळेत सुरक्षा रक्षक म्हणुन कार्यरत होते. त्यांनी शनिवारी सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास घरातील घरातील हॉल मधील सिलिंग फॅनला ओढणीने बांधून गळफास घेतला. रमेश दांगोडे यांना उपचारसाठी घाटीत दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून मयत घोषीत केले. वरील तिन्ही घटनांची नोंद अनुक्रमे चिकलठाणा, फुलंब्री, पुंडलिकनगर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

# पैठण येथे स्वाभिमानी शिलेदारांची राज्य कार्यकारणी बैठक

आधुनिक केसरी न्यूज



**पैठण :** स्वाभिमानी शेतकरी संघटना व पक्षाच्या शिलेदारांची राज्य कार्यकारणी बैठक राजु शेट्टी यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली पैठण शहरातील अभिनंदन मंगल कार्यालय येथे आज दि.13 फेब्रुवारी सोमवार रोजी संपन्न झाली.

या दरम्यान माजी खासदार राजु शेट्टी यांनी सांगितले की, सरकारने शेतकऱ्यांच्या मालाला हमी भाव दिला पाहिजे यासाठी कायदा असतो त्याचा आधार घेऊन आपण शासन दरबारी हमी भाव देण्यात यावा अशी मागणी करु शकतो. व तसेच जानेवारी रोजी ग्रामसभेत ठराव घेण्यासाठी कार्यकर्ते सक्रिय असले पाहिजे तालुक्यातील ग्रामीण भागात तळागाळातील लोकांपर्यंत जाऊन काम करावं लागतं संघटना वाढविण्यासाठी कार्यकर्त्यांनी तनमनाने काम केले तर वाढीस चलना मिळते व तसेच राज्य पातळीवर होणारे संघटनेचे कोणतेही कार्यक्रम असोत त्या कार्यक्रम पत्रिकेत जिल्यातील पदाधिकारी यांचे पत्रिकेत नाव असावेत अशा कडक सुचना यावेळी माजी खासदार राजु शेट्टी यांनी उपस्थित बैठकीत पदाधिकारी व कार्यकर्त्यांना दिल्या. कार्यक्रमाचे प्रस्तावित भाषण स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवा जिल्हाध्यक्ष माऊली मुळे यांनी केले. यावेळी बोलतांना सांगितले की,मराठवाड्यात अनेक प्रश्न झुळखात पडले आहेत. या प्रश्नाकडे कोणी लक्ष देत नसल्याने आज शेतकऱ्यांना अनेक शासकीय योजना व शेतकऱ्यांचे अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान भरपाई, पिक अनुदान अशा विविध योजनेपासून वंचित राहावे लागत आहे.पैठण तालुक्यात मोठ्या प्रमाणावर ऊस, तुर,गहु, हरभरा अशी अनेक पिके शेतकऱ्यांनी घेतली आहेत. परंतु शेतकऱ्यांना योग्य भाव मिळत नसल्यामुळे कवडी मोल भावाने शेतकऱ्यांना माल विकावा लागत आहे.शेतकऱ्यांच्या मालाला चांगला भाव मिळावा यासाठी राजु शेट्टी यांनी शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावे अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवा जिल्हाध्यक्ष माऊली मुळे यांनी केली आहे. यावेळी डॉ.प्रकाश पोकळे( अध्यक्ष शिस्त पालन समिती),सावकार मदनाईक( अध्यक्ष,राज्य व्यवहार समिती) संदीप जगताप,प्रदेशाध्यक्ष.जालंदर पाटील, पुजा मोरे,युवती प्रदेशाध्यक्ष यांची प्रमुख उपस्थिती होती.

**कार्यकारणीच्या वेळी घेतलेले ठराव...**

१) थकित विजबिलापोटी शेती विज कनेक्शन तोडण्याचे सत्र सुरू आहे. ते ताबोडतोब थांबवावे व संभाव्य वीजदर वाढीला स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा विरोध आहे. 2) कृषी संजीवनी योजनेस मुदत वाढ देऊन 31 मार्चपर्यंत ५०% विज बिल भरून मागील विज बिल सर्व चकित 'शेतकर्यांना मुक्त करावे. ३) रासायनिक खतांच्या किंमती कमी करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारने संयुक्तपणान प्रयत्न करावेत अन्यथा भारताची अवस्था श्रीलंकेसारखी झाल्या शिवाय रहाणार नाही या ज्या शेतकन्यांनी पीक विम्यासाठी तक्रारी नोंदवलेल्या आहेत त्या शेतकऱ्याचे विम्यांचे पैसे तातडीने द्यावेत ५ ) बुलडाणा येथील आंदोलन करणा - या शेतकन्यावर लाठीचार्ज करणाऱ्या पोलिस अधिकार यांची खातेनिहाय चौकशी करावी . 5 ) महाराष्ट्रातील सर्व जिल्हाधिकारी व तहसिल कार्यालयावर विज जोडणी , पीक विमा , कांद्याचे भाव , ऊसाची एफआरपी अतिवृष्टीची मुकसान भरपाई या विषयावर मोर्चे काढण्यात येतील.

## गुन्हेवार्ता

### वाहन चोरट्यांनी पुन्हा दोन दुचाकी लांबविल्या

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** वाहन चोरट्यांनी शहराच्या विविध भागातून दोन दुचाकी लंपास केल्या आहेत. शेख अफरोज शेख नजीर (वय २५,रा.अंन्सार कॉलनी, पडेगाव) यांची दुचाकी क्रमांक (एमएच-२०-सीव्ही-२५५४) चोरट्यांनी २५ जानेवारी रोजी हडको एन-११ परिसरातील फेंन्डली बिन्स कॅफेजवळून चोरून नेली. निलेश शरद मोरे (वय ३४,रा.घृष्णेश्वर कॉलनी,जाधववाडी) यांची दुचाकी क्रमांक (एमएच-२०-डीयू-४०८३) चोरट्याने १० फेब्रुवारी रोजी चिकलठाणा परिसरातील दौलत लॉन्सजवळून चोरून नेली. शहराच्या विविध भागातून दुचाकी वाहने लंपास करणाऱ्या चोरट्याविरूध्द अनुक्रमे सिटीचौक आणि एमआयडीसी सिडको पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### स्कूलबसच्या धडकेत तरूण जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** शेंद्रा एमआयडीसीकडे कामानिमित्ताने जात असलेल्या वैभव संजय गायकवाड (वय २२,रा.जुना भावसिंगपुरा गाव) याच्या दुचाकीस भरधाव वेगाने जाणाऱ्या स्कूलबसने धडक दिली. हा अपघात २३ जानेवारी रोजी सकाळी सव्वासात वाजेच्या सुमारास जालना रोडवरील धुत हॉस्पीटल सिग्नलजवळ घडला होता. वैभव गायकवाड यांनी दिलेल्या तक्रारीवरून स्कूल बस क्रमांक (एमएच-२०-डीडी-०९३५) च्या चालकाविरूध्द एमआयडीसी सिडको पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### कारच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** भरधाव वेगाने जाणाऱ्या कारने दिलेल्या धडकेत दुचाकीस्वार विनोद रतन मुंगीबल्हाळ (वय ४३,रा. गुलमोहर रेसीडेन्सी, जालाननगर) हे जखमी झाले. हा अपघात ११ फेब्रुवारी रोजी सायंकाळी साडेसात वाजेच्या सुमारास म्हाडा कॉलनी येथील बिकानेर स्वीटससमोर घडला. विनोद मुंगीबल्हाळ यांनी दिलेल्या तक्रारीवरून धडक देणाऱ्या कारचालकाविरूध्द वेदांतनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

### अवैध दारू विक्रेत्यावर कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** मिटमिटा परिसरातील शक्तीधाम मंदिराजवळ येथे अवैधरित्या देशी दारूचा साठा करून विक्री करणाऱ्या बंटी राजन काळे (वय ३१,रा.मिटमिटा) याच्यावर गस्तीवरील छावणी पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत पोलिसांनी ७०० रूपये किंमतीचा देशी दारूचा साठा हस्तगत केला आहे. अवैध दारू विक्री करणाऱ्या बंटी काळे याच्याविरूध्द छावणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## कळसारोहण पंचावतार उपहार विधी तथा परमार्ग निरोप समारंभ



आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** सावळदबारा येथे सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी चरणाकिंत श्री सावळेद्वार मंदीराचे कळशारोहण तथा परमार्गास निरोप समारंभ प्रसंगी पंचाअवातार उपहार विधी संपन्न झाला.श्री चक्रधर स्वामी मंदिराच्या वडाच्या झाडाजवळ असलेले चक्रधर स्वामींचे यांच्या मंदीराचे बांधकाम होऊन दहा ते पंधरा वर्षं झाले होते परंतु कलशारोहण चे लोक अपर्ण सोहळा बाकी होता अशी माहिती मंदीराचे आयोजक मधुकर पुजारी व पुजारी मंडळींनी सांगितले आज दि.१२/२/२३ रविवार रोजी अकरा वाजता कलश रोहनाची स्थापना व ध्वजारोहण प.पु.महंत वैराग्यमुर्ती भास्कर रत्न आचार्य श्री मानेकर दादा (महानुभाव) कनाशी व प.पु.प.म.श्री. चिंडोडीकर बाबा( महानुभाव) जाळीचा देव यांच्या हस्ते करण्यात आले.चक्रधर स्वामी यांचे सावळदबारा एकवीस दिवस याठिकाणी प्रत्यक्ष अस्तित्व होते. त्यामुळेच सावळेद्वार हे गावाचे नाव पडले. महिना-मास आणि रूळ-राहणे एकवीस दिवस या ठिकाणी देवाचे वास्तव्य असल्यामुळेच गावाचे नाव सावळदबारा पडले. देवाची मंदिरे भरपूर ठिकाणी बांधली जातात परंतु सावळदबारा या गावी साक्षात देवच अवतीर्ण झाल्यामुळे या ठिकाणी श्री चक्रधर स्वामी यांची दोन भव्य मंदिर आहेत. एक वेगळा इतिहास या सावळदबारा गावाला श्री चक्रधर स्वामी यांचा पदस्पर्श लाभला असून, या सर्व संत महंतांच्या उपस्थितीत नेहमी या ठिकाणी सर्व कार्यक्रम तपोस्विनी सुमनताई वायदेंशकर व मधुकर पुजारी यांच्या सहकार्याने पूर्णत्वास जात असतात. विशेष करून वैराग्यमुर्ती प.पु. महंत आचार्य श्री मानेकर दादा महानुभाव कनशी यांचे याकडे विशेष लक्ष असून,सव्वा महिन्यांपासून पोथी, पारायण परमार्ग सेवा चालू होती.मंदिराच्या बाबतीत ज्याही समस्या उद्भवतील त्या सर्व सोडण्यासाठी बाबांचे सर्वतोपरी प्रयत्न नेहमी दिसून येतात. त्यासाठी पुजारी मंडळीही त्यांना सहकार्य करत असते. अशा स्वरूपाचे असलेले भव्य आणि दिव्य मंदिरामध्ये वेगवेगळ्या राज्यातून ही मंडळी सतत चालू असते. अशा सर्व संत महंतांच्या गावकऱ्यांच्या पुजाऱ्यांच्या व पंचक्रोशीतील भजनी मंडळ यांच्या उपस्थितीत कलश रोहणाचा भव्य आणि दिव्य असा थाटामाटात कार्यक्रम पार पडला.वैराग्यमुर्ती आचार्य प.पु.महंत मानेकर दादा महानुभाव कनाशी,प.पु.महंत आचार्य चिंचोडीकर बाबा महानुभाव,प.पु.श्री. दहयाडेकर बाबा,प.पु.श्री.विश्वनाथ बाबा मराठे, महंत श्री.प्रदिप शास्त्री कपाटे,प.पु.श्री.पांगरीकर बाबा,प.पु.श्री.अंनतव्यास बाबा,प.पु.श्री.मुधेराज बाबा बिडकर,प.पु.श्री. विनोद शास्त्री आंबेकर,पु.श्री.योगीराजदादा विराट,आत्माराज बाबा,ई.श्री.गोंविददादा पांगरीकर, सर्व जाळीचादेव व प्रा.जीवन कोलते पाटील, सरपंच शिवाआप्पा चोपडे, उपसरपंच मो.आरिफ मो.लुखमान,मो.तालिब मो.शब्बीर,सर्व पत्रकार बंन्धू, मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते अशी माहिती आयोजक मधुकर पुजारी यांनी बोलताना सांगितले.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)

डॉ. शेख ए.एच.
या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in


नवीन वर्षाचा संकल्प करा
आरोग्याची काळजी हा मंत्र खरा
- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि अॅल्युमिनियम
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, औरंगाबाद